NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026
YEAR : 50) 15th February 2025 ( No. of Pages 24 ) ( No : 04

# अपव्यवहारार्थ स्थळ निर्मिती करीत राहण्याचा उद्योग हाणून पाडणे

**- प्रा.बी.टी.देशमुख**
*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**१.** मागास प्रवर्गासाठी राखून ठेवण्यात आलेल्या जागा त्या प्रवर्गाच्या उमेदवारातूनच भरण्यात आल्या पाहिजेत हा आग्रह महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने व त्या महासंघाच्या घटक संघटनांनी अगदी सुरुवातीपासून धरला होता. १९९० च्या दशकात विशेषतः 'एसटी' प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध होत नसत. या संधीचा फायदा घेऊन उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी अपव्यवहारार्थ स्थळ निर्मिती करण्याचा चंगच बांधला होता असे दिसून येते. हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी संघटनांना भूमिका घ्यावीच लागली. विद्यापीठ कायद्यातील तरतुदी लक्षात घेतल्या तर शासननिर्णय हा उपविधान प्रकार (Form of delegated/ subordinate legislation) त्यावेळेला अस्तित्वात नव्हता व आजही अस्तित्वात नाही. उपविधानाचा जो प्रकार कायद्यामध्ये अस्तित्वातच नाही तो प्रकार वापरण्याचा व तोसुद्धा पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याचा दुराग्रह घट्ट पकडून ठेऊन या निमित्ताने संबंधित उमेदवारांना जेरीस आणणे असे या प्रकाराचे स्वरूप होते. या प्रकाराने प्रताडित झालेल्या काही शिक्षकांनी न्यायालयाच्या मार्फत हा प्रयत्न मोठ्या प्रमाणात हाणून पाडला. या साऱ्या प्रकरणांची तपशीलवार माहिती पुढील परिच्छेदातून देण्यात आलेली आहे.

### २५ जानेवारी १९९० चा शासननिर्णय

**२.** याबाबतीत महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व सेवायोजन विभागाने दिनांक २५ जानेवारी १९९० रोजी काढलेल्या शासननिर्णयाची (क्र. युएसजी १२८६/ (११७९)/विशि-४) प्रथम माहिती करून घेऊ. या शासननिर्णयाच्या प्रस्तावनेमध्ये पूर्वी काय तरतूद होती? हे पुढील शब्दात नमूद करण्यात आलेले आहे. :-

**"तीन वर्षे सतत मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ती राखीव जागा बिनराखीव करून, इतर विहित अटींच्या अधीन राहून त्यांना कायम करावे**, असे आदेश शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : युएसजी १२८६/(११७९)/विशि-४, दि. २९ सप्टेंबर, १९८६ अन्वये निर्गमित केले आहेत."

व त्यानंतर शासननिर्णय आता काय काढण्यात आलेला आहे? याबाबतची माहिती याच शासननिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये दिलेली आहे. ती पुढील शब्दात :-

**"शासन आता याबाबत असे आदेश देत आहे की, मागासवर्गीय आरक्षण तीन वर्षाऐवजी राखीव पदे ५ भरती वर्षापर्यंत आरक्षित ठेवण्यात यावीत व सहाव्या वर्षी जी जागा बिनराखीव करून विहित अटी धारण करण्याऱ्या उमेदवारासच कायम करावे."**

**३.** अपव्यवहारार्थ स्थल निर्मितीचा हेतू मनात ठेऊन या शासननिर्णयामध्ये **"राखीव जागा बिनराखीव करतांना शासनाची मंजुरी घेण्यात यावी"** असे स्थळ निर्माण करून ठेवण्यात आलेले आहे. शासननिर्णय हा कायदेशीर उपविधान प्रकार नाही याची माहिती असल्यामुळेच याच शासननिर्णयाच्या परिच्छेद ३ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे. :-

"(३) कुलसचिव, सर्व विद्यापीठे यांना विनंती करण्यात येते की, **यासंबंधी संबंधित विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार परिनियम करण्यात यावेत."**

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व सेवायोजन विभागाने दिनांक २५ जानेवारी १९९० रोजी काढलेला शासननिर्णय सोबत **सहपत्र : १** म्हणून प्रसृत केलेला आहे.

**४.** दिनांक २५ जानेवारी १९९० रोजी शासननिर्णय तर काढला पण ज्याला पूर्वीच्या तीन वर्षांच्या तरतुदीच्या शासननिर्णयाचा लाभ मिळत होता अशा अनेक लोकांनी चकरा मारणे सुरू केले. पूजाअर्चेचे कार्यक्रम सुरू झाले. उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी आम्ही ठरवू तर कोणाला काहीही देऊ शकतो आणि 'पूजाअर्चा' बरोबर झाली नाही तर उच्च न्यायालयाचा निर्णय त्या शिक्षकाच्या बाजूने असला तरी आम्ही ते लाभ त्याला देणार नाही असे धोरण स्वीकारलेले होते. दिनांक २५ जानेवारी १९९० रोजीचा शासननिर्णय काढला तरी तीन वर्षे पूर्ण केल्यामुळे लाभान्वित होणाऱ्या उमेदवारांना लाभ देण्यासाठी दिनांक २३ मे १९९० रोजी एक परिपत्रक काढले व त्यामध्ये अशी तरतूद होती की, :-

"वरील विषयाच्या शासनाच्या समक्रमांक दिनांक ७ मे, १९९० च्या पत्राच्या आदेशांत सुधारणा करून शासन आता असे आदेश देत आहे की, विद्यापीठातील व महाविद्यालयांतील मागासवर्गीय शिक्षकांच्या पदाचे आरक्षण तीन वर्षाऐवजी पाच वर्षे करण्याचे आदेश शासन निर्णय क्र. युएसजी १२८६ (११७९)/विशि-४, दिनांक २५ जानेवारी, १९९० रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. **या आदेशापूर्वी म्हणजे दि. २५ जानेवारी, १९९० पूर्वी तीन वर्षे पूर्ण झाल्यास किंवा तीन जाहिराती देऊन शिक्षकांच्या नेमणुका झाल्या असतील अशा शिक्षकांच्या नेमणुका नियमित करण्याबाबत पूर्वीच्या आदेशानुसार म्हणजे दिनांक २९ सप्टेंबर, १९८६ प्रमाणे कार्यवाही करावी."**

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व सेवायोजन विभागाने दिनांक २३ मे, १९९० रोजी काढलेले परिपत्रक सोबत **सहपत्र : २** म्हणून प्रसृत केलेले आहे. दिनांक २५ जानेवारी १९९० रोजीच्या शासननिर्णयात "६ व्या वर्षी ती जागा बिनराखीव करून विहित अटी धारण करण्याऱ्या उमेदवारासच कायम करावे" अशी स्पष्ट तरतूद असतांना वरील प्रकार घडला.

### ५ डिसेंबर १९९४ चा शासननिर्णय

**५.** दिनांक ५ डिसेंबर १९९४ रोजी आणखी एक शासननिर्णय काढण्यात आला. (शासननिर्णय क्रमांक : बीसीसी-१०९४/सीआर-५८/९४/१६-ब, मंत्रालय, मुंबई-४०००३२) या शासननिर्णयामध्ये अशी तरतूद आहे की, :-

"या प्रवर्गांकरिता निर्धारित केलेल्या प्रमाणानुसार भरती करण्यासाठी त्या त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाली नाही तर अशी पदे ५ भरती वर्षांपर्यंत रिक्त ठेवावी व या ५ भरती वर्षात त्या प्रवर्गांचा उमेदवार उपलब्ध करून घेण्याचे प्रयत्न करण्यात यावेत. असे प्रयत्न करूनही उमेदवार प्राप्त झाला नाही तर ६ व्या वर्षी खाली उल्लेख केल्याप्रमाणे अदलाबदलीने ही पदे भरण्यात यावीत. **६ व्या वर्षीही त्या प्रवर्गाचा किंवा अदलाबदलीसाठी दुसऱ्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ७ व्या वर्षी खुल्या प्रवर्गाने उमेदवार भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर करण्यात यावी."**

२५ जानेवारी १९९० चा शासननिर्णय निघण्यापूर्वी ज्यांनी ३ वर्षे पूर्ण केलीत त्यांना नियमित करण्यात यावे असे परिपत्रक २३ मे १९९० रोजी काढण्यात आले. मात्र "१९९४ चा शासननिर्णय निघण्यापूर्वी ज्यांनी ५ वर्षे पूर्ण केलीत त्यांना नियमित करण्यात यावे" अशा अर्थाचे परिपत्रक मात्र काढण्यात आले नाही.

**६.** सन १९९४ चा शासननिर्णय निघण्यापूर्वी ज्यांनी सेवेची ५ वर्षे पूर्ण केलेली आहे त्यांना सन १९९० च्या शासननिर्णयातील तरतुदी लागू होतील की सन १९९४ च्या शासननिर्णयातील तरतुदी पूर्वलक्षी प्रभावाने लागू होतील असा कायद्याचा प्रश्न यातून निर्माण झाला. त्याचबरोबर अपव्यवहारासाठी फार मोठी स्थळ निर्मिती झाली. मनात येईल त्याला सन १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे लाभ देऊ व पूजाअर्चा बरोबर होत नसेल तर त्याला सन १९९४ चा शासननिर्णय दाखवू. अशा स्थितीत सन १९९४ चा कायदा लागू करणे हे बेकायदेशीरपणाचे आहे असा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिला तरी त्या शिक्षकांना पुन्हा चकरा मारायला लावणार पण ते लाभ देणार नाही.

*सहपत्र १ : परिच्छेद ३ पहा*

***महाराष्ट्र शासन : शिक्षण व सेवायोजन विभाग***

शासन निर्णय क्र. युएसजी १२८६/(११७९)/विशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

**दिनांक : २५ जानेवारी १९९०**

**संदर्भ :** (१) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. युएसजी ५०७९/१५१९१२/विशि ३, दि. ३० मार्च, १९८१

(२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. युएसजी ४२८३/५०५४/विशि-३, दि. २० ऑक्टोबर, १९८३

(३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. युएसजी १२८६/(११७९)/विशि-४, दि. २९ सप्टेंबर, १९८६

***शासननिर्णय***

शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. युएसजी ५०७९/१५१९१२/विशि-३, दि. ३० मार्च, १९८१ मधील आदेशान्वये मागासवर्गीय उमेदवारांसाठी कृषीतर विद्यापीठे व त्यांना संलग्नित महाविद्यालये व इतर मान्य संस्था यांमध्ये मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखीव जागांची तरतूद केलेली आहे. तसेच **शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. युएसजी ४२८३/५०५४/विशि-३, दि. २० ऑक्टोबर, १९८३ च्या आदेशान्वये त्या संस्थांमधील मागासवर्गीयांकरिता** राखीव उमेदवारांची एका शैक्षणिक वर्षाकरिता तात्पुरती नेमणूक करावी. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीही मागासवर्गीय शिक्षक उमेदवार न मिळाल्यामुळे बिगरमागासवर्गीय अर्हताप्राप्त उमेदवाराची नेमणूक करावी, असे आदेश निर्गमित केले आहेत. **तसेच अशा प्रकरणी दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीही मागासवर्गीय शिक्षक उमेदवार न मिळाल्यामुळे बिगरमागासवर्गीय अर्हताप्राप्त उमेदवारांची नेमणूक करावी असे आदेश निर्गमित केले आहेत.** तसेच अशा प्रकरणी दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी पुन्हा मुलाखतीस न बोलाविता त्याची नेमणूक करावी. मात्र मागासवर्गीयांच्या हक्काला बाधा पोहोचणार नाही, याची खात्री घ्यावी. तसेच तीन वर्षे सतत मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ती राखीव जागा बिनराखीव करून, इतर विहित अटींच्या अधीन राहून त्यांना कायम करावे, असे आदेश शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : युएसजी १२८६/(११७९)/विशि-४, दि. २९ सप्टेंबर, १९८६ अन्वये निर्गमित केले आहेत.

(२) **शासन आता याबाबत असे आदेश देत आहे की, मागासवर्गीय आरक्षण तीन वर्षाऐवजी राखीव पदे ५ भरती वर्षापर्यंत आरक्षित ठेवण्यात यावीत व ६ व्या वर्षी जी जागा बिनराखीव करून विहित अटी धारण करण्याऱ्या उमेदवारासच कायम करावे.** अर्हताप्राप्त नसलेला बिगरमागासवर्गीय उमेदवार राखीव जागांवर कोणत्याही परिस्थितीत नियुक्त करू नये; तसेच अशा नेमणुका करताना खालील अट घालण्यात यावी.

'ही नेमणूक मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदांना करण्यात येत असून सदर पदांवर नियुक्त व्यक्तीचा धारण अधिकार किंवा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही,' अशाच प्रकारचा उल्लेख सदर पदासाठी देण्यात येणाऱ्या जाहिरातींमध्येही असावा. **राखीव जागा बिनराखीव करताना शासनाची मंजुरी घेण्यात यावी.**

(३) कुलसचिव, सर्व विद्यापीठे यांना विनंती करण्यात येते की, **यासंबंधी संबंधित विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार परिनियम करण्यात यावेत.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**(गो.तु.धनमेहेर)** कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**७.** डझनावारी शिक्षकांना सन १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे लाभ देण्यात आले व अनेक शिक्षकांना सन १९९४ चा शासननिर्णय दाखवून जेरीस आणण्याची अंदाधुंदी उच्च शिक्षण विभागामध्ये फार मोठ्या प्रमाणात सुरू झाली. अनेक लोक उच्च न्यायालयात जात आहेत असे लक्षात आल्यावर उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १७ एप्रिल २००१ रोजी एक परिपत्रक काढले. "विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या तक्रारी/गाऱ्हाण्यांच्या संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यापुढे त्यांची बाजू मांडून न्याय मिळविणेबाबत" असा या परिपत्रकाचा विषय होता.

**८.** या परिपत्रकामध्ये असे नमूद करण्यात आले होते की : "शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे त्यांच्या सेवा विषयक व वेतन वा तत्सम गाऱ्हाण्यांच्या संदर्भात प्रथम तक्रारीचे निवारण करणाऱ्या सक्षम प्राधिकरणाकडे न जाता थेट न्यायालयाचा मार्ग अनुसरतात. ही अत्यंत गंभीर बाब आहे. विद्यापीठे/संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी **प्रथम विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीपुढे** आपली प्रकरणे सादर करणे आवश्यक आहे. त्या माध्यमातून तक्रार निवारण न झाल्यास **शासनाकडे तक्रार करणे आवश्यक आहे** व शासनस्तरावर जर निर्णयास विलंब होत असेल तर न्यायालयात जाण्यापूर्वी शासनास त्याची पूर्व कल्पना देणे आवश्यक आहे. मात्र वस्तुस्थिती वेगळी असते, कर्मचारी असे न करता न्यायालयाचा मार्ग अवलंबितात ही बाब सेवा वर्तणूक नियमांचा भंग करणारी आहे."

**९.** मुळामध्ये हे परिपत्रक विद्यापीठे व अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आहे व यामध्ये तक्रारीचे निवारण करण्यासाठी सक्षम यंत्रणेकडे न जाता तुम्ही थेट न्यायालयाचा मार्ग निवडता ही गंभीर बाब आहे असे म्हटलेले आहे. **तक्रार निवारण्याची सक्षम यंत्रणा म्हणून एक म्हणजे विद्यापीठाची तक्रार निवारण समिती व दुसरे म्हणजे तिथे तक्रार निवारण न झाल्यास शासन यंत्रणेकडे तक्रार करणे आवश्यक आहे असे दोन मार्ग दाखविलेले आहेत. या दोनही मार्गांची सद्यःस्थिती काय आहे?** याबाबत माहिती करून घेणे आवश्यक आहे. प्रथम विद्यापीठातील तक्रार निवारण यंत्रणेची माहिती करून

*सहपत्र २ : परिच्छेद ४ पहा*

*२५ जानेवारी, १९९० पूर्वी तीन वर्षे/तीन जाहिराती झालेल्या शिक्षकांना सेवेत नियमित करण्याबाबत निर्देश*

***महाराष्ट्र शासन : शिक्षण व सेवायोजन विभाग***

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२

क्रमांक युएसजी १२८६/(११७९) विशि-४

**दिनांक : २३ मे, १९९०**

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

**विषय :** कृषीतर विद्यापीठे व त्यांना संलग्नित अशासकीय महाविद्यालये यांमधील मागासवर्गीय शिक्षकांसाठी आरक्षित असलेल्या पदावर बिगर मागासवर्गीयांची नेमणूक करण्याबाबत.

महोदय,

वरील विषयाच्या शासनाच्या समक्रमांक दिनांक ७ मे, १९९० च्या पत्राच्या आदेशांत सुधारणा करून शासन आता असे आदेश देत आहे की, विद्यापीठातील व महाविद्यालयांतील मागासवर्गीय शिक्षकांच्या पदाचे आरक्षण तीन वर्षाऐवजी पाच वर्षे करण्याचे आदेश शासन निर्णय क्र. युएसजी १२८६ (११७९)/विशि-४, दिनांक २५ जानेवारी, १९९० रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. **या आदेशापूर्वी म्हणजे दि. २५ जानेवारी, १९९० पूर्वी तीन वर्षे पूर्ण झाल्यास किंवा तीन जाहिराती देऊन शिक्षकांच्या नेमणुका झाल्या असतील अशा शिक्षकांच्या नेमणुका नियमित करण्याबाबत पूर्वीच्या आदेशानुसार म्हणजे दिनांक २९ सप्टेंबर, १९८६ प्रमाणे कार्यवाही करावी.**

आपला विश्वासू
सही/-
**(गो.तु.धनमेहेर)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत :** शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण अनुदाने

घेऊ. त्यानंतर शासनस्तरावर उपलब्ध असलेल्या तक्रार निवारक यंत्रणेची माहिती घेऊ.

## विद्यापीठातील तक्रार निवारक यंत्रणेची स्थिती

**१०.** शिक्षकांनी व कर्मचाऱ्यांनी विद्यापीठातील तक्रार निवारण समितीकडे आपल्या तक्रारी न्याव्या व सोडवून घ्याव्या असा उपदेश दिनांक १७ एप्रिल २००१ च्या परिपत्रकान्वये करण्यात आलेला आहे. याबाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, **शासनाने केलेल्या किंवा शासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या अपृकत्याविषयी विद्यापीठ तक्रार निवारण समितीकडे तक्रार दाखल करता येणार नाही अशा प्रकारची स्पष्ट तरतूद विद्यापीठ कायद्याच्या खंड ७९ (१) मध्ये आहे.** ती पुढीलप्रमाणे:-

"79. (1) There shall be a Grievances Committee in each university to deal with all types of grievances; except grievances against the State Government including its officials"

## शासनाकडील तक्रार निवारक यंत्रणा

**११.** उच्च शिक्षण विभागाने किंवा त्यातील अधिकाऱ्यांनी घेतलेल्या काही निर्णयांमुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांवर व्यथित होण्याची पाळी आली असेल तर त्या व्यथेतून मुक्ती मिळविण्यासाठी आंदोलन करण्याशिवाय किंवा न्यायालयात जाण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग शिक्षकांना उपलब्ध नाही. ही गोष्ट महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने वारंवार शासनाच्या लक्षात आणून दिली पण त्याबाबतीत कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही. ही बाब मा.उच्च न्यायालयाच्यासुद्धा लक्षात आली. सन २०१२ च्या याचिका क्रमांक १३२६ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक **१० मे २०१३** रोजी जो निर्णय दिला त्यातील परिच्छेद २४ पुढीलप्रमाणे आहे:-

"24. Whatever may be the reason for delay in taking the decision or justification or otherwise for not extending the cooperation to the examination related work, it is the students who are bound to suffer on account of such non-cooperation between the teachers and the authorities. We are therefore of the view that State Government should set up the **Grievance Redressal Mechanism** before which the teacher or their Association can raise their grievances or demands and after considering the recommendations of such body, the State Government or the University may take necessary decisions. It is on account of **absence of such mechanism** to get the disputes and grievances resolved and redressed that the present unfortunate agitation started. The Grievance Redressal Body should be set up by 31st July 2013."

**१२.** मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयावर उच्च शिक्षण विभागाने SLP दाखल केली नाही व या निर्णयातील इतर आदेशांची अंमलबजावणी केली. मात्र उपरोक्त परिच्छेद २४ मधील आदेशाची आजपर्यंत म्हणजे १०-१२ वर्षापेक्षा जास्त काळ झाला तरी अंमलबजावणी केली नाही. याबाबत केवळ काही हास्यास्पद उपाययोजना करण्यात आल्या.

**१३.** तक्रार निवारक यंत्रणा (GRM) ३१ जुलै २०१३ पर्यंत स्थापन केल्या जाईल व त्यामुळे शिक्षकांवर आंदोलन करण्याची पाळी येणार नाही अशी एक मोठी समाधानाची भावना मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे उच्च शिक्षणक्षेत्रामध्ये निर्माण झालेली होती. पण दुर्दैवाने **याबाबतीत जो शासननिर्णय निर्गमित करण्यात आला त्या शासननिर्णयाने व्यथा निर्मिती यंत्रणेलाच व्यथा निवारक यंत्रणेची झूल पांघरण्यात आली.** २५ जुलै २०१३ च्या या शासननिर्णयाने निर्माण केलेल्या तक्रार निवारक यंत्रणेमध्ये निरनिराळ्या आठ सदस्यांचा समावेश करण्यात आलेला होता तो पुढीलप्रमाणे :-

"1. Hon'ble Minister (Higher & Technical Education) ....President

2. Hon'ble State Minister (Higher & Technical Education) ...Vice President

3. Principal Secretary (Higher & Technical Education) ...Member

4. Principal Secretary (Service)...Member

5. Principal Secretary (Finance)...Member

6. Principal Secretary (Planning)...Member

7.Principal Secretary (Law and Justice)...Member

8. Joint Secretary/Deputy Secretary (Vishi)...Member"

**१४.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २४ सप्टेंबर २०१३ रोजी राज्यशासनाला एक निवेदन पाठवून या शासननिर्णयाबाबतची आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केलेली होती. त्या पत्रातील परिच्छेद ३, ४ व ५ पुढीलप्रमाणे आहेत:-

"3. **The entire teaching community in the State is shocked by the composition of the Grievance Redressal mechanism in the form of a Committee inasmuch as the creators of the grievance are assigned the role to act as arbitrators through the said Committee.**

4. **As your honour are fully aware that no decision in the Higher Education Department is taken without the approval of either the cabinet or the Minister of the cabinet rank holding the charge of the department of Higher Education.** In the mechanism constituted by the G.R., the Hon'ble Minister is occupying the post of Chairman of the Committee. The other members are mostly either instrumental in taking decision or are subordinate to the decision-makers. The present arrangement **is completely opposed to the concept of fair-play and justice and would only make a mockery of the Grievance Redressal Mechanism which the Hon'ble High Court had very thoughtfully and rightly directed to be constituted.**

5. **In fact, the Principal Secretary to Higher Education, Joint Secretary and Deputy Secretary in the Higher Education Department (Vishi) would be the answerable parties before the grievance redressal mechanism in respect of the grievances that MFUCTO may raise.** They cannot therefore be the members of such Committee. This arrangement would ask the very persons whose actions have resulted in the grievance to hold hearing and decide the matter."

**१५.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने २४ सप्टेंबर २०१३ च्या याच निवेदनात ही व्यथा निवारक यंत्रणा कशी असावी याबाबत सुद्धा या पत्राच्या परिच्छेद ६ मध्ये एक प्रस्ताव दिलेला होता. तो पुढीलप्रमाणे :-

"6. MFUCTO as a gesture of constructive contribution proposes that the composition of the Grievance Redressal mechanism in the form of a Committee should be of two or three retired Presiding Officers of the University & College Tribunals in Maharashtra who are either sitting Judges or retired Judges of the Hon'ble High Court at Bombay whose impartiality cannot be doubted by the parties."

**१६. दिनांक २५ जुलै २०१३ च्या शासननिर्णयान्वये स्थापन केलेल्या तक्रार निवारण यंत्रणेबद्दल सर्व बाजूंनी तक्रारी आल्यात व जवळ जवळ ती यंत्रणा निरुपयोगी झाली. सन २०१३ पासून २०१६ पर्यंत या समितीने एकही तक्रार निकाली काढल्याचा इतिहास नाही.** तेव्हा शासनाने या समितीची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला. दिनांक १० मार्च २०१६ रोजीच्या शासननिर्णयान्वये तक्रार निवारक यंत्रणा म्हणून एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली. ही विशेष समिती २०१३ च्या यंत्रणेपेक्षासुद्धा टाकावू यंत्रणा म्हणून सिद्ध झाली. **पहिले कारण** म्हणजे ही समिती जवळ जवळ १८ ते २० सदस्यांची होती. **दुसरे असे की**, या यंत्रणेचे कार्यालय कोठे राहील व कार्यपद्धती कशी राहील याविषयीचा कोणताही उल्लेख या शासननिर्णयामध्ये नमूद नाही आणि त्यामुळेच सन २०१६ पासून तर आजपर्यंतच्या काळात ही समिती 'निष्काम' स्थितीत सुस्त पडून आहे. खुद्द या शासननिर्णयाच्या परिच्छेद ३ मध्ये विशेष बाब म्हणून एक बाब या समितीकडे सोपविली होती ती पुढीलप्रमाणे:-

"३. उपरोक्त नमूद बाबीव्यतिरिक्त दि. ०४ फेब्रुवारी, २०१३ ते दि. १० मे, २०१३ या कालावधीत परीक्षेच्या कामकाजावरील बहिष्कारात सहभागी झालेल्या शिक्षकांचे दि. ०४ फेब्रुवारी, २०१३ ते दि. १० मे, २०१३ या कालावधीचे वेतन बंद करण्याबाबत घेतलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शिक्षक संवर्ग व शिक्षक संघटनांची भूमिका ऐकून घेऊन निर्णय घ्यावा."

**१७.** हा जो विषय या समितीकडे सोपविला होता या एका विषयावर समितीने दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये एकमताने निर्णय घेतला व त्या निर्णयाचे सुद्धा पुढे खूप धिंडवडे निघाले. समितीने घेतलेला हा निर्णय एकमताचा होता. समितीच्या निर्णयाला उचलून धरणारा व समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास बाध्य करणारा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी दिला. पण याचा त्या विशेष समितीला आनंद झाला नाही. उच्च शिक्षण सचिव व उच्च शिक्षण संचालक हे दोघेही समितीच्या बैठकीला उपस्थित होते व तो एकमताचा निर्णय घेण्यामध्ये सहभागी होते. असे असूनही या दोघांनीही त्यांच्या एकमताच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयामध्ये पुनर्विलोकन याचिका (Review Petition) दाखल केली. आणखी विशेष गोष्ट अशी की, समितीने एकमताने घेतलेल्या निर्णयाच्या बाजूने उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात या दोन सदस्यांनी सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल केली. त्याहूनही आणखी विशेष बाब अशी की, राज्याचे वित्त सचिव हे या समितीचे सदस्य होते व एकमताने निर्णय घेण्यात ते सहभागी होते. पण त्यांची एक तपशीलवार नोट समितीच्या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झाली. सारांश काय तर या समितीचे अशा रीतीने धिंडवडे निघाले. **तक्रार निवारण यंत्रणेमध्ये तक्रारीचे जन्मदातेच जर समाविष्ट असतील तर परिणाम काय होतात याचे ही समिती म्हणजे उत्तम उदाहरण होय. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरसुद्धा यथोचित तक्रार निवारक यंत्रणा स्थापित होऊ नये व केवळ त्या आदेशाची थट्टा केली जावी ही गोष्ट अनुचित होय. अतएव यथोचित तक्रार निवारक यंत्रणा तातडीने स्थापित करण्यात यावी. ताबडतोबीची व्यवस्था म्हणून त्या त्या विभागाच्या न्यायाधिकरणाकडे सेवामुक्तीच्या प्रकरणाशिवाय मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार तक्रार निवारक यंत्रणा (Grievance Redressal Mechanism) म्हणून काम सोपविले जावे, अशी मागणी महासंघाने वारंवार केली. पण त्यावर काहीही कारवाई झाली नाही.**

**१८.** विद्यापीठातील तक्रार निवारक यंत्रणेची स्थिती व शासनाकडील तक्रार निवारक यंत्रणेची स्थिती या दोनही बाबतचे विवेचन म्हणजे नक्कीच कथेमध्ये आडकथा असा प्रकार आहे. पण आता उच्च शिक्षण विभागाने पत्रक काढून या दोनही यंत्रणेकडे दाद मागावी असा सल्ला दिलेला असल्यामुळे हा सल्ला किती निरर्थक आहे हे दाखवून देण्यासाठी ही आडकथा सांगणे भाग पडले. मूळ प्रश्न असा आहे की, पदे अनारक्षित करतांना २५ जानेवारी १९९० चा शासननिर्णय लागू पडतो की ५ डिसेंबर १९९४ चा शासननिर्णय लागू पडतो याबाबतची कायद्याची अंतिम स्थापित स्थिर स्थिती काय आहे हे ठरले जाणे आवश्यक होते. त्या बाबी कडे आता वळू.

**१९.** याबाबत मा. उच्च न्यायालयाने दिनांक ६ फेब्रुवारी २००४ रोजी सन २००१ च्या याचिका क्रमांक ३३०५ मध्ये तपशिलवार उहापोह केला असून त्यानंतर त्यावर 'न्यायनिर्णय' दिला आहे. *(यानंतर उल्लेख **निर्णय** असा)*

**(A)** शासनाच्या वकीलाचे काय म्हणणे आहे हे मा. न्यायालयाने केवळ ऐकून घेतले असेच नव्हे तर त्याची आपल्या निर्णयामध्ये तपशीलवार नोंद केली आहे. या निर्णयाचा परिच्छेद ४ पुढील प्रमाणे आहे. :-

"Shri.Patel, learned Assistant Government pleader for the respondent nos. 1 and 2, **does not dispute** that as per clause (2) of the Government Resolution dated 25.1.1990 the post reserved for candidate belonging to reserved catogory, should be reserved for five years and in the sixth year, same needs to be dereserved if the candidate from the reserved category is not available. **It is also not disputed** that the post in question was reserved for candidate belonging to scheduled Tribe for six years, i.e.more that five years. However, as per Government Resolution dated 9.12.1994, post should be reserved for five recruitment years and efforts should be made in the sixth recruitment year for filling the post by candidate from other category by exchange and in the seventh recruitment year, proposal for dereservation of post should be sent to the Government. It is submitted that this procedure has not been followed by the respondent college as well as University and therefore, proposal forwarded by the University for dereservation of the post in question is rejected by the State Government by the impugned communication."

**(B)** उच्च शिक्षण विभागाच्या अधिवक्त्यांनी मा.खंडपीठासमोर काय निरुपण केले याचे काळजीपूर्वक निरीक्षण केले तर असे दिसून येते की, सरकारी वकील शासनाची बाजू मांडत असले तरी ते मुळात व्यवसायाने अधिवक्ता असतात. उपविधान हे पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही ही कायद्याची स्थापित स्थिती (settled position of law) आहे याची त्या अधिवक्त्यांना माहिती असते. आणि त्यामुळेच शासनाच्या अधिवक्त्यांनी खंडपीठासमोर बाजू मांडतांना दिनांक २५ जानेवारी १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे आरक्षित संवर्गातील उमेदवार सतत ५ वर्षे उपलब्ध झाला नसेल तर सहाव्या वर्षी ती जागा अनारक्षित करावी लागते याबाबत काही वाद नाही ही गोष्ट खंडपीठासमोर नमूद केली. सदरहू जागा ५ वर्षापर्यंत अनुसूचित जमाती करीता राखीव ठेवण्यात आली होती याबाबत सुद्धा वाद नाही असेही त्यांनी खंडपीठापुढे सांगितले. आणि मग उच्च शिक्षण विभागाने सांगितलेली बाजू मांडायची म्हणून १९९४ च्या शासननिर्णयात काय तरतूद आहे हेही त्यांनी सांगितले.

**२०.** अशा प्रकरणामध्ये ५.१२.१९९४ चा शासन निर्णय लागू पडत नसून २५ जानेवारी १९९० चा शासननिर्णय लागू पडतो, हे विद्यापीठाच्या वकिलाचे म्हणणे मा. उच्च न्यायालयाने ऐकून घेतले व निर्णयामध्ये त्यांची नोंद केली. निर्णयाच्या परिच्छेद ५ पुढील प्रमाणे :-

"Shri. Kasat, Learned counsel for the respondent no.3 University, States that post in question was reserved for six years and in view of Government Resolution dated 25.1.1990, it can now be dereserved and, therefore, state Government ought to have granted permission for the same. It is contended that so far Government Resolution dated 5.12.1994 is concerned, same has come into force with effect from 1.1.1995 and therefore, provisions of the said Government Resolution are not attracted in the case of the petitioner."

विद्यापीठाच्या वकिलांनी मा.खंडपीठासमोर १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे ही जागा ६ वर्षापर्यंत अनुसूचित जमातीच्या उमेदवारासाठी राखून ठेवण्यात आली होती. पण उमेदवार उपलब्ध न झाल्याने बिनराखीव प्रवर्गातून ती भरण्यात आली आणि १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे ते पद आता अनारक्षित करावे लागेल असे सांगितले व सन १९९४ चा शासननिर्णय हा येथे लागू होत नाही असे ठाम प्रतिपादन विद्यापीठातर्फे करण्यात आले.

**२१.** अशा प्रकरणामध्ये १९९४ चा शासननिर्णय लागू होतो की १९९० चा शासननिर्णय लागू होतो? याबाबत परस्परविरोधी बाजूची मते आम्ही विचारात घेतली, असे नमूद करुन मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये असे नमूद केले आहे की :-

"On the backdrop of the above referred undisputed facts, it is apparent that provisions of Government Resolution dated 5.12.1994 are prospective in nature and cannot be applied retrospectively"

मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर ५ डिसेंबर १९९४ चा तुमचा शासननिर्णय हा भावी प्रभावाने लागू करता होईल, पूर्वलक्षी प्रभावाने त्याची अंमलबजावणी करता येणार नाही अशा प्रकारचा स्पष्ट निर्णय दिला. हा निर्णय काळजीपूर्वक वाचला तर असे दिसून येईल की, हा जरी एका प्रकरणात निर्णय दिलेला असला तरी तो धोरणात्मक निर्णय असून या निर्णयाने जे धोरण ठरवून दिलेले आहे. ते धोरण तत्सम सर्व प्रकरणी लागू पडेल अशा प्रकारचा हा निर्णय आहे. अशा न्यायनिर्णयाचे वर्णन **JUDGMENT IN REM** असे केले जाते. *(या निर्णयाचा यापुढे उल्लेख **'धोरणात्मक निर्णय'** असा)*

**२२.** दिनांक ६ फेब्रुवारी २००६ रोजी सन २००१ च्या याचिका क्रमांक ३३०५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा धोरणात्मक निर्णय होता. शासनाच्या अधिवक्त्यांनी धोरणात्मक निर्णय **(JUDGMENT IN**

**REM)** म्हणजे काय? हे समजावून सांगितल्यामुळे उच्च शिक्षण विभागाने त्या निर्णयाची त्या याचिकाकर्त्या पुरती अंमलबजावणी केली. त्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयात अपील केले नाही. त्यामुळे "**१९९४ चा शासननिर्णय हा पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही.**" या निर्णयाला कायद्याची स्थापित स्थिती (settled position of law) स्पष्ट करणारा अंतिम शब्द हे स्वरूप प्राप्त झाले. त्या एका प्रकरणा पुरती अंमलबजावणी करून उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी आपले खेळ सुरूच ठेवले.

**२३.** खरे म्हणजे विधानपरिषद सदस्य म्हणून, तक्रारी किंवा निवेदने घेऊन येणाऱ्या कोण्याही व्यक्तीला तुम्ही कोर्टात जा असे मी सांगत नसे. योग्यरितीने तयार केलेल्या तक्रारीचे निवेदन योग्य अधिकाऱ्यांकडे सोपवा, त्याची पोचपावती घ्या व ती माझ्याकडे सोपवा. सभागृहात हा प्रश्न आपल्याला उपस्थित करता येईल व न्याय मिळवून घेता येईल असे मी सांगत असे. पण या प्रकरणामध्ये धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर सुद्धा फक्त तेवढ्यापुरती अंमलबजावणी करून इतर प्रकरणात कुचाळक्या उच्च शिक्षण विभागाने तशाच सुरू ठेवल्या होत्या. त्यामुळे तुम्ही उच्च न्यायालयात जा असे सांगण्याशिवाय मार्ग शिल्लक राहिलेला नव्हता. याचे पहिले कारण असे की, धोरणात्मक निर्णय झालेला असल्यामुळे तत्सम प्रकरणात न्यायालयात तत्सम निर्णय पहिल्या किंवा दुसऱ्या सुनावणीत मिळू शकतो असा अनुभव होता. सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित केला तर विपरित करणीच्या परिचालनासाठी १९९४ चा शासननिर्णय हा अधिकाऱ्यांनी उराशी एवढा पक्का पकडून ठेवला होता की, खालपासून वरपर्यंतच्या सर्वांना सभागृहात 'सरळ' करण्यास बराच विलंब लागेल हे मला स्पष्ट दिसत होते व तसे झालेसुद्धा. आणि त्यामुळेच मी व्यथित शिक्षकांना उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला.

**२४.** धोरणात्मक निर्णय उच्च न्यायालयामध्ये दिनांक ६ फेब्रुवारी २००४ रोजी W.P. No. 3305 of 2001 या प्रकरणात झाल्यानंतर पुढच्या वर्षभरात निरनिराळ्या पाच शिक्षकांनी व्यक्तिशः नागपूर खंडपीठापुढे याचिका दाखल केल्या. धोरणात्मक निर्णय पूर्वीच झालेला असल्यामुळे त्या पाचही याचिकांमध्ये शिक्षकांच्या बाजूने अनुकूल निकाल लागला. त्या पाचही याचिकांचे तपशील पुढीलप्रमाणे :-

**(1)** Dated : 2nd September, 2004 : In the High Court of Judicature at Bombay : Nagpur Bench : Nagpur. Writ Petition No. 2410 of 2003. Coram : A.P.Deshpande and K.J.Rohee, JJ Petitioner : Manohar Rangrao Thakare.

**(2)** Dtr. 11.10.2004 : In the High Court of Judicature at Bombay : Nagpur Bench : Nagpur. Writ Petition No. 1085 of 2004. Coram : Shri. Justice V.C.Daga and Shri. Justice S.U.Kamdar, JJ Petitioner : Sanjay Motiramji Kharbade.

**(3)** Dated : 9.2.2005 : In the High Court of Judicature at Bombay : Nagpur Bench : Nagpur. Writ Petition No. 1121 of 2004. Coram : P.S.Brahme and B.R.Gavai, JJ Petitioner : Vinod Laurao Khalatkar.

**(4)** Dated : 9.2.2005 : In the High Court of Judicature at Bombay : Nagpur Bench : Nagpur. Writ Petition No. 1112 of 2004. Coram : P.S.Brahme and B.R.Gavai, JJ Petitioner : Vivek Haribhau Hiware.

**(5)** Dated : 2nd March, 2005 : In the High Court of Judicature at Bombay : Nagpur Bench : Nagpur. Writ Petition No. 2651 of 2004. Coram : P.S.Brahme and B.R.Gavai, JJ Petitioner : Kiran Shankarrao Khandare.

**२५.** न्यायालयाचे इतके सर्व निर्णय झाल्यानंतर तरी उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची 'दुकानदारी' बंद व्हायला पाहिजे होती पण ती तशी झाली नाही. पूजाअर्चा बरोबर झाली तर सन १९९० च्या निर्णयाचे लाभ देणे, ती तशी बरोबर झाली नाही तर सन १९९४ चा शासननिर्णय दाखवून याचिकाकर्त्यांचा छळ करणे, मा.उच्च न्यायालयाचा निर्णय झाला तरी "आम्ही त्यावर अपील करणार आहोत" अशा 'फुसक्या' सोडणे, अवमान याचिका दाखल झाली तरी विलंब करणे, एका प्रकरणामध्ये तर वीस हजार रुपयांचा दंडसुद्धा मा.उच्च न्यायालयाने अवमान याचिकेमध्ये कक्ष अधिकाऱ्यांवर ठोठावला पण तरीही ही

*सहपत्र ३ : परिच्छेद २८ पहा*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH : NAGPUR**

## WRIT PETITION NO. 1085 OF 2004

***Petitioner*** : Sanjay Motiramji Kharbade,aged about 42 years Service, R/o - Ramnagar, Bhandari Layout, Pusad, Distt. Yavatmal

***-Versus-***

***Respondents*** : (1) The State of Maharashtra, through Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai-32, (2) Amravati University, through Registrar, Amravati., (3) Principal, Phulsing Naik Mahavidyalaya, Pusad, Distt. Yavatmal

*Smt. S.W.Deshpande, Advocate for Petitioner, Smt. Bharti Dangre, AGP for Respondent No. 1 State, Shri. V,.A. Kothale, Advocate for respondent No. 2 University, Shri. S.P.Palshikar, Advocate for respondent No. 3 College*

**CORAM : SHRI. JUSTICE V.C.DAGA AND SHRI. JUSTICE S.U.KAMDAR, JJ**

This petition is filed for dereservation of the post occupied by the petitioner from 10.10.1990 with all consequential benefits, as University has accorded approval. In view of the statement made by the counsel for respondent No. 3 Principal that fresh proposal with all the necessary documents and information has been forwarded to Amravati University as well as State, vide R.P.A.D. 8.10.2004 and in view of the statement made by the counsel for respondent No. 2 University that the same will be forwarded to the State and the Statement made by the counsel on behalf of the respondent no.1 State that action for dereservation of the post will be taken within 4 weeks, following minutes of order.

**MINUTES OF ORDER**

1. On receipt of fresh proposal, respondent No.2 Amravati University shall forward the same to State,
2. On receipt of the fresh proposal, **the State shall take action of dereservation of the post occupied by the petitioner from 10.10.1990 with all consequential benefits, within 4 weeks**.
3. The petitioner will be given placement accordingly.

**Nagpur :** **JJ** **: Dt. 11.10.2004**

Counsel for Respondent No.1, 2, 3

*****

**Appendix 2 :** नुटाच्या सहसचिवांनी दिनांक ३० मे २००५ रोजी, मा. प्रधान सचिव, उच्चशिक्षण यांना पाठविलेल्या निवेदनासोबतचे हे **सहपत्र दोन** होय.

दुकानदारी सुरूच राहिली.

**२६.** महाराष्ट्राच्या सर्वच भागांमध्ये उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठातून एकसारखे निर्णय होत होते. पण उच्च शिक्षण विभाग दुरुस्त व्हायला तयार नव्हता. अशा परिस्थितीमध्ये अवमान याचिका दाखल करण्याशिवाय शिक्षकांना पर्याय राहत नव्हता. मुंबई मध्ये विलेपार्ले येथील डहाणूकर वाणिज्य महाविद्यालयात जवळ जवळ १६ वर्षे हंगामी अधिव्याख्याता म्हणून काम करणाऱ्या श्रीमती माधवी पेठे यांच्या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय हा दिनांक ९ एप्रिल २००३ रोजी झाला होता. पण त्याची अंमलबजावणी उच्च शिक्षण विभागाने केली नव्हती. त्यामुळे श्रीमती पेठे यांनी अवमान याचिका दाखल केली. तेंव्हा त्यांचे पद अनारक्षित करण्यात आले व त्यांना न्याय मिळाला. या सर्व प्रकरणाची तपशीलवार माहिती देणारे एक वृत्त दिनांक ११ जुलै २००६ रोजी दैनिक लोकसत्तामध्ये प्रसिद्ध झाले ते शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**“डहाणूकर कॉलेजची व्याख्याती १६ वर्षांनी नोकरीत कायम**

*दैनिक लोकसत्ता मंगळवार, दिनांक ११ जुलै २००६*

**प्रतिनिधी :** विलेपार्ले (पू.) येथील एम.एल.डहाणूकर वाणिज्य महाविद्यालयात गेली १६ वर्षे 'हंगामी' व्याख्यात्या म्हणून काम करणाऱ्या माधवी एस.पेठे, उच्च न्यायालयाने 'कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट' च्या कारवाईचा बडगा उगारल्यानंतर, अखेर नोकरीत कायम झाल्या आहेत. विशेष म्हणजे व्याख्यात्या या पदावर कायम नसलेल्या सौ.पेठे यांना काही काळ प्रभारी प्राचार्य म्हणूनही नेमले गेले होते.

**पेठे या डहाणूकर महाविद्यालयात कॉमर्स हा विषय शिकवतात. १४ जुलै १९९० रोजी त्यांची हंगामी व्याख्याता म्हणून नेमणूक झाली,** तेव्हापासून त्या हंगामीच होत्या. याचे कारण असे की, त्यांची नेमणूक ज्या पदावर झाली होती ते पद मागासवर्गीयांसाठी राखीव होते व त्या पदाचे आरक्षण रद्द करून ते खुले केल्याशिवाय पेठे यांची नियमित नेमणूक केली जाऊ शकत नव्हती.

डिसेंबर ९४ व जानेवारी ९५ मध्ये सरकारने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार अशा राखीव पदावर सहा वर्षे जाहिरात देऊनही राखीव प्रवर्गातील लायक उमेदवार न मिळाल्यास ते पद खुले करून त्यावर हंगामी तत्त्वावर नेमल्या गेलेल्या अध्यापकांना सेवेत नियमित केले जाऊ शकते. सौ.पेठे यांची नेमणूक ज्या पदावर झाली त्या पदासाठीही १९९० ते १९९९ या काळात वारंवार जाहिराती देऊनही राखीव प्रवर्गातील लायक उमेदवार मिळाला नव्हता. त्यामुळे सरकारी धोरणानुसार हे पद खुले करण्यासाठी डहाणूकर महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाकडे प्रस्ताव पाठविला. विद्यापीठानेही त्याची छाननी करून तो सरकारकडे पाठविला. पण सरकारने त्यावर काहीही निर्णय घेतला नाही.

**अशा परिस्थितीत सौ.पेठे यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका केली तेव्हा महाविद्यालयाने विद्यापीठामार्फत पाठविलेल्या प्रस्तावावर सरकारने चार महिन्यांत निर्णय घ्यावा, असा आदेश न्यायालयाने ९ एप्रिल २००३ रोजी दिला.** यानंतर विद्यापीठाने जून २००३ मध्ये पुन्हा प्रस्ताव पाठविला. डिसेंबर २००४ मध्ये स्मरणपत्र पाठविले. सौ.पेठे यांच्या वकिलाने नोटीस पाठविली तरी सरकारदरबारी त्याची दखल घेतली गेली नाही. अखेर संबंधित सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध न्यायालयीन अवमानाबद्दल कारवाई करण्यासाठी सौ.पेठे यांनी याचिका केली. या याचिकेवर नोटिसा काढल्या गेल्यानंतर आणि काही तारखांना टाळाटाळ केल्यानंतर **अखेर अलीकडेच सरकारने सौ.पेठे यांची नियुक्ती ज्या पदावर झाली आहे ते पद आरक्षणमुक्त करून त्यांना त्या पदावर नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे न्यायालयास कळविले.** परिणामी न्यायालयाने अवमान याचिका निकाली काढली. आधीच्या याचिकेवर न्यायालयाने सौ.पेठे यांना नोकरीतून न काढण्याच्या दिलेल्या अंतरिम आदेशाचे संरक्षण असल्याने सौ.पेठे ऑक्टोबर ९८ पासून त्या पदावर कायम राहिल्या होत्या. या सुनावणीत अर्जदारांसाठी ॲड.प्रशांत कारंडे यांनी तर सरकारतर्फे सहायक सरकारी वकील श्रीमती.एस.एम.दांडेकर यांनी काम पाहिले.”

**२७.** खरे म्हणजे श्रीमती माधवी पेठे यांच्या बाबतीत दिनांक ९ एप्रिल २००३ रोजी दिलेला निर्णय हा धोरणात्मक निर्णय होता. पण शासनाने त्याची अंमलबजावणी न केल्यामुळे अवमान याचिका दाखल झाली व नंतर ते पद अनारक्षित केल्याचे आदेश उच्च शिक्षण विभागाने काढले. पण राज्यभर इतर प्रकरणात सन १९९४ च्या शासननिर्णयाचा बागुलबुवा दाखविण्याची दुकानदारी उच्च शिक्षण विभागाने सुरूच ठेवली होती. या दुकानदारीचे स्वरूप इतके भयानक होते की, उच्च न्यायालयाचा धोरणात्मक निर्णय लक्षात आणून दिल्यानंतरसुद्धा उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात मंत्रालयातील एका कक्ष अधिकाऱ्याने आदेश काढले. उच्च न्यायालयाच्या विरोधात आदेश काढण्याचा अधिकार या देशामध्ये फक्त सर्वोच्च न्यायालयाला आहे असे असतांना सर्वोच्च न्यायालयाचे हे अधिकार वापरून या कक्ष अधिकाऱ्याने तो पराक्रम केला. त्याची तपशीलवार माहिती पुढील परिच्छेदात नमूद केलेली आहे.

**२८.** श्री.संजय मोतीराम खरबडे हे संगणकशास्त्र या विषयाचे अधिव्याख्याता म्हणून फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद येथे सन १९८९-९० ते १९९३-९४ या काळामध्ये राखीव पदावर कार्यरत होते. सन १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे पद अनारक्षित करण्यासाठी उच्च शिक्षण विभागातर्फे नकारघंटा वाजविली जात होती. तेव्हा मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर श्री.खरबडे यांनी याचिका दाखल केली. ही सन २००४ ची याचिका क्रमांक १०८५ होय. या याचिकेचा निकाल दिनांक ११ ऑक्टोबर २००४ रोजी लागला. यापूर्वी देण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयाचा ऊहापोह मा.न्यायालयासमोर झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य हे या प्रकरणी प्रतिवादी क्रमांक तीन होते. त्यांनी स्पष्टपणे खंडपीठासमोर असे सांगितले की, हे पद अनारक्षित करण्याबाबतचा तपशीलवार प्रस्ताव आम्ही विद्यापीठाकडे व शासनाकडे पाठविला आहे. विद्यापीठाच्या वकिलांनी मा.खंडपीठासमोर असे सांगितले की, विद्यापीठाकडून हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल. **राज्यशासनाच्या वकिलांनी खंडपीठाला असे सांगितले की, हे पद अनारक्षित करण्याबाबतची कार्यवाही राज्यशासनाकडून चार आठवड्यात पार पाडली जाईल.** या सर्व गोष्टींची मा.उच्च न्यायालयाच्या त्या दिवशीच्या आदेशामध्ये नोंद आहे व ही नोंद करून मा.खंडपीठाने याबाबत पुढीलप्रमाणे आदेश पारित केले:-

“2. On receipt of the fresh proposal, **the State shall take action of dereservation of the post occupied by the petitioner from 10.10.1990 with all consequential benefits, within 4 weeks.**”

मा.उच्च न्यायालयाचा दिनांक ११ ऑक्टोबर २००४ रोजीचा हा निर्णय सोबत **सहपत्र : ३** म्हणून प्रसृत केलेला आहे.

*सहपत्र ४ : परिच्छेद २९ पहा*

***महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण विभाग***

क्रमांक : एयुसी २००४/(८१/०४)/मशि ५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

**दिनांक : १९ जानेवारी, २००६**

प्रति,
कुलसचिव,
अमरावती विद्यापीठ, अमरावती

**विषय :** याचिका क्र. १०८५/२००४ श्री.संजय मोतीराम खरबडे विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर

**संदर्भ :** आपले क्र. अवि/८/सी-१११०/२००५, दि. ४.५.२००५ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे आपले संदर्भाधिन पत्र कृपया पहावे.

२. अधिव्याख्यात्याचे राखीव पद अराखीव करण्यासाठी ५ वर्षे जाहिराती, ६ व्या वर्षी पद अदलाबदलीने भरणे तसेच विविध सेवायोजन कार्यालयांची ना-हरकत प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. **आपण शासन निर्णय दि. २७.३.९१ तसेच ५.१२.९४ विचारात घेणे आवश्यक असताना फक्त शासन निर्णय दि. २५.१.९० विचारात घेतलेला दिसून येतो.** तरी परिपूर्ण स्वयंस्पष्ट प्रस्ताव प्राप्त झाल्याशिवाय सदर प्रस्तावावर कार्यवाही करता येणार नाही. शासन पत्र दिनांक २५.९.२००१ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार विहित विवरणपत्रात भरून व कुलसचिवांनी प्रमाणित करून आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त होणे आवश्यक आहे. परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरच तो पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेण्यात येईल. दि. २८.२.२००६ पर्यंत परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाला नाही तर हे प्रकरण परत पाठविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू
**(मा.के.केंद्रे)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती

**२९.** धोरणात्मक निर्णयाप्रमाणे खरबडे प्रकरणी ११ ऑक्टोबर २००४ रोजी मा.उच्च न्यायालयाचा निर्णय झालेला असतांना जानेवारी २००६ मध्ये एक विक्षिप्तपणाची कारवाई मंत्रालयातून करण्यात आली. १९ जानेवारी २००६ रोजी श्री.मा.के.केंद्रे या नावाच्या कक्ष अधिकाऱ्यांनी एक पत्र पाठवून (क्रमांक एयुसी २००४/(८१/०४)/मशि-५) "आपण ५.१२.९४ चा शासननिर्णय विचारात घेणे आवश्यक असतांना फक्त शासननिर्णय २०.१.१९९० विचारात घेतलेला दिसून येतो." असे विद्यापीठाला कळविले. **१९९४ चा शासननिर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नाही. याप्रकरणी १९९० चा शासननिर्णय लागू होतो असे एकामागून एक अनेक निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिलेले असतांना** "या प्रकरणी १९९४ चाच शासननिर्णय लागू होतो" असा आदेश काढण्याचा अधिकार या देशाच्या घटनेप्रमाणे फक्त मा. सर्वोच्च न्यायालयाला आहे. **मा. सर्वोच्च न्यायालयाचे हे अधिकार मंत्रालयातील केंद्रे या नावाच्या कक्ष अधिकाऱ्याला अजून तरी बहाल झालेले नाहीत.** "कक्षाधिकारी जस्टिस मारोती केंद्रे" यांचे हे आदेश **सहपत्र : ४** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

**३०.** श्री.मारोती केशव केंद्रे या मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्याने आपली ही कर्तृत्त्ववान कामगिरी अशीच जोरात सुरू ठेवलेली होती असे स्पष्टपणे दिसून येते. कारण अशाच एका प्रकरणामध्ये त्यांना मा.उच्च न्यायालयाने २० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. मुंबई येथे भारतीय विद्याभवनतर्फे चालविल्या जाणाऱ्या हजारीमल सोमाणी कॉलेजातील डॉ.उत्पला मोदी, डॉ.छाया दीक्षित, डॉ.निमिशा मोदी आणि डॉ.मिर्न हॅलोविन या चार अधिव्याख्यात्यांनी केलेल्या याचिकेवर मुंबई खंडपीठाने आदेश दिले. श्री.केंद्रे यांनी ही रक्कम स्वतःच्या खिशातून द्यावी असे आदेश मा.खंडपीठाने पारित केले. याबाबतचे दिनांक १६ जून २००७ रोजीच्या दैनिक लोकसत्तामध्ये (मुंबई आवृत्ती) प्रसिद्ध झालेले वृत्त शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**कोर्टाची दिशाभूल केल्याबद्दल डेस्क ऑफिसरला २० हजार दंड**

*दैनिक लोकसत्ता दिनांक : १६ जून २००७*

मुंबई, १५ जून/प्रतिनिधी : चुकीची माहिती देऊन कोर्टाची दिशाभूल केल्याबद्दल **मंत्रालयातील उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे एक कक्ष अधिकारी मारोती केशवराव केंद्रे यांना मुंबई उच्च न्यायालयाने दोषी ठरविले असून, त्यांना २० हजार रुपये दंड ठोठावला आहे.**

भारतीय विद्याभवनतर्फे चालविल्या जाणाऱ्या हजारीमल सोमाणी कॉलेजातील डॉ.उत्पला मोदी, डॉ.छाया दीक्षित, डॉ.निमिशा मोदी आणि डॉ.मिर्न हॅलोविन या चार व्याख्यात्यांनी केलेल्या याचिकांवर डॉ.एस.राधाकृष्णन व न्या.व्ही.सी.दागा यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. केंद्रे यांनी या प्रत्येक अर्जदारास पाच हजार रुपये दोन आठवड्यात स्वतःच्या खिशातून द्यावेत, असा आदेश देण्यात आला.

**न्यायालयाने आधी दिलेल्या आदेशाचे पालन केले नाही म्हणून या चौघींनी गेल्या वर्षी 'कन्टेम्प्ट' याचिका केली होती.** त्यावेळी केंद्रे यांनी केलेले प्रतिज्ञापत्र विचारात घेऊन न्यायालयाने याचिका निकाली काढली होती. परंतु त्या वेळी **केंद्रे यांनी प्रतिज्ञापत्रात केलेली विधाने वस्तुस्थितीला धरून नव्हती व दिशाभूल करणारी होती,** असे आता निर्दशनास आल्यावर खंडपीठाने त्यांच्याविरुद्ध 'कन्टेम्प्ट'ची नोटीस काढली होती. **आताही केंद्रे यांनी चूक कबूल करून बिनशर्त दिलगिरी व्यक्त केली नाही. आपली चूक झाली असे न्यायालयास वाटत असेल तर आपण दिलगीर आहोत, असे त्यांनी म्हटले होते. सोमाणी कॉलेजात या चार व्याख्यात्या गेली १२ ते १५ वर्षे हंगामी तत्त्वावर काम करीत आहेत.** ज्या पदांवर काम करीत आहेत ती राखीव आहेत. सलग सहा वेळा जाहिरात देऊनही पात्र राखीव उमेदवार न मिळाल्यास अशा पदावर काम करणाऱ्या अराखीव वर्गातील कर्मचाऱ्यांस नोकरीत कायम करण्याचे सरकारचे धोरण आहे. त्यानुसार आपल्यालाही कायम केले जावे, यासाठी या चौघींनी रिट याचिका केल्या होत्या. गेल्या वर्षी २७ जानेवारी रोजी न्यायालयाने असा आदेश दिला होता की, विद्यापीठाने चार आठवड्यांत अर्जदारांना कायम करण्याचे प्रस्ताव सरकारकडे पाठवावेत आणि त्यानंतर चार आठवड्यांत सरकारने त्यावर निर्णय द्यावेत."

*सहपत्र ५ : परिच्छेद ३१ पहा*

## NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

प्रेषक : **डॉ.ए.जी.सोमवंशी,** सहसचिव, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना (नुटा)शंकर नगर, अमरावती- ४४४ ६०६

दिनांक ३०.०५.२००५

**प्रति,**

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -३२

**मार्फत** : मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी पुढील पाच अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत.** (१) मनोहर रंगराव ठाकरे, अधिव्याख्याता (इंग्रजी), (२) संजय मोतीराम खरबडे, अधिव्याख्याता (संगणक शास्त्र), (३) विनोद लहुराव खळतकर, अधिव्याख्याता (इंग्रजी), (४) विवेक हरीभाऊ हिवरे, अधिव्याख्याता (इंग्रजी), (५) किरण शंकरराव खंडारे, अधिव्याख्याता (इंग्रजी)

महोदय,

मी, सहसचिव, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना (नुटा), आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की, अनुक्रमे (१) मनोहर रंगराव ठाकरे, नेहरु महाविद्यालय, नेर परसोपंत, जि. यवतमाळ (२) संजय मोतीराम खरबडे, फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ (३) विनोद लहुराव खळतकर, बी.बी.कला, एन.बी. वाणिज्य व बी.पी. विज्ञान महाविद्यालय, दिग्रस जि. यवतमाळ (४) विवेक हरिभाऊ हिवरे, श्री. शिवाजी महाविद्यालय, आकोट जि. अकोला (५) किरण शंकरराव खंडारे, डॉ.एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातुर जि. अकोला. येथे उपरोक्त अधिव्याख्यात्यांनी राखीव पदावर सतत पाच भरती वर्षे सेवा केल्यानंतर विद्यापीठाने त्यांना कायम स्वरुपी मान्यता प्रदान केली व त्यानंतर विद्यापीठाद्वारे गठीत केलेल्या समितीच्या शिफारशीवरुन त्यांना वरिष्ठ व निवड श्रेणी देण्यात आली. परंतु, लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, अमरावती यांनी सदर पदे अराखीव न झाल्याचे शासनाचे पत्र नसल्यामुळे त्यांना दिलेल्या वरिष्ठ व निवडश्रेणी अमान्य करुन महाविद्यालयाला रक्कम वसुलीचे आदेश दिले. त्यामुळे त्यांचेवर झालेल्या अन्यायाविरुद्ध न्याय मागण्याकरीता त्यांनी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे पाच स्वतंत्र याचिका दाखल केल्या. **सदर याचिकेंवर मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी त्यांची पदे अराखीव करण्याचे आदेश शासनास दिले त्या आदेशाच्या प्रती (Appendix 1 ते 5) अर्जासोबत जोडलेल्या आहे.**

२. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर पदे अराखीव करण्याकरीता विद्यापीठामार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर केले आहेत. त्या प्रस्तावाच्या पत्राच्या प्रती (Appendix 6 ते 10) अर्जासोबत जोडलेल्या आहेत. सदर पदे अराखीव करण्यासंबंधीचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनास पाठवून दोन ते सात महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे. तरीही, अद्यापपर्यंत शासनाद्वारे यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

३. महोदय, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, अशाच पदावर गो.से. महाविद्यालय, खामगाव, जि. बुलढाणा येथे कार्यरत असलेले तीन अधिव्याख्याते सर्वश्री. सी.एम.जाधव, पी.एस.बोडखे व एम.ओ.वानखडे, यांच्या बाबतीत न्यायालयाचा कोणताही निर्णय नसतांना सुद्धा दिनांक ११ नोव्हेंबर, २००३ रोजी त्यांना दिल्या गेलेल्या वाढीव वेतन व थकबाकीच्या वसुलीस शासनाने तुर्त स्थगिती दिली व दि. २५ जून २००४ रोजी त्यांना त्या पदाला अनुज्ञेय असलेले सर्व लाभ देण्यात यावे असे आदेश निर्गमित केले. सदर पत्राच्या प्रती Appendix 11 व 12 अर्जासोबत जोडलेले आहेत.

**विनंती** : महोदय, मी आपणास याद्वारे नम्र विनंती करतो की, न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे त्यांचेवर अन्याय होत आहे व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची सुद्धा अवहेलना होत आहे. म्हणून आपण सदर पदे अराखीव करण्याचे आदेश देऊन त्यांना न्याय द्यावा. करीता, मी आपले सेवेशी नम्र निवेदन सादर करीत आहे.

आदरपुर्वक सादर,

आपला विश्वासू,
**(डॉ.ए.जी.सोमवंशी)**
सहसचिव, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना (नुटा)

पत्राची प्रतिलिपी : प्रा.बी.टी.देशमुख, विधानपरिषद सदस्य यांना माहितीकरीता सादर.

**३१.** एकएका प्रकरणात न्यायालयात जाण्याचा सल्ला देत असतांनाच या निर्णयाची धोरणात्मक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित करण्याचा निर्णय घेण्यात आला. असा प्रश्न उपस्थित करण्यासाठी संघटनेतर्फे आधारभूत कागदपत्रांचा समावेश असलेले एक निवेदन शासनाला सादर करणे आवश्यक असते. संघटनेचे सहसचिव डॉ.अनिल सोमवंशी यांनी प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांना दिनांक ३० मे २००५ रोजी असे निवेदन सादर केले. **या निवेदनाचा विषय "मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी पुढील पाच अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत. (१) मनोहर रंगराव ठाकरे, अधिव्याख्याता (इंग्रजी), (२) संजय मोतीराम खरबडे, अधिव्याख्याता (संगणक शास्त्र), (३) विनोद लहुराव खळतकर, अधिव्याख्याता (इंग्रजी), (४) विवेक हरीभाऊ हिवरे, अधिव्याख्याता (इंग्रजी), (५) किरण शंकरराव खंडारे, अधिव्याख्याता (इंग्रजी)" असा होता.** उपरोक्त पाचही शिक्षकांच्या संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयांच्या प्रती या निवेदनासोबत सहपत्र म्हणून जोडण्यात आलेल्या होत्या. यापूर्वी अनेक लोकांना तत्सम लाभ देण्यात आलेले आहेत याबाबतचे तपशील या निवेदनाच्या परिच्छेद तीन मध्ये नमूद करण्यात आलेले होते व शेवटी पुढीलप्रमाणे विनंती करण्यात आलेली होती. :-

"**विनंती** : महोदय, मी आपणास याद्वारे नम्र विनंती करतो की, न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे त्यांचेवर अन्याय होत आहे व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची सुद्धा अवहेलना होत आहे. म्हणून आपण सदर पदे अराखीव करण्याचे आदेश देऊन त्यांना न्याय द्यावा. करिता, मी आपले सेवेशी नम्र निवेदन सादर करीत आहे."

नुटाचे सहसचिव यांचे हे दिनांक ३० मे २००५ रोजीचे निवेदन सोबत **सहपत्र : ५** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**३२.** नुटाच्या सहसचिवांनी दिलेल्या निवेदनामुळे व त्या निवेदनात सर्व पुराव्यांचा समावेश असल्यामुळे सभागृहामध्ये या प्रश्नाची चर्चा उपस्थित करण्याची पूर्वतयारी पूर्ण झालेली होती. सभागृहामध्ये होणाऱ्या चर्चेला विभागातर्फे देण्यात आलेल्या उत्तराच्या बाबतीत काही गोष्टी नमूद करणे आवश्यक आहे. पहिली बाब अशी की, तांत्रिकदृष्ट्या ती उत्तरे मंत्री देत असले तरी त्या उत्तरांची बांधणी कक्ष अधिकाऱ्यांपासून तर सचिवांपर्यंत असलेल्या नोकरशाहीच्या उतरंडीमधील प्रत्येक घटकाच्या सहभागातून झालेली असते. शासननिर्णय निर्गमित करतांना लोकांना सतत अधिकाऱ्यांच्या भोवती चकरा माराव्या लागतील असे 'स्थळ' किंवा अशी 'स्थळे' निर्माण करण्याकडे पुरेसे लक्ष पुरविले जाते. अशा स्थळांची निर्मिती, संरक्षण व त्या स्थळांचा आनंद घेण्याची परिस्थिती कोठेही कोमेजून जाऊ नये याची काळजी ही नोकरशाही सतत घेत असते. आणि मग पूर्णवेळ काम करणाऱ्या कनिष्ठापासून तर वरिष्ठापर्यंतच्या नोकरशाहीने तयार केलेले हे उत्तर प्रमाणित मानून मंत्री सभागृहात उत्तरे देत असतात.

**३३.** मंत्र्यांची स्थिती अशी असते की, मंत्र्यांच्या मागे त्यांच्या मतदार संघातील अनेक प्रश्न त्यांना सतत भेडसावत असतात. त्याशिवाय ते ज्या खात्याचे नेतृत्त्व करीत असतात त्या खात्यातील अनेक प्रश्न घेऊन राज्यभरातील तक्रारदारांच्या गर्दीला तोंड देण्यामध्ये त्यांचा बराच वेळ जात असतो. याशिवाय राजकीय घडामोडींवर लक्ष देऊन राहणे व त्या घडामोडींमध्ये आपली भूमिका पार पाडणे यामध्येही त्यांचा बराच वेळ जातो. त्याचा परिणाम सभागृहामध्ये उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना वेळ उपलब्ध होत नाही व परिणामी मंत्रालयाने तयार करून दिलेल्या निवेदनावर त्यांना विसंबून रहावे लागते. वस्तुतः या विभागाचे मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील हे उच्चशिक्षित व अभ्यासू असे मंत्री आहेत. पण त्याच वेळेला उच्च शिक्षण विभागाबरोबरच वीज मंडळाचे खातेसुद्धा त्यांच्याकडे सोपविण्यात आलेले असल्यामुळे सुरुवातीच्या काळात तर या प्रश्नाला उत्तरे देतांना ते मंत्रालयाने तयार करून दिलेल्या उत्तरांवरच विसंबून रहात होते असे दिसून येते. मात्र शेवटी शेवटी त्यांनी स्वतः या प्रश्नात स्वतः लक्ष घातले. एवढे सांगून आता सभागृहातील शब्दयुद्धाकडे वळू.

**३४.** खरे म्हणजे दिनांक ६ फेब्रुवारी २००४ रोजी सन २००१ च्या याचिका क्रमांक ३३०५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामध्ये "Provisions of Government Resolution dated 5th December, 1994 are prospective in nature and cannot be applied retrospectively" असा धोरणात्मक निर्णय दिलेला होता. त्या निर्णयाची त्या प्रकरणापुरती उच्च शिक्षण विभागाने अंमलबजावणी केलेली होती. सर्वोच्च न्यायालयामध्ये त्या निर्णयावर अपील करण्यात आलेले नव्हते. परंतु अशी परिस्थिती असतांना सुद्धा सन १९९४ च्या शासननिर्णयाचा पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणीचा आग्रह धरण्याचे जे स्थळ अधिकाऱ्यांनी निर्माण केले होते ते स्थळ त्यांना नष्ट होऊ द्यायचे नव्हते व त्या स्थळाचा मंत्रालयातील नोकरशाहीने आनंद घेणे इष्ट आहे असेच नोकरशाहीचे मत होते व त्या दृष्टीने त्यांच्याकडून उत्तरे तयार करून येत होती.

**३५. "अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुद्धा पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून होत असलेला विलंब"** या मथळ्याच्या आमच्या लक्षवेधी सूचनेवरील शासनाचे निवेदन शनिवार, दिनांक २३ जुलै २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. लक्षवेधी सूचनेमध्ये काय मुद्दे उपस्थित करण्यात आले होते? हे लक्षात येण्यासाठी या लक्षवेधी सूचनेचा मसुदा विचारात घेणे आवश्यक आहे तो शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होणे, अशी तक्रार करणारे एक निवेदन नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर करणे, या निवेदनाच्या सोबत उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रतिसुद्धा जोडणे, ही पदे अनारक्षित करण्यास होत असलेल्या विलंबामुळे अनेक वर्षांची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा. उच्च न्यायालयाने तसे आदेश दिल्यानंतरसुद्धा इतर अनुषंगिक लाभापासून वंचित ठेवणे, त्यामुळे या अधिव्याख्यात्यांमध्ये निर्माण झालेला तिव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शनिवार, दिनांक २३ जुलै २००५ : खंड १४०, क्रमांक १०, पृष्ठ ९७-९८)*

**३५.१** या लक्षवेधी सूचनेवर जे निवेदन शासनातर्फे सभागृहामध्ये सादर करण्यात आले त्या निवेदनाच्या पहिल्याच परिच्छेदामध्ये "नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटनेचे दि. ३०.५.२००५ रोजीचे **निवेदन प्राप्त करून घेण्यात आले आहे**" असे नमूद केले होते. खरे म्हणजे नुटाच्या सहसचिवांनी अमरावती विभागाच्या सहसंचालकांमार्फत हे निवेदन सादर केले होते व त्याची पोचपावती सुद्धा घेण्यात आली होती. पण त्याबाबतीत सुद्धा दिरंगाई व कुचराई झाली होती असे दिसून येते आणि त्यामुळेच "दिनांक ३०.५.२००५ रोजीचे हे निवेदन मिळाले आहे" असे शब्द न वापरता "दिनांक ३०.५.२००५ रोजीचे निवेदन प्राप्त करून घेण्यात आले आहे" असे शब्द वापरले होते. आता निवेदन प्राप्त करून घेण्यात आलेले असल्यामुळे उच्च न्यायालयाचे सर्व निर्णयसुद्धा त्या निवेदनासोबत शासनाला प्राप्त झाले होते. पण असे असतांना सुद्धा सन १९९४ च्या शासननिर्णयाची जोपासना करण्याचे काम उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात जाऊन या निवेदनामध्ये करण्यात आले होते.

**३५.२** या निवेदनातील पुढील दोन वाक्ये पहा :-

**(i)** "विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव **दि. ५.१२.९४ च्या शासन निर्णयातील अटींनुसार परिपूर्ण नसल्यामुळे** त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही."

**(ii)** "पदे अनारक्षित करण्याबाबत नागपूर व अमरावती विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांचे **विद्यापीठाने पाठविलेले प्रस्ताव अपूर्ण असल्यामुळे त्यावर उपरोक्त शासन निर्णय दि. ५.१२.९४ नुसार कार्यवाही करता आलेली नाही.**"

*(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शनिवार, दिनांक २३ जुलै २००५ : खंड १४०, क्रमांक १०, पृष्ठ ९८-९९)*

**३६.** शनिवार, दिनांक २३ जुलै २००५ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ५६०३ हा प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. "अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरही अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणारे एक निवेदन नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दिनांक ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केले हे खरे आहे काय," या प्रश्न भाग एक ला "निवेदन प्राप्त करून घेण्यात आले आहे" असे उत्तर देण्यात आले होते. "(२) खरे असल्यास, या निवेदनाच्या सोबत उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रति जोडलेल्या आहेत हेही खरे आहे काय," या प्रश्न भाग दोनला सुद्धा एका शब्दात "होय" असेच उत्तर देण्यात आले होते. "सद्यःस्थिती काय आहे?" या प्रश्न भाग तीनला "मा. उच्च न्यायालयाने

संबंधित महाविद्यालयांनी/ विद्यापीठांनी पद अनारक्षित करण्याबाबतचे सुधारीत प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत व शासनाने त्यावर कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. **त्यानुसार विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने, आरक्षण विषयक धोरणानुसार राखीव पदे बिनराखीव करता येणार नाही असे विद्यापीठाला कळविण्यात आलेले आहे.**" असे उत्तर दिले होते. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शनिवार, दिनांक २३ जुलै २००५ : खंड १४०, क्रमांक १०, पृष्ठ ८२८)*

**३७.** मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर २००५ रोजी याच विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक ९२९१ हा प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. "एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दि. ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय," या प्रश्न भाग एकला एका शब्दात "होय" असे उत्तर दिले होते. "असल्यास, याबाबत घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे" या प्रश्न भाग दोनच्या उत्तरामध्ये "मा. उच्च न्यायालयाने संबंधित महाविद्यालयांनी/ विद्यापीठांनी पद आरक्षित करण्याबाबतचे सुधारीत प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत व शासनाने त्यावर कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत, **त्यानुसार विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने फेरप्रस्ताव मागितला आहे.**" असे नमूद करण्यात आले होते. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर २००५ : खंड १४१, क्रमांक २, पृष्ठ २(५))*

प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये हा प्रश्न सातव्या क्रमांकावर असल्यामुळे त्यावर अनुपूरक चर्चा होऊ शकली नाही.

**३८.** मंगळवार, दिनांक १८ एप्रिल २००६ रोजी "**अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुद्धा पदे अनारक्षित करण्याची कारवाई न होणे**" या विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक १२७४२ हा प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता व तो पहिल्याच क्रमांकावर असल्यामुळे त्याच्यावर अनुपूरक चर्चा होऊ शकत होती व तशी ती झालीसुद्धा. शासनाचा निर्णय "झालेला असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे," या प्रश्न भाग दोनच्या उत्तरामध्ये "मा. उच्च न्यायालयाने असे निर्देश दिले आहेत की, महाविद्यालयाने पद अनारक्षित करण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनाकडे सादर करावा व शासनाने ते पद अनारक्षित करण्याची कार्यवाही करावी, **परंतु विद्यापीठाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दिनांक ५/१२/१९९४ च्या शासन निर्णयातील अटींनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही.**" असे नमूद करण्यात आले होते.

**३९.** या प्रश्नावर अनुपूरक चर्चा ज्यावेळेला सुरू झाली त्यावेळेला प्रथम प्रश्नकर्ते श्री.नतिकोद्दीन खातिब यांनी "खामगाव येथील काही पदे रेग्युलर करण्यात आलेली आहे" याबाबत विचारले असता मंत्रीमहोदयांनी "खामगावचे काय प्रकरण आहे हे मला तपासून पहावे लागेल" असे उत्तर दिले. त्यावर त्यांना "तुम्हाला नुटाच्या सहसचिवांनी निवेदन दिलेले आहे त्यामध्ये खामगावची तीन पदे तुम्ही अनारक्षित केलेली आहेत हे नमूद आहे. त्यामुळे खामगाव पदाचा प्रश्न 'विथ नोटीस' आहे, 'विदाऊट नोटीस' नाही हे त्यांच्या लक्षात आणून द्यावे लागले व त्यानंतर हायकोर्टाचा निर्णय त्यांना वाचून दाखवावा लागला. केंद्रे नावाचे एक कक्ष अधिकारी उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात भूमिका घेतात हे गोष्ट सुद्धा त्यांच्या लक्षात आणून द्यावी लागली. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, खामगांवच्या प्रश्नांच्यासंदर्भात या प्रकरणात नोटीस दिलेली आहे. Mr. Chairman, Sir, it is not that the hon. Member is asking the question without giving notice. The notice is given. Yes. It is already given. प्रश्न असा आहे की, ३० मे, २००५ रोजीचे नुटाच्या सहसचिवांचे निवेदन मिळाले, १,२,३ ४ परिच्छेदातून या निवेदनामध्ये आरोप केलेले आहेत. निवेदनासोबत कागदपत्रे जोडलेली आहेत. तीन पदे यापूर्वीच अनारक्षित करण्यात आलेली आहे. या निवेदनानुसार पदे अनारक्षित करण्याबाबत मंत्रालयातून स्टे दिलेला होता. त्यानंतर काही पदे अनारक्षित केलेली आहेत, ही पध्दत बरोबर नाही असे मी त्यांना सांगितले. शासनाच्या निर्णयाच्या विरोधात काही लोक हायकोर्टात गेले, हायकोर्टाने निर्णय देऊन सुद्धा मंत्रालयातून पदे अनारक्षित करण्याची कार्यवाही करण्यात येत नाही. हायकोर्टाच्या निर्णयामध्ये १९९० च्या शासन निर्णयाप्रमाणे ट्रिटमेंट देण्यात यावी असे म्हटले आहे. हायकोर्टाच्या निर्णयात पुढे असेही म्हटलेले आहे की, "...Under the Government Resolution dated 25th January,1990, the State Government has to approve the de-reservation of the post, if the post could not be filled in by appointing a reserve category candidate for a period of five years." परंतु मंत्रालयामध्ये 'जस्टीस' श्री. केंद्रे हे अधिकारी बसलेले आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, १९९० च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न करता १९९४ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. दुर्देवाने प्रश्नाच्या उत्तरात आता "१९९४ च्या शासन निर्णयातील अटी परिपूर्ण नसल्यामुळे हायकोर्टाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही" हा उल्लेख आलेला आहे. यासंदर्भात सुप्रिम कोर्टात शासनाने जाणे हा वेगळा भाग आहे. तसे झालेले नाही त्यामुळे हायकोर्टाच्या निर्णयाची अम्मलबजावणी बंधनकारक आहे. माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणाची गांभिर्याने नोंद घेऊन खामगांवच्या प्रकरणामध्ये मंत्रालयातून आपण जो स्टे दिलेला होता तो उठवून पदे अनारक्षित केलीत. याबाबतीतसुद्धा महाविद्यालय व विद्यापीठाने सांगितल्याप्रमाणे हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे १९९० च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करुन पदे अनारक्षित केल्याचे आदेश काढले जातील काय?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, अनेक वेळा वेगवेगळे शासकीय महामंडळे, स्वायत्त संस्था याची जी आरक्षित पदे आहेत ही पदे भरण्याची कार्यवाही आयोग पुरस्कृत निवड समित्यांद्वारे करण्यात येते. उमेदवारांच्या निवडीची विहित प्रक्रिया ठरविण्यात आलेली आहे. त्या प्रक्रियेमधून उमेदवार उपलब्ध होत नसल्यास काही प्रमाणात तात्पुरत्या स्वरुपात......

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, येथे आयोगाचा विषय नाही.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, २५ ऑगस्ट, २००५ रोजी सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात एक शासन निर्णय काढलेला आहे, बऱ्याचवेळा असे घडते की, नियुक्त्या ह्या तात्पुरत्या स्वरूपात केल्या जातात. तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त्या केल्यानंतर ...... (Interruptions). Sir, let me complete ज्यावेळी रेगुलर अपॉईंटमेंट करण्याची वेळ येते त्यावेळी एखाद्या संस्थेला आरक्षण कॅटॅगरीतील उमेदवार उपलब्ध झाला नाही तर त्या शिक्षण संस्थेतील त्या उमेदवाराची ती जागा रिक्त राहू नये यासाठी काय केले पाहिजे, याकरिता राज्य सरकारने वेळच्या वेळी निर्णय घेतले आहेत. त्याप्रमाणे ३० मार्च १९८१ मध्ये मागास वर्गीयांसाठी आरक्षण ठेवण्याचा निर्णय झाला. आणि १९८३ मध्ये आरक्षित कॅटॅगरीतील उमेदवार उपलब्ध झाला नाही तर बिगर मागासवर्गीयांच्या उमेदवाराची नियुक्ती त्या संस्थेने करावी अशाप्रकारची भूमिका घेण्यात आली. २९ सप्टेंबर ९८ ला एक वर्षामध्ये मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाही तर वेगळी भूमिका घेतली गेली. माननीय सदस्यांनी त्यासंबंधी २५ जानेवारी १९९० च्या जी.आर. चा उल्लेख केला. हायकोर्टाने त्या जी.आर. प्रमाणे कारवाई करावी असे म्हटले आहे. त्याच आधारावर ५ वर्षे ते पद राखीव ठेवावे आणि सहाव्या वर्षी मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ती जागा बीन राखीव करुन विहित पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तीला ती जागा द्यावी. **या संपूर्ण विषयामध्ये एखाद्या पदावर रिझर्व्ह कॅटॅगरीमधील उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ते पद डिरिझर्व्ह करुन ते ओपन कॅटॅगरीतील उमेदवारांना देण्याच्या संदर्भातील निर्णय घेण्याचा हा प्रश्न आहे.** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १८ एप्रिल २००६ : खंड १४२, क्रमांक २०, पृष्ठ ३-४)*

**४०.** न्यायालयाचा निर्णय झाला त्यातील काही उल्लेख सभागृहात वाचून दाखविण्यात आले त्यावेळेला "**सन १९९० चा शासननिर्णय हायकोर्टात प्रोड्युस करण्यात आला व त्या आधारावर हायकोर्टाने निर्णय दिला" असे मंत्रीमहोदय सभागृहात सांगत होते.** खरे म्हणजे त्यांच्या वकिलांनी सन १९९४ च्या शासननिर्णयाची जोरदार वकिली उच्च न्यायालयासमोर केली होती. याचिकाकर्त्यांच्या वतीने सन १९९० चा शासननिर्णय समोर करण्यात आला होता व दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने सन १९९४ चा शासननिर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही असा निर्णय दिला होता. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मंत्रिमहोदय सांगत आहेत ते बरोबर नाही. आपण समजून घ्या. हायकोर्टाच्या ऑर्डर्स मी माझ्या शब्दात कशाला

सांगू? Why should I argue about it? Mr. Chairman, Sir, I will quote the judgement of the High Court. Sir, I quote: "The **Government Resolution dated 25.1.1990 makes it imperative for the State to de-reserve the post in the event the candidate from the reserved category is not available for a period of five years the posts should be de-reserved from the sixth year."** याठिकाणी जज्जमेंट असे दिले आहे की, "Within two weeks from the date of receipt of the proposal from respondent no.6 College the State Government in turn is directed to issue necessary orders in regard to de-reservation of the post held by the petitioner and for regularisation of the petitioners services" माझे असे म्हणणे आहे की, हे ऑर्ग्युमेंट आपण आता इथे करण्यापेक्षा तिथे हायकोर्टात करायला पाहिजे होते. त्याठिकाणी तुम्ही तसे ते केले. अशा अनेक केसेसमध्ये मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. माझे म्हणणे असे की, मंत्रालयामध्ये चकरा मारायला लावण्याचे चक्र आपण तोडा. हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे कारवाई करा. यामध्ये मी तुम्हाला निर्णयाची पूर्व सूचना दिली आहे. तशी कारवाई आपण कराल काय?

**श्री. दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती मी सांगत होतो.. मुळात एखादा आरक्षित पदावर उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ते पद कसे भरावयाचे या संदर्भातील हा विषय आहे. त्या संदर्भात माननीय सदस्य २५ जानेवारी १९९० च्या जी.आर. चा संदर्भ सांगत आहेत. त्यासाठी तुम्ही कोर्टाच्या जज्जमेंटची प्रत आणली आहे, ती प्रत माझ्याकडेही आहे. **१९९० चा जी.आर. कोर्टामध्ये प्रोडयूस करण्यात आला व त्या आधारावर कोर्टाने निर्णय दिला. त्याच्यापुढे काही गोष्टी आहेत...** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १८ एप्रिल २००६ : खंड १४२, क्रमांक २०, पृष्ठ ४)*

**४१.** "सन १९९४ चा शासननिर्णय दुर्दैवाने कोर्टात दाखविला गेला नाही" असे प्रतिपादन मा.उच्च शिक्षणमंत्री करती होते. वस्तुतः त्यांचे हे उद्‌गार सरकारी वकिलांवर अन्याय करणारे होते. कारण सरकारी वकिलांनी हायकोर्टामध्ये सन १९९४ च्या शासननिर्णयाचे स्पष्टीकरण दिलेले होते. पण ते ऐकून सुद्धा कोर्टाचे आदेश सन १९९४ च्या शासननिर्णयाच्या विरोधात गेले. ही गोष्ट मा.उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून द्यावी लागली. तेव्हा "सन १९९० च्या शासननिर्णयाचा आधार घ्यायचा की, सन १९९४ च्या शासननिर्णयाचा आधार घ्यायचा याबाबतचा निर्णय घेण्यासाठी काही कालावधी लागेल" असे उत्तर मंत्रीमहोदयांनी दिले. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**सभापती :** माननीय सदस्यांनी माननीय मंत्र्यांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे. आपल्याला जर शंका असेल तर मी पुन्हा आपणास प्रश्न विचारण्याची परवानगी देतो.

**श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, २५ जानेवारीच्या जी.आर. मध्ये ५ वर्षापर्यंत हे पद राखीव ठेवावे आणि सहाव्या वर्षी जर मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ती जागा बीन राखीव करुन विहित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवाराला कायम करावे अशाप्रकारचा जी.आर. आहे.** त्या आधारे कोर्टामध्ये रिलिफ मागितले आहे. १९९१ मध्ये या संदर्भातील आणखी एक जी.आर. काढला गेला, **१९९४ मध्ये आणखी एक जी.आर. काढला गेला. दुर्दैवाने हा जी. आर. कोर्टामध्ये दाखविला गेला नाही.** एखादे आरक्षित असलेले पद डिरिझर्व्ह ठेवायचे असते त्यावेळी त्याबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाकडून आल्यानंतर तो प्रस्ताव सामाजिक न्याय, आदिवासी कल्याण विभाग या दोन्ही विभागाकडे जातो व नंतर मुख्य सचिवांकडे जाऊन वरच्या पातळीवर त्या संदर्भात निर्णय होत असतो. बऱ्याच केसेसमध्ये असे आढळून आलेले आहे की, राखीव कॅटेगरीतील उमेदवार उपलब्ध झाला नाही वा तो उमेदवार उपलब्ध होतोच असे नाही, त्या जागेवर ज्यांचे पोस्टींग केले जाते, ते उमेदवार तात्पुरत्या स्वरुपामध्ये असतात तरी देखील त्यांना प्रमोशन दिले जाते. **तो त्या ठिकाणी पाच-सहा वर्षे काम करीत आहे, असे म्हटल्यानंतर डी-रिझर्व्हेशन करुन, त्याला कायम स्वरूपामध्ये नेमणूक द्याव्यात अशाप्रकारची भूमिका आहे.**

**प्रा.बी.टी.देशमुख :** तसे कोर्टाचे आदेश आहेत.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** न्यायालयाचे आदेश आहेत,याची सरकारलाही जाणीव आहे. न्यायालयाचे आदेश असतांना देखील या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक २५ ऑगस्ट २००५ रोजी या संदर्भातील प्रस्ताव पाठविलेला होता. ज्यावेळेला विद्यापीठाकडून संस्थांकडून अशाप्रकारचा प्रस्ताव येतो, त्यावेळेला त्यांनी **चेक-लिस्टप्रमाणे प्रोसिजर पूर्ण करून राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला पाहिजे. तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केल्यानंतर त्या संदर्भात जी काही प्रोसिजर आहे, ती पूर्ण करून शासन निर्णय घेते.** तरी देखील प्रश्न शिल्लक रहातो. या संदर्भात हायकोर्टाचे जज्जमेंट आल्यानंतर, सुप्रीम कोर्टाचे एक जज्जमेंट आले. ते म्हणजे त्या संस्थेमध्ये रिझर्व्हेशनच्या पदावर लागलेल्या उमेदवाराला कायम करता येणार नाही. त्या पदाकरिता फ्रेश ऑर्डर काढून नव्याने नियुक्त केले पाहिजे, अशाप्रकारची सुप्रीम कोर्टाने भूमिका घेतलेली आहे. त्या आधारावर २५ ऑगस्ट २००५ चा जी.आर. सरकारने काढलेला आहे. त्यावेळेस अशाप्रकारच्या केसेस सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविल्या जातात. त्यावेळेला **१९९० च्या जी.आर.चा आधार घ्यायचा की १९९४ च्या जी.आर.चा घ्यायचा किंवा २००५ सालच्या जी.आर.चा आधार घेऊन कारवाई करावयाची या संदर्भामध्ये निश्चित प्रकारे निर्णय घेण्यासाठी, काही कालावधी लागणार आहे.** या संदर्भात सरकारला अधिक वेळ लागणार आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १८ एप्रिल २००६ : खंड १४२, क्रमांक २०, पृष्ठ ५)*

**४२.** पुढे पुन्हा प्रश्न असा आला की, त्यावर हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. थोडा वेळ लागण्याचे कारण काय? प्रश्नात अंतर्भूत नसलेल्या बाबींचा निर्णय घेण्यासाठी शासनाला कालावधी लागेल हे आपण सभागृहात सांगत आहात पण न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर कालावधी लागण्याचे कारणच काय? आता सभागृहात परिस्थिती अशी झाली की, मा.सभापतींचे सुद्धा समाधान होत नव्हते त्यामुळे त्यांनी "२० तारखेला आपण सर्व सदस्यांची बैठक बोलावितो" असा निर्णय दिला व तेथेच त्यादिवशीची चर्चा संपली. ती पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** या प्रश्नात अंतर्भूत नसलेल्या बाबींचा निर्णय घेण्यासाठी शासनाला कालावधी लागेल हे मी समजू शकतो. **पण ज्या प्रश्नाचा निर्णय हायकोर्टाने दिलेला आहे. तेथे कालावधी लागण्याचे कारण काय?** माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की, ते नियमित भरलेले नव्हते परंतु ही गोष्ट खरी नाही. ड्युली कॉन्स्टीट्युटेड सिलेक्शन कमिटीने त्यांची निवड केली व विद्यापीठाने ॲप्रूव्ह करुन रेग्युलर अपॉइन्ट केले होते. दरवर्षी जाहिरात दिली पाहिजे. रिझर्व कॅटेगरीतील उमेदवार मिळाल्यानंतर याला जावे लागेल असे प्रत्येक ऑर्डरमध्ये आहे. हायकोर्टाने ते तपासले आहे. शासनाच्या जी.आर.मध्ये असे आहे की, पाच वर्षे त्या कॅटेगरीतील उमेदवार मिळाला नाही तर ताबडतोब ते

---

*सहपत्र ६ : परिच्छेद ४५ पहा*

"अतितात्काळ : हस्तवटवड्याद्वारे

***महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय : विधान भवन, मुंबई***

**क्रमांक : २१८३६/ई-१ : दिनांक : २०.०४.२००६**

**प्रेषक :**

प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

विधानपरिषद सदस्य (मागील सूचीप्रमाणे)

**विषय :** "अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुद्धा पदे अनारक्षित करण्याची कारवाई न होणे" या विषयावरील श्री.नतिकोद्दीन खतिब व इतर वि.प.स. यांचा दिनांक १८ एप्रिल, २००६ रोजी उत्तरीत झालेला तारांकित प्रश्न क्रमांक १२७४२.

**संदर्भ :** या सचिवालयाचे प्रश्न क्रमांक २०९२५/ई-१, दिनांक १९ एप्रिल, २००६

महोदय/महोदया,

संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने निदेशानुसार कळविण्यात येते की, तारांकित प्रश्न क्रमांक १२७४२ अनुपूरक प्रश्नोत्तराने मा.सदस्यांचे समाधान झाले नसल्याने सदर प्रश्नावरील आज दिनांक २० एप्रिल, २००६ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित केलेली बैठक पुढे ढकलण्यात आली असून आता सदर बैठक गुरूवार, दिनांक २७ एप्रिल २००६ रोजी दुपारी १२.०० वाजता विधान भवन, मुंबई येथील मा.सभापती यांचे दालन कक्ष क्रमांक १४५ येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी उपरोक्त बैठकीस उपस्थित रहावे ही विनंती.

आपला

**(श्रीधर राजोपाध्ये)**

अवर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय"

पद डी-रिझर्व केले पाहिजे. हे सर्व लोक १९९० च्या अगोदरचे आहेत. हायकोर्टाचा निर्णय सुध्दा २००३ मधील आहे. हायकोर्टाचा २००३ चा निर्णय सन १९९४ च्या जी.आर.ने ओव्हर रुल करणे बरोबर नाही. अशा प्रकारे काही लोकांना मंत्रालयाने स्टे दिला. नंतर स्टे व्हॅकेट केला आणि ती पदे अनारक्षित केली. येथे तर हायकोर्टाचा निर्णय झाला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न विचारावा.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, यामध्ये प्रश्नाच्या बाहेरचे बरेच मुद्दे त्यांनी आणलेले आहेत. त्याचा निपटारा करुन मी माझा प्रश्न विचारतो. हे लोक दरवर्षी भरले होते हे म्हणणे चुकीचे आहे. ते ड्युली कॉन्स्टिट्युटेड सिलेक्शन कमिटीकडून निवड झाल्यावर अपॉइन्टेड तसेच ड्युली अॅप्रूव्हड होते. माझा असा प्रश्न आहे की, माननीय मंत्रिमहोदय जे म्हणत आहेत त्या सर्व मुद्यांचा विचार करून हायकोर्टाने निर्णय दिला. तो निर्णय एकाच बाबतीत नाही तर ५-१० बाबतीत दिलेला आहे. त्यातील काही बाबींच्या कॉपीज निवेदनाला जोडून आम्ही पाठविलेल्या आहेत. मंत्रालयातील 'जस्टीस केंद्रे' यांनी पत्र लिहिले आहे. हायकोर्ट असे म्हणते की....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपला प्रश्न विचारावा. मी यासंदर्भात असे करतो की, सन्माननीय मंत्रिमहोदय तसेच सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार, सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि इतर अन्य **सन्माननीय सदस्य असतील त्यांची २० तारखेला बैठक बोलवतो.**

**प्रा. बी.टी.देशमुख** : माननीय सभापती महोदय, आपण जे सांगितले ते माननीय मंत्री महोदयांना मान्य असेल आणि माननीय मंत्री महोदय हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणार असतील तर माझी त्याला ना नाही.

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, आपण जे सुचविले ते योग्य आहे. मिटींग घेण्यास माझी हरकत नाही. तरी देखील ज्या केसेस सादर केलेल्या आहेत त्या विहित कालावधीमध्ये तपासून घेण्यात येतील. **तसेच सरकारच्या निर्णयाचा अनादर करून एखाद्या अधिकाऱ्याने निर्णय केला असेल तर त्या अधिकाऱ्याला निलंबित केले जाईल."**

*(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक १८ एप्रिल २००६ : खंड १४२, क्रमांक २०, पृष्ठ ६-७)*

**४३.** विधानमंडळामध्ये एखाद्या प्रश्नाचा पाठपुरावा करतांना आपण घेतलेली भूमिका ही देशाच्या घटनेतील, संबंधित कायद्यातील व नियमातील तरतुदींना धरून आहे किंवा नाही? याची खात्री सदस्याला करून घ्यावी लागते. एकदा अशी खात्री झाल्यानंतर शासनाकडून येणाऱ्या, नोकरशाहीने असद्‌हेतुपूर्वक तयार केलेल्या, ठोकळेबाज उत्तरांनी नाउमेद न होता सतत पाठपुरावा सुरू ठेवला तर नोकरशाहीने घेतलेली ठोकळेबाज भूमिका उद्धवस्त केली जाऊ शकते, याचा मी अनेक वेळेला अनुभव घेतलेला आहे. तसाच अनुभव या प्रश्नाच्या बाबतीत दिनांक १८ एप्रिल २००६ रोजीच्या चर्चेच्या वेळी आला. या चर्चेच्या अगोदरपर्यंत उच्च शिक्षण विभागाची ठोकळेबाज भूमिका पुढीलप्रमाणे होती. :- **(i)** "विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव **दि. ५.१२.९४ च्या शासन निर्णयातील अटींनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही."** **(ii)** "पदे अनारक्षित करण्याबाबत नागपूर व अमरावती विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांचे **विद्यापीठाने पाठविलेले प्रस्ताव अपूर्ण असल्यामुळे त्यावर उपरोक्त शासन निर्णय दि. ५.१२.९४ नुसार कार्यवाही करता आलेली नाही."**

**४४.** खुद्द आजच्या तारखेला सुद्धा तारांकित प्रश्न क्रमांक १२७४२ या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये **"परंतु विद्यापीठाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दिनांक ५.१२.१९९४ च्या शासन निर्णयातील अटींनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही."** ही ठोकळेबाज भूमिका लेखी उत्तरात नमूद होती. मात्र आज सभागृहात झालेल्या चर्चेमध्ये जे मुद्दे समोर मांडल्या गेले ते लक्षात घेऊन चर्चेच्या शेवटी शेवटी मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांनी नोकरशाहीची ती ठोकळेबाज भूमिका बाजूला ठेवली व "त्यावेळेला **१९९० च्या जी.आर.चा आधार घ्यायचा की १९९४ च्या जी.आर.चा घ्यायचा किंवा २००५ सालच्या जी.आर.चा आधार घेऊन कारवाई करावयाची या संदर्भामध्ये निश्चित प्रकारे निर्णय घेण्यासाठी, काही कालावधी लागणार आहे.** या संदर्भात सरकारला अधिक वेळ लागणार आहे." अशी भूमिका घेतली. ही आजच्या चर्चेची एक फार मोठी उपलब्धी होती. आजच्या चर्चेची दुसरी मोठी उपलब्धी म्हणून मा.सभापतींनी घेतलेली भूमिका ही होय. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची शासन अंमलबजावणी करीत नाही व सर्वोच्च न्यायालयात अपील सुद्धा करीत नाही यामुळे अचंबित झालेल्या सभापतींनी या प्रश्नावरील चर्चा थांबवून सर्व संबंधितांची आपल्या दालनात बैठक घेण्यात येईल असे घोषित केले. ही सुद्धा एक फार मोठी उपलब्धी म्हणावी लागेल.

**४५.** या प्रश्नावरील चर्चा संपल्यानंतर पुढचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे मा.सभापतींच्या दालनात होणारी बैठक हा होता. ही बैठक २० एप्रिल २००६ रोजी होणार होती. परंतु मा.सभापतींनी ती बैठक पुढे ढकलण्यात आली असून दिनांक २७ एप्रिल २००६ रोजी होईल असे आम्हा सर्व सदस्यांना दिनांक २० एप्रिल २००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या अवर सचिवांचे दिनांक २० एप्रिल २००६ रोजीचे ते पत्र **सहपत्र : ६** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

**४६.** ठरल्याप्रमाणे ही बैठक गुरुवार, दिनांक २७ एप्रिल २००६ रोजी मा.सभापतींच्या दालनामध्ये पार पडली. या बैठकीला कोण कोण सदस्य उपस्थित होते याची माहिती नमूद असलेला या बैठकीच्या कार्यवृत्तातील सुरुवातीचा औपचारिक भाग पुढीलप्रमाणे :-

"दिनांक १८ एप्रिल, २००६ रोजीच्या प्रश्नोत्तरांच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक १२७४२ च्या संदर्भात गुरूवार, दिनांक २७ एप्रिल २००६ रोजी दुपारी १२.०० वाजता विधानभवन, मुंबई (कक्ष क्रमांक १४५) येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस पुढील मान्यवर व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री.शिवाजीराव देशमुख, माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद
(२) श्री.दिलीप वळसे-पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री
(३) प्रा.बी.टी.देशमुख, वि.प.स.
(४) डॉ.वसंत पवार, वि.प.स.
(५) प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.अ.ना.कळसे, सचिव
श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव
श्री.श्रीधर राजोपाध्ये, अवर सचिव
श्री.अर्जून पिंपळे, कक्ष अधिकारी

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री.अशोक खोत, अपर मुख्य सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग
(२) श्रीमती जॉयस शंकरन, प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग
(३) श्री.भि.क.उसारे, उप सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग"

**४७.** दिनांक २७ एप्रिल २००६ रोजी मा.सभापतींच्या सभा दालनातील बैठक सुरू होण्यापूर्वी पाच-दहा मिनिटे अगोदर मी बैठकीच्या दालनात पोहचलो. उच्च शिक्षण विभागाच्या सचिव श्रीमती जॉयस शंकरन ह्या सुद्धा तेथे आल्या. अजून सभापती त्यांच्या दालनातून सभा बैठकीच्या दालनात आलेले नव्हते. औपचारिक बैठक सुरू होण्यापूर्वी श्रीमती शंकरन मला म्हणाल्या की, "बीटी साहेब! या लोकांनी सन १९९४ च्या शासननिर्णयाप्रमाणे त्यांचे प्रस्ताव सादर केले पाहिजे, पण ते त्यांनी सन १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे तयार करून पाठविले आहे ही मुख्य अडचण आहे." त्यावर मी त्यांना असे म्हणालो की, "सन १९९४ च्या शासननिर्णयाप्रमाणे की, सन १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे प्रस्ताव सादर करावयाचे याबाबतीत उभयपक्षांनी मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर आपआपले म्हणणे मांडले व ते ऐकून घेतल्यानंतर मा.उच्च न्यायालयाने सन १९९० च्या शासननिर्णयाच्या बाजूने निर्णय दिला. तुम्ही तुमचे जे काही म्हणणे आहे ते उच्च न्यायालयासमोर मांडायला पाहिजे होते." त्यावर सचिव असे म्हणाल्या की, "मा.न्यायालयाने आमचे म्हणणे ऐकून घेतले नाही. १०.३० वाजता कोर्ट सुरू झाले आणि १०.४० वाजता निर्णय झाला." त्यांचे हे म्हणणे ऐकून घेतल्यावर आपण आता त्यावर काहीच बोलावयाचे नाही असा मी निर्णय घेतला. याचे एक कारण असे की, ते अनौपचारिक बोलणे होते व दुसरे कारण असे की, न्यायालयाच्या कामकाजाबाबत व नियमांबाबत सचिवांचे अज्ञान स्पष्टपणे दिसत होते. याबाबतीत नियमांची स्थिती अशी आहे की, उच्च न्यायालयाच्या एका खंडपीठाने निर्णय दिला असेल तर दुसरे खंडपीठ त्या प्रश्नाच्या बाबतीत विपरित निर्णय देऊ शकत नाही. इथे तर चार-पाच खंडपीठांचे निर्णय पूर्वी झालेले होते व ते निर्णय याचिकेसोबत जोडलेले होते. मा.न्यायमूर्ती ही कागदपत्रे वाचून येत असतात व त्यामुळे दहा मिनिटातच तत्सम निर्णय होणे

शक्य होते. हे सचिव महोदयांना समजावून सांगण्यात काही अर्थ नव्हता. तेवढ्यातच मा.सभापती व मा.उच्च शिक्षणमंत्री सभापतींच्या दालनातून सभा दालनात आले व बैठकीचे औपचारिक कामकाज सुरू झाले.

**४८.** मा.सभापतींनी सुरुवातीला आजच्या बैठकीची औपचारिक माहिती दिली. त्यानंतर मी स्वतः उच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर सुद्धा त्याची अंमलबजावणी का होत नाही? याचे उत्तर मंत्रिमहोदय किंवा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिले पाहिजे असे विचार मांडले. यावर विभागाच्या वतीने सदरहू प्रश्नाशी अजिबात संबंध नसलेल्या काही बाबी नमूद करण्यात आल्या. सामान्य प्रशासन विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी कल्याण विभाग यांच्याकडे फाईल कशी फिरते व याबाबतची प्रोसीजर कशी असते याची माहिती विभागातर्फे सभेत देण्यात आली. ती चर्चा शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**सभापती :** सर्वप्रथम मी आजच्या बैठकीस उपस्थित असलेले सर्व सन्माननीय सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करतो. आता आपण बैठकीच्या कामकाजास सुरुवात करू. दि. १८.०४.२००६ रोजी विधानपरिषदेमध्ये "अनेक प्रकरणांत हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर सुद्धा पदे अनारक्षित करण्याची कार्यवाही न होणे" या विषयाच्या संदर्भात ता.प्र.क्र. १२७४२ चर्चेला आला होता, त्यावेळी या विषयाच्या अनुषंगाने पुष्कळ चर्चा झाली होती. त्यावेळी मी असे सांगितले होते की, या बाबतीत दि. २०.०४.२००६ रोजी बैठक घेऊ. परंतु सदर दिवशीच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये पुष्कळ कामकाज असल्यामुळे मी स्वतः सदरहू बैठक पुढे ढकलली. आज गुरूवार, दि. २७.०४.२००६ रोजी सदरची बैठक आयोजित करण्यात आली आहे. हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. विधानपरिषदेमध्ये या विषयावर सखोल चर्चा झाली आहे. परंतु त्या दिवशी आपण निर्णयाप्रत पोहचू शकलो नव्हतो. तरी आजच्या बैठकीमध्ये यामधून कसा मार्ग काढता येईल? याबाबत आपण चर्चा करणार आहोत.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, विधानपरिषदेच्या इतिहासामध्ये अशा प्रकारच्या अनेक बैठका झाल्या आहेत. अशा बैठकांमध्ये संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित राहत असल्यामुळे त्यांना सुद्धा चर्चेमध्ये सहभागी होता येते. सभापती महोदय, आरक्षणाच्या संदर्भात एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी का होत नाही? हा मूळ प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर या ठिकाणी उपस्थित असलेले माननीय मंत्रिमहोदय व अधिकारी वर्ग देऊ शकतील असे मला वाटते.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात जी.ए.डी.ची. भूमिका जास्त महत्त्वाची आहे. मी समितीला याबाबतची थोडक्यात माहिती सांगतो. एखाद्या संस्थेमध्ये आरक्षणाचे पद भरावयाचे असेल तर त्यासाठी जाहिरात काढली जाते. परंतु जाहिरात देऊन सुद्धा उमेदवार मिळत नसल्यामुळे सदरचे पद रिक्त राहते. त्या जागेवर कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर उमेदवार नेमला जातो, यासाठी संबंधित विभागांची परवानगी घ्यावी लागते. परंतु सदरच्या आरक्षित जागेवर एक वर्ष, दोन वर्षे, चार वर्षे किंवा पाच वर्षे संबंधित संवर्गातील उमेदवार मिळाला नाही तर काय करायचे? हा प्रश्न निर्माण होतो. त्यावेळेला आरक्षित पदाच्या संदर्भात संबंधित विद्यापीठाकडून उच्च व तंत्रशिक्षण किंवा शालेय शिक्षण विभागाकडे प्रस्ताव येतो. त्या प्रस्तावावर या विभागाकडून चर्चा करून सदर प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी कल्याण विभागाकडे जातो. या प्रस्तावाच्या संदर्भात एखाद्या विभागाची सहमती असली तरी उर्वरित विभागांची त्याला अनुमती असतेच असे नाही. कारण हा चार विभागांचा एकत्रित विषय आहे.

**सभापती :** या संदर्भात चार लोकांच्या बाबतीत उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे तेवढ्यापुरताचा आजचा विषय मर्यादित आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** या विषयाच्या अनुषंगाने आपल्याला बैठकीमध्ये जनरल चर्चा सुद्धा करता येऊ शकेल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आज बैठकीमध्ये जो विषय चर्चेला घ्यावयाचा आहे, त्याबाबतीतच चर्चा होणे गरजेचे आहे, जनरल चर्चा नंतर करता येईल. या संदर्भात मी एक केस आणली आहे. त्यामध्ये पब्लिक सर्व्हिस कमिशनची परवानगी घेतल्याशिवाय पदे भरता येऊ शकत नाहीत असे सांगण्यात आले आहे. आजच्या विषयाच्या अनुषंगाने कोर्टाने स्पष्टपणे म्हटले आहे की, सचिवांनी कोर्टात हजर राहून आवश्यक असलेली कागदपत्रे दाखल करावी. परंतु त्या ठिकाणी सचिव हजर झालेले नाहीत. हायकोर्टाच्या आदेशामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, "Coercive measures will have to be adopted to secure his presence." सभापती महोदय, या बाबतीत कोर्टाचे आदेश असल्यामुळे त्यानुसार पदे भरणे अत्यावश्यक आहे.

**श्रीमती शंकरन :** सभापती महोदय, मी या संदर्भात सांगू इच्छिते की, आरक्षित पदे भरण्यासंबंधी कोर्टाचे आदेश असले तरी प्रोसिजरप्रमाणे सदर प्रस्ताव वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाकडे जाणे अत्यावश्यक असते. याप्रमाणे प्रोसिजर फॉलो कराव्या लागतात. प्रोसिजरच्या संदर्भात शॉर्टकट नाही."

**४९.** ही चर्चा ज्यावेळेला पुढे सुरू झाली त्यावेळेला मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा प्रश्न पुन्हा चर्चेला आला. या चर्चेमध्ये उच्च शिक्षण सचिवांनी एकदा "या संबंधित जे काही करावयाचे असेल ते सामान्य प्रशासन विभागाला करावे लागणार आहे" असे मत व्यक्त केले. तेव्हा खुद्द सभापतींनी त्यावर "तुम्ही तुमचे हे मत सरकारचे मत म्हणून उच्च न्यायालयासमोर मांडायला पाहिजे होते" असे विचार व्यक्त केले. सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी पुन्हा सन १९९० व १९९४ च्या शासननिर्णयाचा विषय काढला. त्यावर उच्च शिक्षण सचिवांनी "सन १९९४ चा शासननिर्णय काढल्यामुळे सन १९९० चा शासननिर्णय आपोआपच supersede होतो असे मत मांडले. मग त्यांना हे सांगावे लागले की, तुमच्या वकिलांनी हायकोर्टात काय सांगितले? तर त्याबाबतीत उच्च न्यायालयाच्या निर्णयात असे नमूद आहे की, "No one has disputed the entitlement of the petitioner to be regularised for the post in the 6th year as provided in the Government Resolution dated 25.1.1990." त्यावर उच्च शिक्षण सचिवांनी "जेव्हा शासननिर्णय निघतो तेव्हा त्या आधीच्या शासनिर्णयाची माहिती नव्हती असे म्हणणे बरोबर नाही" असे 'जनरल नॉलेज' नमूद असलेले उद्‌गार काढले. कोर्टातील कामकाज हे 'जनरल नॉलेज'च्या आधारावर होत नाही. त्यावरून मूळ वाक्य नमूद करावे लागले. याबाबतची चर्चा ही पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** याबाबत सर्वोच्च न्यायालयात अपील करावे. आरक्षित पदे भरण्याच्या संदर्भात हायकोर्टाचे आदेश असताना सुद्धा सदर आदेश अशा पद्धतीने ट्रीट केले तर त्याला काहीच अर्थ राहणार नाही. तसेच हायकोर्टाने १९९० च्या आदेशाप्रमाणे अंमलबजावणी करा असे सांगितलेले आहे. असे असताना सुद्धा हायकोर्टाच्या आदेशाला ओव्हररूल करून निर्णय घेतला जात आहे, या संदर्भात आपण सुप्रिम कोर्ट आहात काय?

**श्रीमती शंकरन :** या संबंधी जे काही करावयाचे असेल ते सामान्य प्रशासन विभागाला करावे लागणार आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, ज्यावेळी हायकोर्टामध्ये रिट पिटीशन दाखल झाले, त्यावेळी विभागाला आपले म्हणणे मांडण्यासाठी हायकोर्टाने बोलावले होते. त्यावेळी विभागाने त्यांच्या अंतर्गत सर्व फॉर्मलिटीज विचारात घेऊन आपले म्हणणे कोर्टापुढे सादर केले असते तर ते सरकारचे मत झाले असते.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सरकारी वकीलाने असे म्हटलेले आहे की, चार आठवड्याच्या आत ऑर्डर पास करू. हायकोर्टामध्ये झालेले हे आर्ग्युमेंट आहे. सन १९९४ चा जी.आर. सन १९९० मध्ये कसा काय लागू होईल? हे डेलिगेटेड लेजिस्लेशन आहे. डेलिगेटेड लेजिस्लेशन हे रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टने कसे लागू करता येईल?

**श्री.अशोक खोत :** शासनाच्या पॉलिसीप्रमाणे आपण जी.आर. काढलेला आहे. विशिष्ट विषय त्या त्या विभागाने हाताळावयाचा असतो. शिक्षण विभागाने दिनांक २५.०१.१९९० रोजी जी.आर. काढलेला आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** कोर्टाचे जे जज्जमेंट आहे ते आपण सांगावे.

**श्री.अशोक खोत :** सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ५ डिसेंबर, १९९४ रोजी जी.आर. काढलेला आहे. या केसमध्ये असे झालेले आहे की, मागासवर्गीयाची जागा ओपनला देण्यात आलेली आहे. आता निर्णय आपल्याला घ्यावयाचा आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** निर्णय आपल्याला घ्यावयाचा आहे म्हणजे? हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. आपण येथे सुप्रिम कोर्ट म्हणून बसलेलो नाही.

**श्री.अशोक खोत :** या केसमध्ये त्यांच्यासमोर हा जी.आर. आलेलाच नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख :** ही जबाबदारी कोणाची आहे?

**श्री.अशोक खोत :** ही संबंधित विभागाची जबाबदारी आहे.

**सभापती :** सामान्य प्रशासन विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी

विभाग अशा सर्व संबंधित विभागांना विश्वासात घेऊन जर जी.आर. काढला गेला तर ते "गर्व्हमेंट ओपिनीयन" ठरले असते.

**श्रीमती शंकरन :** सामान्य प्रशासन विभागाने सन १९९४ मध्ये जी.आर. काढल्यामुळे आधीचा जी.आर. आपोआपच सुपरसिड होतो.

**प्रा.बी.टी.देशमुख :** हायकोर्टाने सरकारी वकीलाला असे विचारले की, १९९४ चा जी.आर. १९९० च्या स्वप्नात कसा काय येईल? आपल्या माहितीसाठी मी आपल्याला सांगू इच्छितो की, "No one has disputed the entitlement of the petitioner to be regularised for the post in the 6th year as provided in the Government Resolution dated 25.1.1990." असे वाक्य त्या जजमेंटमध्ये नमूद केलेले आहे.

**श्रीमती शंकरन :** हायकोर्टाने शासनाच्या विरुद्ध निकाल दिला तर आपण सुप्रिम कोर्टामध्ये जातो. जेव्हा जी.आर. निघतो तेव्हा आधीच्या जी.आर. ची माहिती नव्हती असे म्हणणे बरोबर नाही."

**५०.** सरकारी वकिलांनी न्यायालयात काय सांगितले? ते न्यायालयाच्या जजमेंटमध्ये नमूद केलेले आहे हे आम्ही पुन्हा पुन्हा सांगितले. ते वाचूनही दाखविले. असे असतांना "डी-रिझर्व्हेशनच्या बाबतीत जे नियम आहेत, ते स्ट्रीक्टली फॉलो केले पाहिजेत" असे मत उच्च शिक्षण सचिवांनी व्यक्त केले. असे करतांना सन १९९० आणि १९९४ च्या शासननिर्णयाचा निकाल उच्च न्यायालयात लागलेला असतांना केंद्रे नावाचा अधिकारी सन १९९४ च्या शासननिर्णयाप्रमाणे कार्यवाही करा असे पत्र कसे काय पाठवू शकतो? सुप्रीम कोर्टाचे अधिकार या केंद्रेला कोणी दिलेले आहेत? त्याचे हे वर्तन योग्य नाही असे आम्ही सांगितले. त्यावर उच्च शिक्षण सचिवांनी "आम्ही हे प्रकरण सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करू" असे उद्‌गार काढले. ती चर्चा पुढीलप्रमाणे:-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** सरकारी वकीलाने तेथे काय सांगितले हे जज्जमेंटमध्ये नमूद केलेले आहे.

**श्रीमती शंकरन :** रेकॉर्डवरून असे दिसते की, त्या ठिकाणी ॲफिडेव्हीट देखील फाईल झालेले नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सरकारी वकील त्या ठिकाणी हजर होते. सन १९९० चा जी.आर. मान्य करावा का सन १९९४ चा जी.आर. मान्य करावा याबावत त्या ठिकाणी वाद झाला.

**सभापती :** या केसमध्ये जर सरकारने ॲफिडेव्हीट केले असते व वकीलांना ब्रिफ केले असते तर हा प्रश्न निर्माण झाला नसता.

**श्रीमती शंकरन :** परंतु तसे घडलेले नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख :** जज्जमेंटमध्ये काय म्हटलेले आहे ते मी आपणाला वाचून दाखवितो. "No one has disputed the entitlement of the petitioner to be regularised for the post in the 6th year as provided in the Government Resolution dated 25.1.1990."

**श्रीमती शंकरन :** डी-रिझर्व्हेशनच्या बाबतीत जे नियम आहेत, ते स्ट्रीक्टली फॉलो केले पाहिजेत.

**प्रा.बी.टी.देशमुख :** स्ट्रीक्टली फॉलो केले पाहिजेत हे आपले म्हणणे बरोबर आहे, परंतु वस्तुतः तसे होत नाही. श्री. केंद्रे यांनी मंत्रालयातून असे पत्र पाठवावयास नको होते. That does not allow somebody to sit in the Mantralaya and act as a Supreme Court. ते अशोभनीय आहे. त्यांनी आपल्या मर्यादा ओळखावयास पाहिजे. श्री. केंद्रे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तसे ब्रिफ केले. या प्रकरणामध्ये सन १९९० चा शासननिर्णय लागू होतो, माननीय हायकोर्टाच्या जज्जमेंटमध्ये हे आल्यानंतर सुद्धा श्री. केंद्रे यांनी १९९० च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न करता १९९४ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करा असे पत्र पाठविणे योग्य नाही.

**श्रीमती शंकरन :** आम्ही हे प्रकरण सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करू."

**५१.** आता प्रश्न असा निर्माण होतो की, आता हे प्रकरण सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावयाचे तर त्या सामान्य प्रशासन विभागाला न्यायालयात बाजू मांडायला तुम्ही का पाठविले नाही? न्यायालयासमोर तुम्ही बाजू मांडली आणि निकाल विरोधात गेला तर आता सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविता. सामान्य प्रशासन विभाग हे काय सर्वोच्च न्यायालय आहे काय? असे विचारण्याचे मनामध्ये आले तरी या बैठकीमध्ये तसा प्रश्न विचारून काही साध्य होण्यासारखे नव्हते.

**५२.** या चर्चेमध्ये मा.उच्च शिक्षणमंत्री पुन्हा पुन्हा अमरावती विद्यापीठातील उमेदवारांचा उल्लेख करीत होते. त्यामुळे जणूकाही हा प्रश्न फक्त अमरावती विद्यापीठापुरताच आहे अशी त्यांची भावना झाली होती. याबाबतची वस्तुस्थिती अशी होती की, राज्यातील सर्वच विद्यापीठांमध्ये ही प्रकरणे होती व मुंबई तसेच औरंगाबाद खंडपीठांचे निर्णय नागपूर खंडपीठाच्या अगोदरच झालेले होते. शिवाय विभागाने जी टिप्पणी शिक्षणमंत्र्यांकडे सोपविली होती त्या टिप्पणीमध्ये या प्रकरणाशी संबंधित नसलेल्या चंचल गोयल विरुद्ध राजस्थान शासन या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयाचा उल्लेख होता व त्याबाबतची माहिती उच्च शिक्षणमंत्री पुन्हा पुन्हा देत होते. तेव्हा सुप्रीम कोर्टच्या केसचा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही, तो विषय वेगळा होता. ही गोष्ट सांगावी लागली. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**श्री.दिलीप वळसे-पाटील :** मला विभागाने जी नोट दिली त्यामध्ये काही विसंगती असेल तर आपल्याला त्यामध्ये करेक्शन करता येईल असे माझे मत आहे. अमरावती विद्यापीठामध्ये आरक्षणाच्या जागांवर ओपन उमेदवारांची नियुक्ती तात्पुरत्या स्वरूपात होती. त्या जागा कन्फर्म करण्यासाठी शासनाची मान्यता घ्यावी लागते. रिझर्व्हेशन किंवा डी-रिझर्व्हेशनच्या बाबतीत सामाजिक न्याय विभाग व सामान्य प्रशासन विभागाकडे प्रकरण पाठवून त्यांची परवानगी घेतली जाते. परंतु त्यांनी शासनाची मान्यता घेतली नाही. त्यामुळे ती पदे नियमित करता येत नाहीत. जर ती पदे नियमित केली तर लेखा परीक्षकांकडून आक्षेप काढण्यात येतात. अमरावती विद्यापीठामध्ये ज्या उमेदवारांवर अन्याय झाला ते कोर्टात गेले, त्यांच्यामुळे ही केस पुढे आलेली आहे. त्यामुळे ज्या लोकांना प्रमोशन मिळणार होते त्यांना प्रमोशन मिळाले नाहीत, ओपन कॅटेगरीतील लोकांना प्रमोशन मिळाले नाही, त्यांना प्रमोशन मिळावयास पाहिजे म्हणून ते लोक कोर्टात गेले.

**प्रा.बी.टी.देशमुख :** प्रमोशनच्या मिळण्याचा हा प्रश्न नाही. ज्या लोकांनी १६-१६ वर्षे सेवा केली आहे, त्यांना सेवा ज्येष्ठतेप्रमाणे प्रमोशन मिळाले पाहिजे. जे लोक निवृत्त होतात त्यांच्या जागी आपण नवीन भरती करतो, आरक्षणाच्या संदर्भात ते लोक कोर्टात गेलेले आहेत.

**श्रीमती शंकरन :** रेकॉर्डवरून असे दिसते की, २ मार्च २००५ रोजी ही याचिका ॲडमिट झाली व त्याच दिवशी त्याचा निर्णय देखील लागलेला आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** ज्यांना कायद्याची माहिती आहे त्यांना हे ठाऊक असते, पुरावे पाहून हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्यावर दुसऱ्या खंडपीठाला वेगळा निर्णय देता येत नाही. त्यामुळे पुढील निकाल हा एक दिवसामध्ये लागतो. मॅडम सचिव महोदयांनी सांगितले ते बरोबर आहे. पहिल्या निकालाच्या वेळीच सुनावणी होते. थोडक्यात म्हणजे सायक्लोस्टाईल पिटीशन आणि सायक्लोस्टाईल जज्जमेंट अशी सध्या परिस्थिती झालेली आहे. तो वेगळा विषय आहे, आपण हायकोर्टाच्या निर्णयावर चर्चा करणे उचित होणार नाही, असे मला वाटते.

**५३.** मा.सभापतींच्या अध्यक्षतेखाली बैठक होत आहे. तुम्ही उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी अजूनही केली नाही. सर्वोच्च न्यायालयात अपील सुद्धा केलेले नाही तेव्हा उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणारे आदेश आपण काढतो असे आपण स्पष्टपणे सांगितले पाहिजे. असे मत मांडले असता "लगेचच याबाबत मत व्यक्त करणे योग्य होणार नाही. मी "Yes" म्हणालो आणि लिगल ओपिनिअन वेगळे आले तर अवघड होईल" असे उद्‌गार मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी काढले. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** मी केअरफुली ते जजमेंट वाचले आहे. सुप्रिम कोर्टाचा निर्णय दोन गोष्टींबाबत आहे. (1) Those who are not recruited legally through constitutional mechanism. (2) Persons not selected by duly constituted authority.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** हा निर्णय वाचून दाखविण्याचे कारण असे होते की, हा केसचा मूळ गाभा आहे. हायकोर्टाने दिलेला निर्णय आपण फॉलो करतो.

**सभापती :** जे ओपिनियन आहे त्याच्याशी संबंधित कोणते विभाग आहेत याची विभागाने नोंद घेतली पाहिजे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** हायकोर्टाचा निर्णय आल्यानंतर सरकार तो जसाच्या तसा इम्प्लिमेंट करीत नाही. माईंड ॲप्लाय करून, संपूर्ण प्रकरण तपासून पुन्हा कोर्टाकडे विचारणा करण्यात येते आणि त्यानंतर कोर्टाच्या

निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत भूमिका घेतली जाते.

**सभापती :** परंतु या प्रकरणी हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतर सरकार सुप्रिम कोर्टात गेलेले नाही. तसे न झाल्यामुळे हायकोर्टाचा जो निर्णय आहे तो इनटॅक्ट आहे..

**प्रा.बी.टी.देशमुख :** विभागाचा हट्टच असेल तर तुम्ही सुप्रिम कोर्टात जाऊ शकता. अन्यथा सुप्रिम कोर्टात जाण्याची आवश्यकता नाही. हायकोर्टाची अशी ऑर्डर आहे की, "The State Government in turn is directed to issue necessary orders in regard to the dereservation of the post held by the petitioner ...."

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** हायकोर्टाचा निर्णय किती तारखेचा आहे? व विभागाने त्याबाबत कोणती कार्यवाही केली?

**श्री.उसारे :** हायकोर्टाचा निर्णय २ मार्च २००५ रोजीचा आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** विभागाने दिलेली माहिती बरोबर नाही. हायकोर्टाने दि. ४ सप्टेंबर, २००४, ११ ऑक्टोबर २००४, १५ फेब्रुवारी २००५ व २ मार्च २००५ रोजी निर्णय दिलेले आहेत.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** या निर्णयाच्या आधारे विभागाने कोणती कार्यवाही केली आहे?

**श्रीमती शंकरन :** विविध विभागांचे अभिप्राय घेण्याचे काम चालू आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** या संदर्भात मी एक इंटर्नल बैठक घेऊन ॲडव्होकेट जनरल व विधी व न्याय विभागाच्या सचिवांचे मत घेतो.

**प्रा.बी.टी.देशमुख :** याबाबत हायकोर्टाच्या स्पष्ट ऑर्डर्स असल्यामुळे, आम्ही या प्रकरणी हा ॲटिट्यूड घेतो, असे माननीय सभापतींना आपण फायनल सांगितले पाहिजे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** आता लगेचच याबाबत मत व्यक्त करणे योग्य होणार नाही. कारण समजा मी या संदर्भात "Yes" म्हणालो आणि लिगल ओपिनिअन वेगळे आले तर अवघड होईल."

**५४.** मा.उच्च शिक्षणमंत्री एका बाजूला विभागाने त्यांना दिलेल्या टिप्पणीमध्ये बांधून दिलेली भूमिकाच घेत होते त्यापासून दूर जायला ते तयार नव्हते. तर दुसऱ्या बाजूला हायकोर्टाचा निर्णय कोणत्या तारखेचा आहे? असे त्या विभागाला विचारत होते. विभागाला ते सांगता येत नव्हते. आम्ही तारखा सांगितल्यावर "त्यावर विभागाने कोणती कार्यवाही केली?" असे मंत्रिमहोदयांनी विभागाला विचारले. त्यावर "विविध विभागाचे अभिप्राय घेण्याचे काम चालू आहे" असे उत्तर आले. शेवटी "समाज कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभाग या चारही विभागांच्या सचिवांनी या संदर्भात बैठक घेऊन याविषयी मला अप्राईज करावे" असे उद्गार मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी काढले व तेथेच त्यादिवशीची चर्चा संपली. ती पुढीलप्रमाणे :-

"**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आताच म्हणाले की, आपण माननीय सभापतींसमोर या संदर्भात कमिटमेंट करा.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मी एवढेच म्हणालो की, हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे हे आपले कर्तव्य आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** कोणत्याही न्यायालयाचा आदर करून, न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे सरकारला निर्णय घ्यावाच लागतो. फक्त हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करताना जी प्रोसेस असते, ती फॉलो करावी लागते.

**प्रा.बी.टी.देशमुख :** असे करू नये, अशाप्रकारे जर आपणास कोणी सामान्य प्रशासन विभागाचा अधिकारी सांगत असेल तर त्याला या संदर्भात ॲफेडेव्हिट करण्यास सांगावे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** याबाबत जी प्रोसिजर आहे, ती फॉलो करावी लागेल. प्रोसिजर नसेल तर कोणीही या पोस्ट्स डिरिझर्व्ह करू शकेल. सभापती महोदय, त्या वर्गांवर अन्याय होऊ नये म्हणूनच प्रोसिजर तयार केली आहे. समाज कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग या सर्व विभागांच्या प्रोसिजरप्रमाणेच सर्व प्रकरणांत प्रोसिजर फॉलो करण्यात येत आहे.

**सभापती :** माननीय मंत्रिमहोदय, आपले शंभर टक्के बरोबर आहे. या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाचे मत काय आहे, हे देखील पाहिले पाहिजे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** अशा प्रकरणांसंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने प्रोसिजर ठरवून दिलेली आहे. सभापती महोदय, रिझर्व्ह पोस्ट्स डिरिझर्व्ह करण्यासंदर्भात समाज कल्याण विभागाशी चर्चा केली असता, त्यांच्याकडून सांगण्यात येते की, अशी परिस्थिती जरी असेल तरीही आमची या गोष्टीला संमती नाही.

**डॉ.वसंत पवार :** डिरिझर्व्ह झालेल्या पोस्टवर जर एखाद्याने पूर्वी ७-८ वर्षे काम केले असेल तर त्याला आपण संरक्षण देणार का?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** नाही. त्यांना संरक्षण देता येणार नाही. कारण या संदर्भात सुप्रिम कोर्टाने निर्णय दिला आहे की, नवीन पोस्ट्स भरताना प्रॉपर प्रोसिजर फॉलो करूनच पोस्ट भरल्या पाहिजेत. आम्ही परत एकदा या संदर्भात चर्चा करतो. समाज कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभाग या चारही विभागांच्या सचिवांनी या संदर्भात बैठक घेऊन याविषयी मला अप्राईज करावे.

**सभापती :** माननीय मंत्रिमहोदयांनी आताच सांगितले आहे की, या संदर्भात संबंधित विभागांच्या सचिवांनी एकत्र बसून चर्चा करावी व माननीय मंत्रिमहोदयांना ब्रिफ करावे."

**५५.** अमरावती विद्यापीठातील शिक्षकांच्या मुळेच हा प्रश्न निर्माण झालेला आहे अशा प्रकारची भावना मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांची झालेली होती. मा.सभापतींच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये त्यांनी तसे बोलनूही दाखविले होते. वस्तुतः त्यांची ही माहिती बरोबर नव्हती. हा राज्यव्यापी प्रश्न होता. सर्वच विद्यापीठांमध्ये असे शिक्षक होते. मात्र स्थळ समिपतेमुळे सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करण्याची आधारभूत कागदपत्रे ही अमरावती विद्यापीठातील

***सहपत्र ७ : परिच्छेद ७६ पहा***

***क्रमांक संमाबाअवि/२०/बीसीसी/एम/१९८८/२००६***
***दिनांक ०५ ऑक्टोबर २००६***

प्रति,
**श्री. रा.वो. सरवदे,**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२

**विषय :-** अमरावती विभागातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील पदे अनारक्षित करण्याबाबत.

महोदय,

**आपण दूरध्वनीवरून दिलेल्या संदेशाप्रमाणे तसेच फॅक्सद्वारे पाठविलेल्या यादीतील अधिव्याख्यात्यांच्या संदर्भात कळविण्यात येते की,** या विद्यापीठात शासन निर्णय क्रमांक एएमयु-२५९९/(१७७/९९)/विशि-२, दिनांक १२ जानेवारी, २००४ अन्वये मागासवर्ग कक्ष सुरू करण्यास शासनाने परवानगी दिली असून दिनांक १९.३.२००४ पासून मागासवर्ग कक्ष सुरू झालेला आहे. त्यापूर्वी सं.तु.म.नागपूर विद्यापीठाच्या विशेष विभागाकडे या विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाची जबाबदारी होती. त्यानुसार सं.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या विशेष विभागाकडून सोबत जोडलेल्या यादीतील अनुक्रमांक १,२,३,७,८,९,१०,१२,१३,१४ व १८ वरील अधिव्याख्यातांना खुल्या प्रवर्गात व अ.क्र. १५ वरील अधिव्याख्यात्यास विमुक्त जाती प्रवर्गात नियुक्त करण्यात आल्याचे प्रमाणित करुन देण्यात आलेले आहे. तद्वतच, अनुक्रमांक ४,५,११,१६ व १७ वरील अधिव्याख्यातांना सदर महाविद्यालयाने सादर केलेल्या अभिलेखाच्या आधारे खुल्या प्रवर्गात नियुक्त करण्यात आल्याचे या विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाने प्रमाणित करुन दिले आहे. अनुक्रमांक ६,१९ व २० वरील अधिव्याख्यात्यांची बिंदूनामावलीत नोंद नाही.

उपरोक्त माहितीवरून शासनाचे समाधान होईल अशी अशा आहे.

आपला विश्वासू
**(डॉ.कैलाश खामरे)**
कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

***अमरावती विभागातील अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील आरक्षित पदे अनारक्षित करण्याबाबतचा प्रस्ताव***

*(एकूण २० शिक्षकांचा प्रस्ताव सोबत दिला असून तो पृष्ठ १० वर दिलेल्या दिनांक ४ नोव्हेंबर २००६ च्या पत्रासोबत दिलेल्या प्रमाणे आहे)*

शिक्षकांनी आणून दिलेली होती. या भागातील पाच शिक्षकांनी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे याचिका दाखल करून निर्णय त्यांच्या बाजूने झालेला होता. खरे म्हणजे अमरावती विद्यापीठामध्ये अशा शिक्षकांची संख्या जवळ जवळ २० होती.

**५६.** मा.सभापतींच्या दालनातील बैठक आटोपल्यानंतर उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांशी संपर्क केला व या २० शिक्षकांपैकी बहुतेक शिक्षक हे बिनराखीव जागेवर नियुक्त झालेले आहे असे प्रमाणित करून दिल्यास हा प्रश्न मार्गी लागू शकतो अशी योजना

*सहपत्र ८ : परिच्छेद ५७ पहा*

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग*

**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२**

***क्र. एनयुसी-२००६/(१०५/०६) मशि-६ : दिनांक ०४ नोव्हेंबर, २००६***

प्रति,

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**विषय** :- अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत.

**संदर्भ** :- १) संचालक, उच्च, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे क्र. एनजीसी/२००६/पदे अनारक्षीत/अवि/मवी-३ दि. १२.९.२००६ चे पत्र.

२) आपले क्र. संमाबा अवि/२०/बीसीसी/एम-१९८८/२००६, दि. ५ ऑक्टोबर, २००६ चे पत्र.

अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाबाबत संदर्भाधीन दि. ५ ऑक्टोबर, २००६ च्या पत्रान्वये, बिंदूनामावलीनुसार अ.क्र. ६,१५,१९,२० वरील पदे वगळता इतर पदे खुल्या वर्गातील असल्याचे अभिप्राय दिले आहेत त्यानुसार **सदर पदे खुल्या वर्गातील आहेत असे दिसते त्यामुळे ती पदे बिनराखीव करण्याचा प्रश्नच येत नाही,** ही बाब लक्षात घेता या बिंदूवर असलेल्या शिक्षकांच्या नियुक्त्यांना मान्यता देण्याची योग्य ती कार्यवाही प्रचलित नियमानुसार करण्यात यावी. अ.क्र. ६,१५,१९,२० वरील प्रस्ताव तपासून स्वतंत्ररित्या सादर करावेत.

२. याबाबत अमरावती विद्यापीठातंर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत दाखल झालेल्या याचिकांच्या अनुषंगाने Review petition दाखल करण्याबाबत सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांना सुचित केले होते. परंतु वरील वस्तुस्थिती लक्षात घेता आता Review petition करण्याची आवश्यकता नसल्यामुळे सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी Review petition दाखल करण्याची कार्यवाही करण्याची गरज नाही तसेच या प्रकरणी दाखल झालेल्या अवमान याचिकांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे वस्तुस्थिती मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणावी. असे सहसंचालकास या पत्राची प्रत अग्रेषित करुन कळविण्यात येत आहे.

(रा.चो.सरवदे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

## *अमरावती विभागातील अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील आरक्षित पदे अनारक्षित करण्याबाबतचा प्रस्ताव*

*(१) महाविद्यालयाचे नाव (२) कर्मचाऱ्याचे नाव (३) पदनाम (४) विषय (५) पद अनारक्षित करण्याची कारणे (६) बिंदू नामावलीप्रमाणे नोंदी*

१. (१) नेहरु कला वाणिज्य महाविद्यालय, नेरपरसोपंत जि. यवतमाळ (२) श्री.एम.आर.ठाकरे (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नव्याने केलेल्या बिंदू नामावली प्रमाणे पद आरक्षित नाही. म्हणून सदर पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

२. (१) बी.बी. कला वाणिज्य महाविद्यालय, दिग्रस जि. यवतमाळ (२) श्री.जी.एस.खळदकर (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नव्याने केलेल्या बिंदू नामावली प्रमाणे पद आरक्षित नाही. म्हणून सदर पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

३. (१) फुलसींग नाईक महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ (२) श्री.एस.एस. खरबडे (३) अधिव्याख्याता (४) संगणकशास्त्र (५) नव्याने केलेल्या बिंदू नामावली प्रमाणे पद आरक्षित नाही. म्हणून सदर पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

४. (१) श्री. शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट जि. अकोला (२) श्री.के.एस.हिवरे (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) शिवाजी शिक्षण संस्थेने संस्थेची एकत्रित बिंदू नामावली ठेवल्यामुळे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

५. (१) डॉ.एच.एन.सिन्हा कला वाणिज्य महाविद्यालय, पातूर जि. अकोला (२) श्री.के.एस. खंडारे (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) शिवाजी शिक्षण संस्थेने संस्थेची एकत्रित बिंदू नामावली ठेवल्यामुळे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

६. (१) भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा जि. अमरावती (२) श्रीमती एस.एस.गावंडे (३) अधिव्याख्याता (४) गृहअर्थशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षीत करण्यास हरकत नाही. (६) नोंद नाही

७. (१) भारतीय महाविद्यालय, अमरावती (२) श्री.जी.एस. कुरुप (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) सदर अधिव्याख्याता दुसऱ्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून गेलेले असल्यामुळे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

८. (१) जी.एस.विज्ञान कला वाणिज्य व महाविद्यालय, खामगाव (२) श्री.सी.एम.जाधव (३) अधिव्याख्याता (४) इलेक्ट्रॉनिक्स (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

९. (१) जी.एस.विज्ञान कला वाणिज्य व महाविद्यालय खामगाव (२) श्री.एस.ओ.वानखेडे (३) अधिव्याख्याता (४) संख्याशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१०. (१) जी.एस.विज्ञान कला वाणिज्य व महाविद्यालय, खामगाव (२) श्री.पी.एस.बोडखे (३) अधिव्याख्याता (४) संगणकशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

११. (१) पुंडलीक महाराज महाविद्यालय, नांदूरा जि. बुलढाणा (२) श्री.ए.एल.कुलट (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) शिवाजी शिक्षण संस्थेने संस्थेची एकत्रित बिंदू नामावली ठेवल्यामुळे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१२. (१) अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ (२) श्री.जी.पी.पाचडे (३) अधिव्याख्याता (४) रसायनशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१३. (१) फुलसिंग महाविद्यालय, पुसद (२) श्री.एस.आर.जाधव (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१४. (१) गो.से.गावंडे महाविद्यालय, उमरखेड (२) श्री.एस.पी.राठोड (३) अधिव्याख्याता (४) रसायनशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१५. (१) मुंगसाजी महाविद्यालय, दारव्हा (२) श्री.एस.एस.जाधव (३) अधिव्याख्याता (४) मराठी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) विमुक्त जाती

१६. (१) कला वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरब (२) श्री.ए.आर.खान (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१७. (१) के. एन.ए.देशमुख कला वाणिज्य महाविद्यालय, चांदूरबाजार (२) श्री.व्ही.एन. वसुले (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१८. (१) जगदंबा महाविद्यालय, अचलपूर (२) श्री.पी.आर.भडके (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१९. (१) तक्षशीला महाविद्यालय, अमरावती (२) कु.एस.ए. कहेकशा (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) नोंद नाही

२०. (१) तक्षशीला महाविद्यालय, अमरावती (२) कु.एस.डी.श्रीखंडे (३) अधिव्याख्याता (४) राज्यशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) नोंद नाही

स्वा./- **शिक्षण संचालक,**
(उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे

स्वा./- **कुलसचिव**
संत गाडगे बाबा,
अमरावती विद्यापीठ

सांगितली. मंत्रालयातील कक्ष अधिकारी श्री.रा.वो.सरवदे यांनी अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांना फोनवरून त्याबाबतची माहिती दिली व तसे पत्र पाठविण्यास सांगितले. अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांनी श्री.सरवदे यांना दिनांक ५ ऑक्टोबर २००६ रोजी "**अमरावती विभागातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील पदे अनारक्षित करण्याबाबत**" या विषयावर पाठविलेल्या पत्राच्या सुरुवातीलाच "**आपण दूरध्वनीवरून दिलेल्या संदेशाप्रमाणे तसेच फॅक्सद्वारे पाठविलेल्या यादीतील अधिव्याख्यात्यांच्या संदर्भात कळविण्यात येत आहे**" असे नमूद केलेले आहे. तसेच "सदर महाविद्यालयाने सादर केलेल्या अभिलेखाच्या आधारे खुल्या प्रवर्गात नियुक्त करण्यात आल्याचे या विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाने प्रमाणित करून दिले आहे." असे सुद्धा या पत्रात नमूद केलेले आहे. अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांनी मंत्रालयातील कक्ष अधिकारी श्री.रा.वो.सरवदे यांना लिहिलेले दिनांक ५ ऑक्टोबर २००६ रोजीचे हे पत्र सोबत **सहपत्र : ७** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**५७.** अमरावती विद्यापीठाचे दिनांक ५ ऑक्टोबर २००६ रोजीचे पत्र मिळाल्यानंतर राज्यशासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिनांक ४ नोव्हेंबर २००६ रोजी एक शासन पत्रक निर्गमित केले. या पत्रकाचा विषय "**अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत**" असा आहे. या शासन पत्रकाच्या संदर्भ क्रमांक २ वर अमरावती विद्यापीठाचे दिनांक ५ ऑक्टोबर २००६ रोजीचे पत्र नमूद केले आहे. "सदर पदे खुल्या प्रवर्गातील आहे असे दिसते व त्यामुळे ही पदे बिनराखीव करण्याचा प्रश्नच येत नाही" असे या शासन पत्रकात नमूद आहे. या शासन पत्रकाच्या परिच्छेद २ मध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, "नागपूर खंडपीठात झालेल्या याचिकांच्या अनुषंगाने Review Petition दाखल करण्याबाबत सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांना सूचित केले होते. पण वरील परिस्थिती लक्षात घेता Review Petition दाखल करण्याच्या कार्यवाहीची गरज नाही." शासन पत्रकात अशा २० शिक्षकांची नावे नमूद असून त्या २० पैकी ६, १५, १९, २० या चार क्रमांकावरील पदे वगळता इतर सर्व पदे खुल्या संवर्गातील आहेत... त्यामुळे ती बिनराखीव करण्याचा प्रश्नच येत नाही असे नमूद करण्यात आले होते. शासननिर्णयातील क्रमांक १ ते ५ वरील शिक्षक हे उच्च न्यायालयात याचिका दाखल करून अनुकूल निर्णय मिळालेले शिक्षक आहेत. ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. दिनांक ४ नोव्हेंबर २००६ रोजीचे हे शासन पत्रक **सहपत्र : ८** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे. हे शासन पत्रक आम्हाला व त्या शिक्षकांना सुद्धा बऱ्याच उशिराने मिळाले.

**५८.** दिनांक ४ नोव्हेंबर २००६ रोजी जे शासन पत्रक उच्च शिक्षण विभागाने काढले होते ते याचिकाकर्त्यांना मिळाले नव्हते. ते दिनांक १२ सप्टेंबर २००८ रोजी पर्यंत खुद्द सरकारी वकिलांना सुद्धा ठाऊक नव्हते. सरकारी वकिलांनी स्वतःच उच्च न्यायालयात असे सांगितले की, नुकतेच दिनांक ४ नोव्हेंबर २००६ रोजीचे शासन पत्रक मला फॅक्सने मिळालेले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर अवमान याचिकेच्या (Contempt Petition No.180/2006 in W.P.No.2410/2003) सुनावणीत दिनांक १२ सप्टेंबर २००८ रोजी शासकीय वकिलांनी जे सांगितले ते त्या दिवशीच्या मा.उच्च न्यायालयाच्या आदेशात नमूद आहे ते पुढील शब्दात :-

**"Learned Assistant Government Pleader points out that Government has already on 4.11.2006 itself taken a decision in favour of the petitioners and posts were dereserved.** He produces a Fax received by the office of the Government Pleader very recently along with a chart in which names of 5 contempt petitioners appear at Sr.No.1 to 5. **He states that copy of the**

*सहपत्र ९ : परिच्छेद ५८ पहा*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**

NAGPUR BENCH, NAGPUR.

**CONTEMPT PETITION NO.180/2006** IN W.P.NO.2410/2003 (Manohar Rangrao Thakare ...vrs.... Smt. Joyce Shankaran.) CONTEMPT PETITION NO.185/2006 IN W.P.NO.1121/2004 (Vinod Lahurao Khalatkar ...vrs.... Smt. Joyce Shankaran.) CONTEMPT PETITION NO.188/2006 IN W.P.NO.1112/2004 (Vivek Haribhau Hiware ...vrs.... Smt. Joyce Shankaran.) CONTEMPT PETITION NO.191/2006 IN W.P.NO.1085/2004 (Sanjay Motiramji Kharbade ...vrs.... Smt. Joyce Shankaran.) CONTEMPT PETITION NO.192/2006 IN W.P.NO.2651/2004 (Kiran Shankarrao Khandare ...vrs.... Smt. Joyce Shankaran.)

**CORAM : B.P.DHARMADHIKARI, J.**
**DATED : SEPTEMBER 12, 2008.**

Shri Deopujari, **learned Assistant Government Pleader points out that Government has already on 4.11.2006 itself taken a decision in favour of the petitioners and posts were dereserved.** He produces a Fax received by the office of the Government Pleader very recently along with a chart in which names of 5 contempt petitioners appear at Sr.No.1 to 5. **He states that copy of the same will be placed on record shortly and he will also supply copy to the petitioners.**

**Advocate Shri Kadu, states that after going through the Fax shown by the learned Assistant Government Pleader, he could contact only one petitioner on telephone and said petitioner has informed that till date none of the petitioners have received any benefit.** He further states that the petitioners will like to add Joint Director as also University as party respondent in the present contempt petition, because in their absence perhaps the matter cannot be finally decided. He points out that the Joint Director of Higher Education was respondent no.3 and Amravati University was respondent no.5 in the original writ petition.

In the circumstances, leave to join the said authorities as respondent nos. 2 and 3 in these matters. Necessary amendment be carried out by 18.09.2008. Upon payment of bhatta issue notice to the added respondents, returnable on 6.10.2008.

**JUDGE**

*सहपत्र १० : परिच्छेद ७८ पहा*

**कार्यालय, सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती - ४४४ ६०४**

दुरध्वनी क्र. ०७२१- २५३१२३५ : Email jdheamt@yahoo.com

***क्रमांक ससं/उशि/एन-३/०८/९९९ : दिनांक २८.३.२००८***

प्रति,
प्राचार्य,
१. बी.बी.महाविद्यालय, दिग्रस, जि. यवतमाळ.
२. फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ.
३. श्री. शिवाजी महाविद्यालय, अकोला.

**विषय** :- आरक्षित पदे अनारक्षित झाल्यानंतर संबंधितांस सेवासातत्य व इतर लाभ देण्याबाबत.

**संदर्भ** :- या कार्यालयाचे दिनांक १६.१०.२००७

कृपया संदर्भाधीन पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रान्वये आरक्षित पदांवर नियुक्ती झालेल्या अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित झाल्यानंतर सर्व संबंधितांना सेवासातत्याचा लाभ देण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि काही महाविद्यालयांनी संबंधित अधिव्याख्यात्यांना त्यांच्या प्रथम नियुक्तीपासून वेतनवाढी दिलेल्या नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

तरी अशा अधिव्याख्यात्यांना त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून वार्षिक वेतनवाढी व तदनुषंगिक लाभ देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.

**सहसंचालक**, उच्च शिक्षण
अमरावती विभाग, अमरावती यांचेकरिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर (१) मा. सहसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ (२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पूणे-१

**same will be placed on record shortly and he will also supply copy to the petitioners."**

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी काय सांगितले तेही त्या दिवशीच्या खंडपीठाच्या आदेशात नमूद आहे ते पुढील शब्दात :-

"Advocate Shri Kadu, states that after going through the Fax shown by the learned Assistant Government Pleader, he could contact only one petitioner on telephone and said petitioner has informed that till date none of the petitioners have received any benefit."

आज असे ठामपणे म्हणता येईल की, अवमान याचिकेला सामोरे जाताना शासनाची काहीतरी इज्जत राखल्या जावी म्हणून ते शासन पत्रक काढण्यात आले होते. मा.सभापतींच्या दालनात झालेल्या बैठकीच्याच दिवशी आपण सर्व संबंधित खात्यांच्या सचिवांची बैठक बोलावून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला असे मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी पुढे दिनांक ६ जुलै २००६ रोजी सभागृहात सांगितले. मा.उच्च न्यायालयाचे दिनांक १२ सप्टेंबर २००८ रोजीचे आदेशपत्र सोबत **सहपत्र : ९** म्हणून प्रसुत केलेले आहे.

**५९.** तारांकित प्रश्न क्रमांक १७३४२ हा गुरूवार, दिनांक ६ जुलै २००६ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. तो तिसऱ्याच क्रमांकावर असल्यामुळे त्यावर अनुपूरक चर्चा सुद्धा होण्याची शक्यता होती व तशी ती झालीही. मूळ प्रश्नाच्या "एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दिनांक ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय," या प्रश्न भाग एकला मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी एका शब्दात "होय" असे उत्तर दिले होते. "प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे?" या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "**निवेदनात नमूद केलेल्या पाच प्रस्तावा संदर्भात पदे अनारक्षित करुन संबंधितांना सेवा सातत्याचे लाभ लागू करण्याबाबत कार्यवाही चालू आहे. अंतिम निर्णय होताच आदेश काढण्यात येतील.**" असे नमूद केले होते. उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी घेतलेली "सन १९९४ च्या शासननिर्णयाप्रमाणे प्रस्ताव पाठविलेले नसल्यामुळे त्यावर विचार करता येत नाही" ही हेकेखोर भूमिका आता मागे पडलेली होती. या प्रश्नावरील विचार पूर्ण झाला असून संबंधितांना सेवा सातत्याचे लाभ लागू करण्याबाबत कार्यवाही चालू आहे असे लेखी उत्तरामध्ये नमूद होते. या प्रश्नाची सोडवणूक होण्याच्या दृष्टीने निश्चितपणे पुढे पडलेले हे एक पाऊल होते.

**६०.** सभागृहात अनुपूरक चर्चा सुरू झाली तेव्हा प्रथम प्रश्नकर्ते श्री.रमेश निकोसे यांनी न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात वागल्यामुळे एका मंत्र्याला व अधिकाऱ्याला एक महिना जेलमध्ये जावे लागले. ही गोष्ट लक्षात आणून देऊन

*सहपत्र ११ : परिच्छेद ७८ पहा*

**सहसंचालक, उच्च शिक्षण : अमरावती विभाग, अमरावती.**

**दुरध्वनी क्र. ०७२१- २५३१२३५**

***क्रमांक ससं/उशि/ताप्र/३७६३७/क्यु/०८ : दिनांक २८.३.२००८***

प्रति,

**मा.आ.श्री.बी.टी.देशमुख,**

विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय** :- तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३७ बाबत

**संदर्भ** :- आज दिनांक २८.३.२००८ रोजी झालेली चर्चा

महोदय,

तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३७ बाबत, आज दिनांक २८.३.२००८ रोजी मा. मंत्री महोदय (उच्च व तंत्र शिक्षण) यांनी दिलेल्या निर्देशानुसार, संबंधित महाविद्यालयास कार्यवाही करण्यासंबंधी पाठविलेल्या पत्राची छायाप्रत यासोबत जोडण्यात आली आहे.

माहितीस्तव सविनय सादर

आपला विश्वासू

**सहसंचालक,** उच्च शिक्षण

अमरावती विभाग, अमरावती

सहपत्र : एक

लवकरात लवकर म्हणजे किती दिवसात कार्यवाही करणार असा प्रश्न विचारला असता "३ महिन्यात अंतिम निर्णय शासन घेईल" असे उत्तर मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिले. ही सुद्धा या प्रश्नाच्या दृष्टीने महत्त्वाची अशी आणखी एक अनुकूल बाब होती. याबाबतची चर्चा शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**श्री.रमेश निकोसे :** सभापती महोदय, हायकोर्टाने आदेश दिल्यानंतरसुध्दा अनारक्षित पदे भरण्यात आलेली नाहीत. **आताच घटना घडलेली आहे की, हायकोर्टाने व सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाच्या विरुध्द वागल्यामुळे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्याला व अधिकाऱ्यास एक महिना जेलमध्ये जावे लागले.** याठिकाणी माझा एवढाच प्रश्न आहे की, आपण जी लवकरात लवकर कारवाई करु असे जे म्हटले आहे ती कारवाई आपण लवकरात लवकर किती दिवसात करणार?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, मागच्यावेळीही हा प्रश्न सभागृहामध्ये चर्चेला आला होता. त्यावेळी या प्रश्नाच्या बाबतीत सभागृहात चर्चा झाल्यानंतर आपल्या दालनामध्ये बैठक घेण्याचे ठरले व त्याप्रमाणे बैठकही झाली. या विषयाचा संबंध इतर विभागांशी येत असल्यामुळे याबाबतीत सचिव स्तरावर बैठक घेण्याचे ठरले व त्याप्रमाणे बैठकही झाली. हा अनारक्षित पदांचा विषय समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, सामान्य प्रशासन विभागांशीही संबंधित येतो. त्यामुळे त्या विभागांचाही याबाबतीत सल्ला घेणे आवश्यक आहे. या संदर्भातील सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार राज्य शासनाने दिनांक २५ ऑगस्ट,२००५ रोजी एक शासन निर्णयही काढलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात या सर्व पाचही प्रकरणांचा अभ्यास करून राज्य सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. याबाबतीत राज्य सरकार तीन महिन्यांमध्ये अंतिम निर्णय घेईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक ६ जुलै २००६ : खंड १४३, क्रमांक ४, पृष्ठ ३८)*

**६१.** यापूर्वी दिनांक ५ डिसेंबर १९९४ च्या शासननिर्णयाप्रमाणे प्रस्ताव देण्यात यावे हे उच्च शिक्षण विभागाने ठरविले होते, ही गोष्ट लक्षात आणून द्यावी लागली. सन १९९४ चा शासननिर्णय हा भावी प्रभावाने अंमलात येतो, पूर्वलक्षी प्रभावाने नाही असा उच्च न्यायालयाचा निर्णय असतांना केंद्रे नावाचा एक अधिकारी त्या आदेशाच्या विरोधात परिपत्रक काढतो ह्या सर्व गोष्टी लक्षात आणून देऊन **हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे तीन महिन्याच्या आत निर्णय घेणार काय?** असा प्रश्न विचारला असता सभापतींच्या दालनात बैठक झाली आणि त्याच दिवशी सर्व सचिवांबरोबर बैठक घेण्यात आली. सामान्य प्रशासन विभागाकडून हे प्रकरण आता आमच्या विभागाकडे प्राप्त झाले आहे असे सांगून तीन महिन्यात यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल असे मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी सांगितले. ती चर्चा पुढीलप्रमाणेः-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, ही दुर्दैवाची गोष्ट आहे की, हायकोर्टाने निर्णय देऊनसुध्दा आपले अधिकारी विरोधात पत्रक काढतात व सभागृहाला चुकीची माहिती देतात. या प्रश्नासंबंधी मागे १८ एप्रिल २००६ रोजी सभागृहामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले होते की, "विद्यापीठाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव दिनांक ५.१२.१९९४ च्या शासन निर्णयातील अटीनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कारवाई करणे शक्य झाले नाही." माननीय सभापती महोदय, यासंदर्भात ज्यावेळी आपल्या दालनामध्ये बैठक झाली. त्यावेळी २-३ अधिकाऱ्यांनी सांगितले की, १९९४ च्या शासन निर्णयानुसार विद्यापीठाने प्रस्ताव पाठविला नाही. हायकोर्टामध्ये शासनाच्या वकिलांनी हे म्हणणे मांडलेले आहे की, "सन १९९४ चा शासन निर्णय यांना लागु आहे." परंतु "विद्यापीठाच्या वकिलांनी हायकोर्टात असे सांगितले की, "१९९४ चा शासन निर्णय त्यांना लागू होत नाही, त्यांना १९९० चा शासन निर्णय लागू होतो." हायकोर्टाने त्यावर दिनांक ३ जून,२००१ रोजी व ६ फेब्रुवारी,२००४ रोजी याचिका क्रमांक ३३०५ ऑफ २००१ मध्ये निकाल दिला. निकालाच्या पॅरा पाचमध्ये असा निर्णय दिला आहे की, ""Provisions of Government Resolution dated 5th December, 1994 are prospective in nature and cannot be applied retrospectively" असे कोर्टाने म्हटले. पध्दत अशी आहे की, एकदा कोर्टाने निर्णय दिला की, सरकारी वकील मग त्यानंतर त्यावर प्रतिवाद करीत नाहीत. त्याप्रमाणे पुढच्या पुढच्या प्रकरणात यांनी तसा युक्तीवाद करणे सोडून दिले. पुढचा निर्णय याचिका क्रमांक २४१० ऑफ २००३ मध्ये दिनांक २-९-२००४ रोजी झाला. यामध्ये कोर्टाने असे म्हटले आहे की, "No one has disputed the entitlement of the Petitioner to be regularized in the post in the sixth year as provided in the G.R. dated 25-1-1990" हे सर्व हायकोर्टात झाल्यानंतर 'केंद्रे' म्हणून जे राज्य शासनातील कक्ष

अधिकारी आहेत ते सन १९९४ चा जी.आर.लागू करणारे परिपत्रक काढीत आहेत. म्हणून या अधिका-यांवर सर्वप्रथम कारवाई करण्याची गरज आहे. **एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर अशा प्रकारे आदेश देणारे हे 'केंद्रे' नावाचे कक्ष अधिकारी काय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश आहेत काय?** सभापती महोदय, हा अतिशय खेळखंडोब्याचा प्रकार आहे. अर्धा डझन प्रकरणांमध्ये १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे कारवाई करा असा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर सुध्दा १९९४ च्या जी.आर.चे पालन करा असे शासनाचे म्हणणे हे सर्वस्वी चूक आहे. तेंव्हा, हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे मंत्रीमहोदय ३ महिन्याच्या आत निर्णय घेणार काय?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात दिनांक १८ एप्रिल २००६ रोजी या सभागृहात चर्चा झाली होती. **त्यानंतर दिनाक २७ एप्रिल २००६ रोजी आपल्या दालनात चर्चा झाली. ही चर्चा झाल्यानंतर त्याच दिवशी सर्व सचिवांबरोबर बैठक घेण्यात आली.** असे आहे की, सरकारमध्ये procedure to be followed. त्याप्रमाणे प्रोसिजर पूर्ण होऊन सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक १९/०६/२००६ रोजी हे प्रकरण आमच्या विभागाकडे प्राप्त झाले आहे. जी.आर.चे मेरिट, हायकोर्टाच्या निर्णयाच्या मेरिटमध्ये मी जात नाही. परंतु, या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी थोडा वेळ लागणार आहे. म्हणून मी असे सांगितले की, **३ महिन्यात यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल."** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक ६ जुलै २००६ : खंड १४३, क्रमांक ४, पृष्ठ ३८-३९)*

**६२.** सभागृहातील ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी अतिशय आक्रमकपणे हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर तुम्ही सुप्रिम कोर्टात अपील करायला पाहिजे होते. नाहीतर हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करायला हवी होती. हायकोर्टाचा निर्णय अजून जीवंत असून त्याची अंमलबजावणी करणे हे सरकारवर बंधनकारक आहे, असे विचार मांडतांना खुद्द मा.सभापतींना याबाबतीत निर्णय देण्याबाबत संरक्षण मागितले. त्यावर "माझेही तेच मत आहे. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्या निर्णयाची अंमलबजाणी होणे हे गृहीत असतेच. तो निर्णय स्वीकारणे हे गरजेचे आहे. माझ्या दालनामध्ये दिनांक २७ एप्रिल २००६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सुध्दा मी तसेच सांगितले होते" असे विचार मा.सभापतींनी सभागृहात मांडले. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर गरज असेल तर सुप्रिम कोर्टामध्ये अपील दाखल करावयास हवे. अन्यथा हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावयास हवी. कारण, हायकोर्टाचा निर्णय जीवंत आहे. त्याची अंमलबजावणी करणे हे सरकारवर बंधनकारक आहे. नाही तर कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट होऊ शकतो. हायकोर्टाच्या निर्णयाच्या आधारे परिपत्रक काढणे हे खरे कायदेशीर आहे. त्यामुळे सभागृहात अशा प्रकारची चर्चा आपण होऊ देता कामा नये. त्यांना जर हायकोर्टाचा निर्णय मान्य नसेल तर त्यांनी सुप्रिम कोर्टात जावे. परंतु सुप्रिम कोर्टात न जाता हायकोर्टाची अंमलबजावणी न करणे हे बेकायदेशीर आहे आणि म्हणून आपले संरक्षण आम्हाला हवे आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** देशाच्या घटनेप्रमाणे हायकोर्टाने दिलेल्या निर्णयावर या ठिकाणी चर्चा करता येत नाही. 'केंद्रे' नावाच्या कक्ष अधिका-याने हायकोर्टाच्या निर्णयाविरोधी परिपत्रक काढलेले आहे, जो त्यांचा अधिकार नाही. एकदा हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतर मंत्रीमहोदय जी सामान्य प्रशासन विभाग वगैरे प्रोसिजर सांगत आहेत त्याचे कौतुक करता येणार नाही. म्हणून आपण याबाबत ठामपणे सांगितले पाहिजे की, हायकोर्टाच्या निर्णयानुसार अंमलबजावणी झाली पाहिजे. एकदा तुमचे म्हणणे हायकोर्टात अमान्य झाल्यानंतर, हायकोर्टाने अर्धा डझन प्रकरणी एकसारखे निर्णय दिल्यानंतर, केंद्रेसारख्या अधिका-याने हायकोर्टाच्या निर्णया विरोधी परिपत्रक काढले आहे त्यामुळे या सभागृहाची प्रतिष्ठा बाधित होते. त्यामुळे सभापती महोदय, आपण या प्रश्नावर मागच्या वेळी आपल्या दालनामध्ये बैठक बोलावली होती.

**सभापती :** सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांनी त्यांच्या विवेचनावरुन सप्लिमेंटरी माहिती, ज्याला मी हरकत म्हणणार नाही, या ठिकाणी दिली आहे. **त्यांचे जे मत आहे तेच माझेही मत आहे. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्या निर्णयाची अंमलबजावणी होते, हे गृहीत असते आणि तो निर्णय स्वीकारणे गरजेचे आहे.** या अनुषंगाने शासनाला काही अडचण असेल तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये जावे. **माझ्या दालनामध्ये २७ एप्रिल २००६ रोजी सविस्तर चर्चा झाली त्यावेळी याची अंमलबजावणी होण्याची गरज आहे, असे मी बोललो होतो."** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक ६ जुलै २००६ : खंड १४३, क्रमांक ४, पृष्ठ ३९)*

**६३.** तुम्ही उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. सुप्रिम कोर्टात अपील सुद्धा केले नाही. तुमचा केंद्रे नावाचा एक अधिकारी उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात परिपत्रक काढतो. ह्या सर्व गोष्टी सभागृहामध्ये स्पष्ट झालेल्या होत्या. त्यावर श्री.नितीन गडकरी यांनी "तुमचे सभागृहात हे असेच बोलणे चालू राहणार असेल तर ती आमच्यासाठी कठिण गोष्ट आहे." असे उद्‌गार काढले. त्यावर ॲडव्होकेट जनरलला बोलाविण्यापर्यंत ती चर्चा गेली. शेवटी "तीन महिन्यामध्ये आम्ही याबाबतीत अंतिम निर्णय घेऊ" या आश्वासनाचा मा.शिक्षणमंत्र्यांनी पुनरूच्चार केला. ती चर्चा पुढीलप्रमाणेः-

**"Shri Nitin Gadkari:** It is difficult for us to allow you in this House.

**Shri Dilip-Valse Patil :** Let the House allow you in this regard. जसा हायकोर्टाचा निर्णय आहे तसा सुप्रिम कोर्टाचा सुध्दा निर्णय आहे. आपण हायकोर्टाच्या निर्णयाची चर्चा करीत आहोत. मागच्या अधिवेशनामध्ये या विषयावर चर्चा झाली. सभागृहामध्ये हा विषय कनक्ल्यूड होत नाही असे ज्यावेळी निदर्शनास आले त्यावेळी माननीय सभापती महोदयांच्या दालनामध्ये बैठक घेण्याचे ठरले. हायकोर्टाने दिलेला निर्णय काय आहे? आणि सुप्रिम कोर्टाने दिलेला निर्णय काय आहे हे त्यावेळी आपल्या निदर्शनास आणून दिले. **ॲडव्होकेट जनरलला आपण निमंत्रित केले तरी त्यास माझी काही हरकत नाही.**

**प्रा.बी.टी.देशमुख :** माननीय मंत्री महोदय जे म्हणतात त्याप्रमाणे ॲडव्होकेट जनरलला बोलवा ना! ते आम्हाला मान्य आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्य हायकोर्टाच्या निर्णयाचा जो अर्थ लावत आहेत तो त्यांच्या दृष्टीने बरोबर असला तरी सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाची भूमिका आपल्याला समजून घेतली पाहिजे. मुद्दा असा आहे की, एखाद्या विद्यापीठामध्ये किंवा एखाद्या शिक्षण संस्थेमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित केलेली पदे अनारक्षित करण्याबाबतचा हा मुद्दा आहे. जर आरक्षित पदासाठी ५ वर्षामध्ये उमेदवार मिळाला नाही तर ते पद अनारक्षित केले जाते. परंतु दुसरी व्यवस्था अशी आहे की, आरक्षित पदासाठी उमेदवार मिळाला नाही तर विदीन कॅटॅगरीचा उमेदवार उपलब्ध असल्यास ते पद भरले जाते. अमरावती विद्यापीठातील ५ शिक्षकांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. आता तात्पुरत्या स्वरुपामध्ये तेथे काही कर्मचारी नोकरीला लागलेले आहेत. जर सुप्रिम कोर्टाचा निर्णय अनारक्षित पदांच्या बाजूने लागला तर आता जे लोक नोकरीला लागलेले आहेत त्यांना कन्टीन्यू करता येईलच असे नाही. नवीन लागलेल्या लोकांना कन्टीन्यू करता येईल. येथे आग्रह असा दिसतो आहे की, जे सेवेमध्ये कर्मचारी आहेत त्यांनाच कायम करावे. त्याला देखील माझी काही हरकत असण्याचे कारण नाही. परंतु हायकोर्टाचा आणि सुप्रीम कोर्टाचा निर्णय यामध्ये जो काही आहे त्याचा विचार करून, सामान्य प्रशासन विभागाने आमच्याकडे फाईल पाठविली आहे. **त्यामध्ये लीगल ओपिनियन घेण्यासाठी देखील वेळ लागणार आहे, त्यासाठी सुमारे ३ महिने लागतील.** म्हणूनच मी सांगितले की, त्या ३ महिन्यामध्ये आम्ही यामध्ये अंतिम निर्णय घेऊ." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक ६ जुलै २००६ : खंड १४३, क्रमांक ४, पृष्ठ ४०)*

**६४. "तीन महिन्यांच्या आत शासन या प्रश्नावर अंतिम निर्णय घेईल"** अशा प्रकारचे आश्वासन मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी त्रिवार नव्हे तर अनेकवार सभागृहामध्ये दिले होते. त्यामुळे निदान पुढचे तीन महिने या प्रश्नाचा सभागृहात पाठपुरावा सुरूच ठेवणे आवश्यक झालेले होते. या पाठपुराव्याचा भाग म्हणून आम्ही दिलेल्या लक्षवेधी सूचनेवरील मा.उच्च शिक्षणमंत्र्यांचे निवेदन हे शुक्रवार, दिनांक २१ जुलै २००६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. आमच्यातर्फे कोणकोणते मुद्दे उपस्थित करण्यात आले होते हे लक्षात येण्यासाठी लक्षवेधी सूचनेचा मसुदा लक्षात घेणे आवश्यक आहे. तो शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"विद्यापीठाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव ५ डिसेंबर, १९९४ च्या शासननिर्णयातील अटीनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कारवाई करणे शक्य झाले नाही, असे १८ एप्रिल, २००६ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १२७४२ च्या लेखी उत्तरात शासनाने नमूद करणे, शासनाच्या वतीने असाच युक्तिवाद मा. उच्च न्यायालयासमोर करण्यात आला असता **१९९४ चा शासननिर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही** (Cannot be appllied retrospectively) **असा स्पष्ट निर्णय ६ फेब्रुवारी,**

**२००४ रोजी २००१ च्या याचिका क्र. ३३०५ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने देणे,** एकदा मा. उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावल्यामुळे पुढच्या अनेक याचिकांमध्ये शासनातर्फे असा युक्तिवाद केला न जाणे, त्यामुळे अनेक याचिकांमध्ये निर्णय देताना (उदा. २ सप्टेंबर रोजी निर्णय झालेली २००३ ची याचिका क्रमांक २४१०) "**२५ जानेवारी १९९० च्या शासननिर्णयानुसार यांना संरक्षण द्यायचे आहे याबद्दल आमच्यासमोर कोणीही वाद घातलेला नाही**" असे मा. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयातच नमूद करणे, १९९४ चा निर्णय या प्रकरणी लागू करण्याची कृती न्यायालयाचा अवमान करणारी आहे, याची जाणीव असतांना वारंवार तशी भूमिका घेतल्यामुळे मा. उच्च न्यायालयाची अशी अवमानना करण्यास कोण जबाबदार आहे हे निश्चित करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, मा. सभापतींच्या दालनात २७ एप्रिल, २००६ रोजी झालेल्या बैठकीत मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्यात येईल, असे उच्च शिक्षण विभागाने मान्य करुन सुद्धा त्याबाबत कोणतीही कारवाई न होणे, परिणामी संबंधित शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २१ जुलै २००६ : खंड १४३, क्रमांक १४, पृष्ठ १११)*

**६५.** त्यावर मा.उच्च शिक्षणमंत्र्यांचे निवेदन शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन** : अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत दाखल झालेल्या **याचिकांच्या अनुषंगाने** तसेच याबाबत विधानमंडळात झालेल्या **चर्चेच्या अनुषंगाने** तसेच, उपरोक्त **प्रकरणांच्या अनुषंगाने** दि. २७.४.२००६ रोजी मा. सभापती यांच्या दालनात झालेल्या **बैठकीच्या अनुषंगाने** अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत कार्यवाही करताना संचालक, उच्च शिक्षण तसेच अमरावती विद्यापीठाने, **अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे सुधारित बिंदूनामावलीनुसार बिनराखीव असल्याबाबत कळविले आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनस्तरावर कोणतीही कार्यवाही करावयाची नाही व तसे विद्यापीठास कळविण्यात आले आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २१ जुलै २००६ : खंड १४३, क्रमांक १४, पृष्ठ ११२)* सभागृहात झालेली चर्चा, मा.सभापतींच्या दालनात झालेली बैठक यामुळे प्रश्नाचा प्रवास योग्य दिशेने पुढे सरकत होता असे दिसून येते. निवेदनात उल्लेख केलेला नसला तरी मा.उच्च न्यायालयातील घडामोडी सुद्धा प्रवास पुढे सरकण्यास कारणीभूत होत्या असे दिसून येते.

**६६.** याच प्रश्नावरील आमचा अतारांकित प्रश्न क्रमांक २९३५५ हा गुरूवार, दिनांक २९ नोव्हेंबर २००७ रोजी उत्तरीत झाला. "(१) एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुध्दा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघांच्या (नुटा) सहसचिवांनी ३० मे, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनात नमुद असलेल्या प्रस्तावासंदर्भात पदे अनारक्षित करून संबंधितांना सेवा सातत्याने लाभ लागू करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे?" या प्रश्न भाग एकच्या उत्तरामध्ये मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी पुढीलप्रमाणे नमूद केले होते :-

"**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (२३.१०.२००७) (१) व (२) नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या दि. ३०.५.२००५ रोजीच्या निवेदनात नमूद अधिव्याख्यात्यांची पदे विनाराखीव करणेबाबत दाखल झालेल्या याचिकांच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही विचाराधीन होती. याबाबत, संचालक, उच्च शिक्षण तसेच अमरावती विद्यापीठाने अमरावती विद्यापीठाअंतर्गत संलग्नित महाविद्यालयातील उक्त राखीव पदे सुधारित बिंदूनामावलीनुसार खुल्या वर्गातील असल्याबाबत कळविले आहे. त्याबाबतची पुढील कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे. याबाबत संबंधित अधिव्याख्यात्यांना सेवासातत्य व अन्य इतर अनुषंगिक फायदे देण्याबाबत कुलसचिव/सहसंचालक यांना संचालक उच्च शिक्षण यांनी कळविले आहे. तसेच विद्यापीठास सदर पदे खुल्या वर्गात मोडत असल्याचा स्पष्ट खुलासा संबंधित महाविद्यालयास व अध्यापकांना करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सद्यस्थितीत शासन स्तरावर उपरोक्त प्रकरणी कार्यवाही प्रलंबीत नाही." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरूवार, दिनांक २९ नोव्हेंबर २००७ : खंड १४७, क्रमांक ९, पृष्ठ ५६५-५६६)*

**६७.** शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३७ च्या निमित्ताने या प्रश्नावर सभागृहामध्ये तपशीलवार चर्चा झाली. "(१) एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघांच्या (नुटा) सहसचिवांनी ३० मे, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनात नमूद असलेल्या प्रस्तावासंदर्भात पदे अनारक्षित करून संबंधितांना सेवा सातत्याने लाभ लागू करण्याबाबत शासनाने दिलेल्या आदेशाबाबत सहसंचालक व कुलसचिव यांनी आजपावेतो कोणतीही कारवाई केलेली नाही हे खरे आहे काय, (२) कार्यवाही झालेली असल्यास, याबाबत मा. उच्च न्यायालयाचे निर्णय लक्षात घेता शासनाने केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे," या प्रश्न भाग एक व दोनला मा.राज्यमंत्र्यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले होते. :-

"**श्री.सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनास पाठविण्यांत आले आहेत. अशा सर्व अधिव्याख्यात्यांना विद्यापीठाद्वारे onwards approval देण्यांत आलेले आहे. सहसचिव, नागपूर विद्यापीठ संघटना यांच्या दि.३० मे, २००५ रोजी दिलेल्या निवेदनातील अधिव्याख्यात्यांना **सेवासातत्याचे लाभ देण्याबाबतची कार्यवाही सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी केली आहे.**" असे उत्तर दिले होते.

**६८.** "**या अधिव्याख्यात्यांना सेवासातत्याचे लाभ देण्याबाबतची कार्यवाही सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी केली आहे**" असे उत्तर देण्यात आले, मात्र ही कार्यवाही केव्हा केलेली आहे? हा पहिला प्रश्न आणि केलेल्या कार्यवाहीचे स्वरूप काय आहे? हा दुसरा प्रश्न याबाबत निश्चित उत्तर शासनाकडून येत नव्हते. आम्ही प्रश्नाची पूर्वसूचना दिल्यानंतरसुद्धा या दोन प्रश्नांची उत्तरे येत नसल्यामुळे प्रश्न राखून ठेवण्यात यावा अशी विनंती आम्हाला करावी लागली. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, उत्तराच्या भाग दोनमध्ये "**अधिव्याख्यात्यांना सेवासातत्त्याचे लाभ देण्याबाबतची कारवाई सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी केली आहे**" असे उत्तर देण्यात आले आहे. खूप विलंबाने का होईना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही कार्यवाही झाली. आता कार्यवाही झाली, असे शासनाचे म्हणणे आहे, त्याबद्दल धन्यवाद. ही कार्यवाही केव्हा झाली आणि झालेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे?

**श्री.सुरेश शेट्टी** : सभापती महोदय, डिरिझर्व्हेशनचा प्रस्ताव होता....

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, सभागृहाचा वेळ जाऊ नये म्हणून मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो. डिरिझर्व्हेशनच्या बाबतीत आपण सांगितले की, विद्यापीठाला त्याबाबत अधिकार दिले होते. ती पदे खुल्या प्रवर्गातील आहेत असे शासनाने सांगितले आहे. तो प्रश्न आता मिटला आहे. मूळ मुद्दा पुढे आहे. हायकोर्टाने आदेश दिले होते की, डिरिझर्व्हेशन झाल्यानंतर त्यांना सेवासातत्त्याचे जे लाभ आहेत, मुख्य म्हणजे त्यांच्या वार्षिक वेतनवाढी, त्यांचे प्लेसमेंट १५ दिवसात करावे. त्याला २-३ वर्षे झाली आहेत. यामध्ये असे उत्तर दिले आहे की, **सेवासातत्त्याचे लाभ देण्याबाबतची कार्यवाही सहसंचालक, अमरावती यांनी केली आहे.** ती कोणत्या तारखेला केली आणि कार्यवाहीचे स्वरुप काय आहे? मी पॉईन्टेड प्रश्न विचारलेला आहे, त्याला पॉईन्टेड उत्तर आले पाहिजे. नोटीसच्या बाहेरचे मी विचारले नाही.

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, यासंबंधीची कार्यवाही झालेली आहे. ही कार्यवाही कोणत्या तारखेला केली आहे त्याबाबतची वस्तुस्थिती सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**प्रा.बी.टी.देशमुख** : हे प्रकरण हायकोर्टामध्ये गेले होते. हायकोर्टाने आदेश देऊन अनेक वर्षे झाली, अनेक अधिवेशने झाल्यानंतरही आदेश मानण्यात आले नाहीत. त्यानंतर माननीय सभापतींनी बैठक घेतली होती. हायकोर्टाचे असे स्पष्ट आदेश आहेत की, डिरिझर्व्हेशन करावे. तरीही शासनाने डिरिझर्व्ह केले नाही, परंतु विद्यापीठाला शासनाने सांगितले होते. त्यानंतर विद्यापीठाने पत्र दिले की, ही पदे ओपनची आहेत, त्यामुळे ही पदे ओपन झाली. त्यानंतर पुढील कार्यवाही झाली किंवा नाही याची माहिती घेण्यासाठी आम्ही हा प्रश्न विचारलेला आहे. आता आपण सांगत आहात की, कार्यवाही झालेली आहे. ती कोणत्या तारखेला झाली व काय कार्यवाही झाली ते सांगावे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : यासंबंधी विद्यापीठ स्तरावर रोस्टर मेंटेन झाले

पाहिजे होते ते त्यांनी व्यवस्थितपणे मेंटेन केले नव्हते. विद्यापीठाने या नेमणुका करताना राखीव पदांच्या अगेंस्ट करीत आहोत अशाप्रकारची पहिल्यापासून भूमिका घेतली होती. विद्यापीठाने चुकीची भूमिका घेतली आहे असे आग्रहाने सभागृहात मांडण्यात आले होते. शासनाची यासंबंधीची भूमिका स्पष्ट होती. आता कोर्टकचेऱ्या झाल्या आहेत. त्यासंबंधीचा निर्णय आलेला आहे. विद्यापीठाने असे कळविले आहे की, ती पदे राखीव पदांच्या अगेंस्ट दाखवित होतो आता आमचे रोस्टर दुरुस्त झालेले आहे....

**प्रा.बी.टी.देशमुख** : मंत्रिमहोदय, आपण हे सर्व मागील इतिहास सांगत आहात.

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : मला माझे उत्तर पूर्ण करू द्यावे. यासंबंधी विद्यापीठानेच कळविले आहे की, ही राखीव पदे नाहीत. त्यामुळे ही पदे अनारक्षित करण्याची आवश्यकता नाही. ओपन पदाच्या अगेंस्ट जर या नेमणुका झाल्या असतील त्यासंबंधीची बाब शासनाला विद्यापीठाने कळविल्यानंतर शासनाने त्यासंबंधीचा निर्णय घेतला आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, आपण हे उत्तर वाचावे. प्रश्न विचारल्यानंतर **सहसंचालकांच्या स्तरावर कारवाई केली आहे असे म्हटलेले आहे.** कोणत्या तारखेला कार्यवाही केली आणि काय कार्यवाही केली या सोप्या प्रश्नाचे उत्तर देता येत नसेल तर आपण हा प्रश्न राखून ठेवावा. अनेकदा नोटीसच्या बाहेर जाऊन अनेक प्रश्न विचारले जातात. या क्षणापर्यंत हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही. आदेशाची अंमलबजावणी झाली असे मंत्रिमहोदय म्हणत आहेत. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, **"सेवासातत्याचे लाभ देण्याबाबतची कार्यवाही सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी केली आहे."** आमच्यादृष्टीने मग हा प्रश्न संपला आहे. ही कारवाई कोणत्या तारखेला केली आणि काय कारवाई केली? या दोन प्रश्नांची उत्तरे देता येत नसतील तर हा प्रश्न राखून ठेवून तो पुढील आठवड्यात घ्यावा.

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिनांक ४ नोव्हेंबर २००६ रोजी पत्र पाठविले. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ : खंड १४८, क्रमांक ५, पृष्ठ २०-२१)*

**६९.** प्रश्नाची पूर्वसूचना देऊनसुद्धा कार्यवाही केली आहे असे उत्तर आले, मात्र कोणत्या तारखेला कार्यवाही केलेली आहे? आणि काय कार्यवाही केलेली आहे? या टोकदार प्रश्नांना मात्र उत्तर दिले जात नाही ही गोष्ट मा.सभापतींच्या सुद्धा लक्षात आली होती. मा.सभापतींनी एकदा नव्हे तर दोनदा "सन्माननीय सदस्यांनी पॉईन्टेड प्रश्न विचारलेला आहे, त्या प्रश्नाचे उत्तर देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे... म्हणून आज संध्याकाळ पर्यंत ही माहिती सभागृहासमोर ठेवावी" असे सांगितले. आम्ही पुन्हा हा प्रश्न राखून ठेवावा अशी विनंती केली. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख** : उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिड वर्षापूर्वी पाठविलेल्या पत्राचे कौतुक सांगू नका. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी **सेवासातत्त्याचे लाभ देण्याची कार्यवाही केली आहे. ही कारवाई कोणत्या तारखेला केली आणि काय कारवाई केली, या दोन प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत.**

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

**प्रा.बी.टी.देशमुख** : नोटीस दिल्यानंतर सुद्धा? प्रश्नाची सूचना दिल्यानंतर सुद्धा? सभापती महोदय, हा अन्याय आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : सन्माननीय सदस्य म्हणतील तसे मंत्र्यांनी उत्तर देणे अभिप्रेत नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, ही तर सरळ सरळ आपल्याला धमकावणी आहे. येथे उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर देणे अभिप्रेत नाही असे म्हणणे इष्ट नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी पॉईंटेड प्रश्न विचारलेला आहे.

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : तारीख पटलावर ठेवण्यात येईल.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, या प्रकरणी अद्याप कार्यवाही झालेली नाही आणि म्हणून आम्हाला कार्यवाही पाहिजे आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी पॉईंटेड प्रश्न विचारला असेल तर त्या प्रश्नाचे उत्तर देण्याची प्रशासनाची जबाबदारी आहे. म्हणून आज संध्याकाळपर्यन्त ही माहिती सभागृहासमोर ठेवावी.

**प्रा.बी.टी.देशमुख** : या प्रकरणी हायकोर्टाने आदेश देऊन देखील वर्षानुवर्षे अमलबजावणी न केल्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी आदेश दिल्यानंतर थोडीशी कार्यवाही झाली. परंतु पूर्ण कार्यवाही झालेली नाही. तो विषय प्रश्नाच्या सुधारित उत्तरात येईल. म्हणून हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ : खंड १४८, क्रमांक ५, पृष्ठ २१-२२)*

**७०.** प्रश्नोत्तराच्या तासाचा बराचसा वेळ या चर्चेमध्ये निघून जात होता. मुद्यांची पूर्वसूचना न देता प्रश्न किंवा उपप्रश्न विचारल्या जात असेल तर "मला त्याची माहिती घ्यावी लागेल." "मी या प्रश्नाचे उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवतो" अशी टाळाटाळीची उत्तरे मा.मंत्र्यांनी देणे हे स्वाभाविक असते. परंतु प्रश्नाची पूर्वसूचना देऊनसुद्धा प्रश्नाचे किंवा उपप्रश्नाचे उत्तर येत नसेल तर ती गोष्ट सभाशास्त्राच्या विरोधात असते. त्यापासून सभागृहाचे संरक्षण करणे ही मा.पीठासीन अधिकाऱ्यांची जबाबदारी असते. शेवटी आज दुपारी ४ वाजता मा.मंत्रिमहोदयांनी या प्रश्नाचे उत्तर द्यावे असे आदेश मा.सभापतींनी दिले व तेथेच प्रश्नोत्तराचा तास संपला. ती चर्चा शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी पॉईंटेड प्रश्न विचारलेले आहेत. त्या प्रश्नाची माहिती न मिळणे ही प्रशासनाची चूक आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या दोन प्रश्नांची उत्तरे आज सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी पटलावर ठेवावीत असे सांगितले आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख** : संसदीय आयुधांचा आम्ही वापर करतो. सभापती महोदय, हायकोर्टाच्या निर्णयाचा अवमान करण्याचा प्रश्न अशा उलट रीतीने सभागृहामध्ये निकाली लागणे याचा निषेध करण्याशिवाय दुसरा उपाय राहात नाही.

**उपसभापती** : येथे आपला अवमान होतो त्यामुळे हायकोर्टाच्या अवमानाची फार खंत बाळगू नये. त्याची सवय करुन घ्यावी..

**प्रा.बी.टी.देशमुख** : त्याची सवय आम्ही करु. माननीय मंत्री महोदयांना जे काही निवेदन करावयाचे असेल ते त्यांनी करावे. हा प्रश्न राखून ठेवल्यानंतर एकेका प्रश्नाचे उत्तर येईल.

**उपसभापती** : दुपारी ४.०० वाजता सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतील आणि त्या प्रश्नाला उत्तरे मिळतील.

**श्री.जगदीश गुप्ता** : सभापती महोदय, आपण निर्देश दिल्यानंतर देखील कालच्या प्रश्नाचे उत्तर अद्याप मिळाले नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख** : संसदीय आयुधांच्या पध्दतीमध्ये ही नोटीस येते. म्हणून माझी विनंती आहे की, हायकोर्टाच्या निर्णयाच्या अवमानाची बाब यामध्ये इन्व्हॉल्व्हड् असल्यामुळे आणि पॉईंटेड प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदय देऊ शकत नसल्यामुळे ते उत्तर देण्यासाठी आपण त्यांना वेळ द्यावा. त्यासाठी हा प्रश्न आपण राखून ठेवावा किंवा आपणाला योग्य वाटेल त्यावेळी तो घ्यावा. प्रश्नाची नोटीस म्हणजेच पूर्व सूचना दिलेली असल्यामुळे विदाऊट नोटीसप्रमाणे त्या प्रश्नाची माहिती येता कामा नये. कारण विदाऊट नोटीस एखाद्या विषयाची माहिती पटलावर ठेवण्यात आली तर त्याबाबतीत प्रश्न विचारता येत नाहीत. म्हणून हा प्रश्न राखून ठेवावा जेणेकरुन आम्हाला त्यावर उपप्रश्न विचारता येतील.

**उपसभापती** : दुपारी ४.०० वाजता या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदय देतील. आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ : खंड १४८, क्रमांक ५, पृष्ठ २२)*

**७१.** प्रश्नोत्तराचा तास संपला, दिवसभराचे कामकाजसुद्धा संपत आले होते. शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ रोजी दुपारचे ४ वाजत आले मंत्रिमहोदय मात्र अजूनही सभागृहात आलेले नव्हते. त्यामुळे मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. मा.पीठासीन अधिकाऱ्यांनी त्यानंतर "प्रश्न राखून ठेवण्यात येत असून तो आता पुढच्या आठवड्यात घेण्यात येईल" अशा प्रकारचा निर्णय दिला. ती सभागृहातील चर्चा शब्दशः पुढीलप्रमाणे :-

*राखून ठेवलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३७ संबंधी*
*(दुपारी १६.०० वाजता)*

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी कोकण रेल्वेच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचा प्रस्ताव या सभागृहामध्ये उपस्थित केलेला असून ते अतिशय चांगले मुद्दे मांडत आहेत. परंतु मला माझ्या कर्तव्याचा भाग म्हणून एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देणे आवश्यक वाटते.

सभापती महोदय, आज सकाळी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये प्रश्नोत्तराच्या यादीमधील नवव्या क्रमांकावर असणारा तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३७ हा माननीय सभापतींनी आज दुपारी ४.०० वाजेपर्यन्त राखून ठेवलेला होता आणि ४.०० वाजता त्या प्रश्नाचे उत्तर द्यावे असे निदेश दिलेले होते. प्रश्न अतिशय सुटसुटीत आहे. हायकोर्टाने आदेश दिलेले आहेत आणि त्या आदेशांची प्रत मी मुद्दाम या ठिकाणी सोबत आणलेली आहे. हायकोर्टाने असे आदेश दिलेले आहेत की, त्या सर्व शिक्षकांना सेवासातत्त्याचे लाभ द्यावेत. शासनाने ४ नोव्हेंबर २००६ ला आदेश काढले आणि ते डायरेक्टरला दिले की, आता हायकोर्टामध्ये रिव्ह्युपिटीशन करण्याची गरज नाही. दिनांक १७.११.२००६ ला डायरेक्टरने जॉईण्ट डायरेक्टरला आदेश दिले की रिव्ह्यू पिटिशन करायचे नाही. हे आदेश लेखी दिलेले आहेत. त्यानंतर आज सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्या प्रश्नाला "**सेवासातत्याचे लाभ देण्याबाबतची कार्यवाही सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी केली आहे.**" असे उत्तर देण्यात आलेले आहे. आता एक-एक वर्ष ही कार्यवाही का पडून राहते हे अंदाजाने मी समजू शकतो. त्याचा उल्लेख मला येथे करता येत नाही. मी विचारलेल्या प्रश्नाला "**सेवासातत्याचे लाभ देण्याची कार्यवाही केलेली आहे**" अशा प्रकारचे उत्तर आलेले असल्यामुळे स्वाभाविकपणे ही कार्यवाही कोणत्या तारखेला केली आणि काय कार्यवाही केली असे प्रश्न मी विचारले होते आणि त्या प्रश्नाचे उत्तर आले नाही म्हणून माननीय सभापतींनी आज दुपारी ४.०० वाजेपर्यन्त हा प्रश्न राखून ठेवला होता आणि ४.०० वाजता या प्रश्नाचे उत्तर देण्याचे आदेश माननीय मंत्री महोदयांना दिले होते. आता ४.०० वाजलेले आहेत. सभागृहामध्ये संबंधित विभागाचे मा.मंत्री महोदय हजर नाहीत. तेव्हा ता.प्र.क्र. ३७६३७ हा राखून ठेवून तो पुढच्या आठवडयात घ्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३७ च्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदय हे आज दुपारी ४.०० वाजता सभागृहाला माहिती सादर करणार होते. परंतु ते आता सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे सदरहू माहिती पुढच्या आठवडयात ठेवावी अशी सन्माननीय सदस्यांनी विनंती केलेली आहे. सदरहू माहिती पुढील आठवडयातील सोमवारी सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी ठेवण्यात यावी अशी मी संबंधित विभागाला सूचना करते.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदया, हा तारांकित प्रश्न राखून ठेवावा अशीच माझी मागणी आहे. या विभागाचे प्रश्न ज्या दिवशी घेण्यात येतील त्या दिवशी माझा हा राखून ठेवलेला प्रश्न चर्चेला घेण्यात यावा.

**तालिका सभापती :** ठीक आहे. पुढच्या आठवड्यात हा प्रश्न घेण्यात येईल. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ : खंड १४८, क्रमांक ५, पृष्ठ १३१)*

**७२.** मा.पीठासीन अधिकाऱ्यांचा उपरोक्त निर्णय झाल्यानंतर ४ वाजून २० मिनिटांनी मा.उच्च शिक्षणमंत्री सभागृहात आले असता मा.पीठासीन अधिकाऱ्यांनी "पुढील आठवड्यात आपले निवेदन ठेवले आहे" असे त्यांना सांगितले. यावर मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी हा फक्त पाच कर्मचाऱ्यांचा प्रश्न आहे असे सांगण्याचा प्रयत्न केला. प्रश्न स्वीकृत करण्याच्या नियमाप्रमाणे प्रश्नोक्त विषय हा पुरेसा सार्वजनिक महत्त्वाचा (of sufficient public importance) असला पाहिजे असा नियम आहे. बहुधा ते लक्षात घेऊन मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी फक्त पाच कर्मचाऱ्यांचा उल्लेख केला असावा. तेव्हा फक्त पाच कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न नाही. मा.उच्च न्यायालयाचे अनेक निर्णय झाल्यावर शासन कारवाई करीत नाही ही बाब तसेच मा.पीठासीन अधिकाऱ्यांचे आदेशसुद्धा मानले जात नाहीत ही बाब घटनात्मकदृष्ट्या सार्वजनिक महत्त्वाची आहे हे सभागृहात सांगावे लागले. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

*राखून ठेवलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३७ च्या*
*सुधारित उत्तराबाबत (दुपारी १६.२० वाजता)*

**तालीका सभापती (श्रीमती उषाताई दराडे) :** मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी आज जे निवेदन करावयाचे होते ते आपण पुढील आठवड्यात ठेवले आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** आज चार वाजेची वेळ मला दिलेली होती परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलाविलेली होती. म्हणून मी येऊ शकलो नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख :** म्हणूनच आम्ही सभागृहाची बैठक थांबवून आपल्याला बोलावले नाही.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** पाच कर्मचाऱ्यांसाठी सभागृहाची बैठक थांबविणे देखील बरोबर नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख :** हा फक्त ५ कर्मचाऱ्यांचा प्रश्न नाही. न्यायालयाच्या अवमानाबाबतचा हा प्रश्न आहे. मा. सभापतींचे आदेश पालन न झाल्याचा प्रश्न आहे. आपण ज्या तऱ्हेने या प्रश्नाकडे पाहत आहात, ते चुकीचे आहे. कारण उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा सन १९९० पूर्वीच्या अनेक लोकांच्या बाबतीत असून अजूनही त्याची अम्मलबजावणी शासन करीत नाही. हा त्यातील महत्वाचा भाग आहे. अशा प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने दंड ठोठावला आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** उच्च न्यायालयाचा कुठल्याही प्रकारे अवमान झालेला नाही.

**तालीका सभापती :** या विषयावरील निवेदन आपण पुढील आठवड्यात घेण्याचे ठरविले आहे, त्यामुळे त्यावर आता चर्चा करु नये. अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी कृपया आपले भाषण सुरु करावे. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ : खंड १४८, क्रमांक ५, पृष्ठ १३५-१३६)*

**७३.** दिनांक २३ जुलै २००५ पासून तर दिनांक २८ मार्च २००८ पर्यंत निरनिराळ्या ११ वेळा हा प्रश्न सभागृहामध्ये चर्चेसाठी किंवा उत्तरासाठी आला. सुरुवातीला "**सन १९९४ च्या शासननिर्णयाप्रमाणे प्रस्ताव सादर झालेले नाही त्यामुळे त्या प्रस्तावावर विचार करता येत नाही**" अशा प्रकारची घटनाबाह्य व हेकेखोरपणाची भूमिका उच्च शिक्षण विभागाने घेतलेली होती. पुढे ती भूमिका त्यांना सोडून द्यावी लागली. पुढच्या पुढच्या चर्चेमध्ये या प्रश्नाची सोडवणूक होण्याच्या दृष्टीने अनुकूल दिशने प्रवास होत होता असे दिसून येते. विधानपरिषदेतील या ११ वेळेच्या चर्चेच्या कार्यवाहीच्या अधिकृत प्रतिवेदनाचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत.:-

## *अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुद्धा पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून होत असलेला विलंब*

**(१) २३ जुलै २००५** : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : दुसरे अधिवेशन, २००५ शनिवार, दिनांक २३ जुलै २००५ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४०, क्रमांक १०, पृष्ठ ९७-९९

**(२) २३ जुलै २००५** : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : दुसरे अधिवेशन, २००५ शनिवार, दिनांक २३ जुलै २००५ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४०, क्रमांक १०, पृष्ठ ८२७-८२८

**(३) ६ डिसेंबर २००५** : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : तिसरे अधिवेशन, २००५ मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर २००५ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४१, क्रमांक २, पृष्ठ २(५)

**(४) १८ एप्रिल २००६** : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : पहिले अधिवेशन, २००६ मंगळवार, दिनांक १८ एप्रिल २००६ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४२, क्रमांक २०, पृष्ठ २-७

**(५) ६ जुलै २००६** : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : दुसरे अधिवेशन, २००६ गुरुवार, दिनांक ६ जुलै २००६ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४३, क्रमांक ४, पृष्ठ ३७-४१

**(६) २१ जुलै, २००६** : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : दुसरे अधिवेशन, २००६ शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २००६ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४३, क्रमांक १४, पृष्ठ १११-११२

**(७) २९ नोव्हेंबर २००७** : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : तिसरे अधिवेशन, २००७ गुरुवार, दिनांक २९ नोव्हेंबर २००७ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४७, क्रमांक ९, पृष्ठ ५६५-५६६

**(८) १४ मार्च २००८** : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : पहिले अधिवेशन, २००८ शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४८, क्रमांक ५, पृष्ठ १९-२२

**(९) १४ मार्च २००८ :** महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : पहिले अधिवेशन, २००८ शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४८, क्रमांक ५, पृष्ठ १३१

**(१०) १४ मार्च २००८ :** महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : पहिले अधिवेशन, २००८ शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४८, क्रमांक ५, पृष्ठ १३५-१३६

**(११) २८ मार्च २००८ :** महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : पहिले अधिवेशन, २००८ शुक्रवार, दिनांक २८ मार्च २००८ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४८, क्रमांक १३, पृष्ठ ४२-४४

**७४.** शुक्रवार, दिनांक १४ मार्च २००८ रोजी राखून ठेवलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३७ चे सुधारित उत्तर शुक्रवार, दिनांक २८ मार्च २००८ रोजी सभागृहासमोर आले.

### *अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुद्धा पदे अनारक्षित केल्या प्रकरणी योग्य तो लाभ देण्याची कारवाई न होणे*

**सभापती :** आता दिनांक १४ मार्च २००८ रोजी राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र. ३७६३७ घेण्यात येईल.

**(९) * ३७६३७ डॉ.एन.पी.हिराणी, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्हि.यू.डायगव्हाणे, श्री.वसंतराव खोटरे :** दिनांक २९ नोव्हेंबर २००७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या सोळाव्या यादीतील प्रश्न क्रमांक २९३५५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुध्दा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघांच्या (नुटा) सहसचिवांनी ३० मे, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनात नमूद असलेल्या प्रस्तावासंदर्भात पदे अनारिक्षित करून संबंधितांना सेवा सातत्याने लाभ लागू करण्याबाबत शासनाने दिलेल्या आदेशाबाबत सहसंचालक व कुलसचिव यांनी आजपावेतो कोणतीही कारवाई केलेली नाही हे खरे आहे काय,

(२) कार्यवाही झालेली असल्यास, याबाबत मा. उच्च न्यायालयाचे निर्णय लक्षात घेता शासनाने केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे,

(३) कारवाई केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : १), २) व ३) संबंधित **अधिव्याख्यात्यांच्या वरिष्ठ श्रेणीची वेतन निश्चिती झाली असून त्यापैकी ३ अधिव्याख्यात्यांना थकबाकी अदा करण्यात आली आहे. उर्वरित दोन अधिव्याख्यात्यांना दि.३१.३.२००८ पर्यंत वरिष्ठ श्रेणीची थकबाकी अदा करण्यात येईल. त्याचप्रमाणे उक्तपैकी ४ अधिव्याख्यात्यांच्या निवडश्रेणीची वेतन निश्चिती करण्यात आली आहे.** उर्वरित एका अधिव्याख्यात्याची अशी वेतन निश्चिती करुन त्यांच्यासह सर्व पाच अधिव्याख्यात्यांना याबाबतची थकबाकी दि.३१.३.२००८ पर्यंत अदा करण्यात येईल. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २८ मार्च २००८ : खंड १४८, क्रमांक १३, पृष्ठ ४२)*

**७५.** तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३७ हा राखून ठेवलेला प्रश्न असल्यामुळे शुक्रवार, दिनांक २८ मार्च २००८ रोजी प्रश्नोत्तराच्या तासात तो पहिल्याच क्रमांकावर होता. सभागृह प्रश्नोत्तराच्या तासाने सुरू होणार. सभागृह सुरू होण्यापूर्वी मा.उच्च शिक्षणमंत्री सभागृहात आल्याबरोबर माझ्या आसनाजवळ आले व मला म्हणाले "आता सभागृहात प्रश्न विचारण्याची गरज तुम्हाला आम्ही ठेवलेली नाही. त्या सर्वांची वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी हे सर्व आम्ही हातावेगळे केलेले आहे. काहींची पूर्ण थकबाकी दिलेली आहे. काहींची राहीली आहे, ती आम्ही दोन तीन दिवसात देऊ. मंत्री म्हणून माझ्याकडे वीजमंडळाचा अतिरिक्त कार्यभारसुद्धा सोपविण्यात आला आहे. तेव्हा आता या विषयावर सभागृहात वाद नको." त्यावर मी त्यांना "मंत्रीमहोदय गेल्या ८-१० दिवसामध्ये आपण जी कारवाई केली ती योग्यच आहे. पण १२.९.१९८९ च्या शासननिर्णयाप्रमाणे व मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्यांच्या वेतनवाढी त्यांना लागूही करण्यात आलेल्या नाहीत व अदाही करण्यात आलेल्या नाहीत." असे सांगितले. तेंव्हा मा. मंत्रिमहोदयांनी "आता १२.९.१९८९ च्या शासननिर्णयाचे तुम्ही हे नवीन काय काढले?" असे विचारले व पुढे ते असेही म्हणाले की, "आता तुम्ही आणखी हे १९८९ च्या शासननिर्णयाचे जे सांगत आहात त्याबाबत प्रश्नोत्तराच्या तासानंतर आपण बसू. आमचे अधिकारी येथेच आहेत. काय आहे ते अंतिमतः निकाली काढू." आमची ही अनौपचारिक चर्चा संपली.

**७६.** प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला. तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३७ ला देण्यात आलेले उत्तर वर दिलेले आहे. ते निश्चितपणे समाधानकारक होते. मात्र वेतनवाढी देण्याचा भाग त्या उत्तरामध्ये समाविष्ट नव्हता. "सभागृहामध्ये आता या विषयावर वाद नको. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपण बसुन त्याबाबतीत अंतिम निर्णय घेऊ" असे मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी मला अनौपचारिक चर्चेत सांगितले होते. त्यांच्या या आश्वासनाचा मला आदर करावयाचा होता. पण त्याचवेळी ते आश्वासन सभागृहामध्ये नोंदवून घेणे भाग होते. म्हणून कोणताही प्रश्न न विचारता या प्रश्नाचे सारे तपशील मी सभागृहात नमूद करीत होतो. मा.सभापती "सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा" असे पुन्हा पुन्हा म्हणत होते व मला प्रश्न न विचारता सारे तपशील नमूद करावयाचे होते. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, १५ ते २० वर्षाच्या वर नोकरी झालेल्या अनेक शिक्षकांचा महाराष्ट्रामध्ये छळ झाला आणि यासंदर्भात दोन-चार केसेस समोर आलेल्या आहेत आणि त्या केसेस सुद्धा हायकोर्टातून परत आलेल्या आहेत. याबाबतीत डझनावरी लोकांना अनारक्षण न दिल्यामुळे, त्यांना गेली अनेक वर्षे अतिशय छळाला तोंड द्यावे लागले आहे. या केसेस हायकोर्टातून परत आलेल्या आहेत. पण डहाणूकर कॉलेजमधील श्रीमती माधवी एस.पेठे यांच्या बाबतीत कन्टेम्प्ट ऑफ कोर्टची नोटीस दिल्यानंतर मग शासनाने त्यांना रेग्युलराईज करण्याचे आदेश दिले आहे. याशिवाय हायकोर्टाने ऑर्डर दिली की, १९९० च्या जी.आर.प्रमाणे कार्यवाही करावी. पण श्री.केंद्रे नावाच्या एका अधिकाऱ्याने असे कळविले की, १९९४ च्या जी.आर.प्रमाणे करावी. याबाबतीत सदनामध्ये देखील उल्लेख केला होता आणि सभापती महोदय,आपणही एक बैठक बोलाविली होती. त्यावेळी आपण देखील असे म्हटले होते की, हायकोर्टाने निर्णय दिल्यावरही श्री.केंद्रे यांनी अशा प्रकारची ऑर्डर पाठविणे बरोबर नाही. **श्री.केंद्रे यांना हाय कोर्टाने याबाबतीत २० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. श्री.केंद्रे यांनी चुकीची माहिती देऊन कोर्टाची दिशाभूल केल्याबद्दल हा दंड ठोठावला होता, ही बाब माननीय मंत्री महोदयांनी लक्षात घ्यावी. त्या ठिकाणी हायकोर्टाने असे म्हटलेले आहे की,"श्री.केंद्रे यांनी प्रतिज्ञापत्रात केलेली विधाने वस्तुस्थितीला धरुन नव्हती व दिशाभूल करणारी होती असे निदर्शनास आल्यावर खंडपीठाने त्यांच्याविरुद्ध कन्टेम्प्ट ऑफ कोर्टची नोटीस काढली. त्यावेळीही श्री.केंद्रे यांनी चुक कबूल करून बिनशर्त दिलगिरी व्यक्त केली नाही. आपली चूक झाली असे जर न्यायालयास वाटत असेल तर आपण दिलगीर आहोत असे त्यांनी म्हटले आहे.**" मग न्यायालयाने त्यांची दिलगिरी स्वीकारली नाही आणि त्यांना दंड ठोठावला.आता १५-२० वर्षे झाली. आपण स्वतः सर्व संबंधितांची बैठक बोलविली होती आणि त्यावेळी आपण स्पष्टपणे सांगितले होते की, याप्रकरणी हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतर सरकार सुप्रीम कोर्टामध्ये गेलेले नाही आणि तसे न झाल्यामुळे हायकोर्टाचा निर्णय इन्टॅक्ट आहे. त्यावेळी ते तेथेच होते. पण तरीही त्यानंतर कार्यवाही झाली नाही. यासंबंधात सभागृहामध्ये आपण कोणता निर्णय दिलेला आहे ते मी एक मिनिटामध्ये सांगतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा."

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, हा सार्वजनिकदृष्टया अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. अशा प्रकारे कोणाचाही छळ होऊ नये अशी माझी मनापासून इच्छा आहे. दि.६ जुलै २००६ रोजी आपण सदनामध्ये असे सांगितले होते की, "सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या विवेचनावरुन, सप्लीमेंटरी माहिती दिली, ज्याला मी हरकत म्हणणार नाही, ती या ठिकाणी दिली आहे. त्यांचे जे मत आहे, तेच माझेही मत आहे. **एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्या निर्णयाची अंमलबजावणी होते हे गृहीत धरलेले असते आणि तो निर्णय स्विकारणे गरजेचे आहे.या अनुषंगाने शासनाला जर काही अडचण असेल तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये जावे. माझ्या दालनामध्ये दि. २७ एप्रिल २००६ रोजी सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी याची अंमलबजावणी होण्याची गरज आहे असे मी सांगितले होते.**" सभापती महोदय, आपण त्यादिवशी हा प्रश्न राखून ठेवला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. असे डझनावारी लोक आहेत म्हणजे काही लोकांना मंत्रालयातून रिलीफ मिळालेला आहे. मी माननीय मंत्री महोदयांच्या फाईलमधील पान क्र.देखील सांगू शकतो. येथे आरक्षण उठविले होते, त्याला स्टे दिला, संबंधितांची रिकव्हरी काढली. पुन्हा आरक्षण उठविले.

# अपव्यवहारार्थ स्थळ निर्मिती करीत राहण्याचा उद्योग हाणून पाडणे - विशेषांक

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

*(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २८ मार्च २००८ : खंड १४८, क्रमांक १३, पृष्ठ ४२-४३)*

**७७.** दोन वेळा मा.सभापतींनी मला प्रश्न विचारावा असे सांगितले होते आणि माझ्याकडून सुद्धा सर्व माहिती सांगून झाली होती. त्यामुळे आजच या प्रश्नाच्या बाबतीत "आपण एकत्र बसून अंतिम निर्णय घेऊ" हे मा.उच्च शिक्षणमंत्र्यांचे आश्वासन मला सभागृहामध्ये नोंदवावयाचे होते. तसा मी प्रयत्न केला व त्यात मला उत्तम यश मिळाले. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, माझा पॉईंटेड प्रश्न आहे. त्यादिवशी कारवाई केली असे सांगितले होते. पण काय कारवाई केली आहे? तर याबाबतीत आज जी काही कारवाई केली आहे, त्यातील अर्ध्या कारवाईच्या बाबतचा भाग उत्तरामध्ये दिलेला आहे आणि तो भाग समाधानकारक आहे. त्यांना वरिष्ठ श्रेणी आणि निवड श्रेणी मध्ये जे काही लाभ द्यावयाचे होते, ते दिलेले आहेत. पण हायकोर्टाचा निर्णय काय आहे? तर हायकोर्टाचा आदेश असा आहे की, त्यांना कन्टीन्युटी ऑफ सर्व्हीसचे सर्व फायदे द्यावेत. पण त्यांना इन्क्रीमेंट सुध्दा दिलेले नाही अशी माझी तीन-चार दिवसापूर्वीची माहिती आहे. परंतु ते फायदे जर त्यांना दिले असतील तर मग मला प्रश्न विचारावयाचे नाहीत. हायकोर्टाने त्यांना कन्टीन्युटी ऑफ सर्व्हीस दिलेली आहे. तुम्ही त्यांना प्रमोशन वगैरे दिले. काहींचे ॲरिअर्स दिले आणि काही जणांना ३१ तारखेपर्यंत देतो असे सांगत आहात त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. माझे पॉईंटेड म्हणणे असे आहे की, त्यांना १९८९ च्या शासन निर्णयाप्रमाणे इन्क्रीमेंट दिलेले आहे काय? मला चार दिवसापूर्वी मिळालेल्या माहितीनुसार ते देण्यात आलेले नाही. पण जर ते देण्यात आले असतील तर मग मला प्रश्न विचारावयाचे नाहीत. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत माहिती द्यावी.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अमरावती विद्यापीठातील ज्या पाच केसेस होत्या, त्या संदर्भात हायकोर्टाने जे आदेश दिले किंवा यासंदर्भात शासनाने वेळोवेळी जी भूमिका घेतली त्यामध्ये बहुतांश लाभ त्यांना देण्याचा प्रयत्न केलेला आहे. **सन्माननीय सदस्यांनी १९८९ च्या शासन निर्णयाच्या संदर्भात नवीन मुद्दा उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्य आणि मी एकत्र बसून आजच यासंदर्भात आम्ही अंतिम निर्णय घेऊ.**

**प्रा.बी.टी.देशमुख :** माझी काही हरकत नाही. मुद्दा लहानसा आहे. चार आठवड्याच्या आत त्यांना क्वॉन्सिक्वेंशल बेनिफिट्स दिले पाहिजेत असा हायकोर्टाचा निर्णय आहे. हा आदेश २००५ चा आहे. पद आरक्षित होते, ते अनारक्षित नव्हते म्हणून त्यांना इन्क्रिमेंटस् दिले नव्हते, ते देणे आवश्यक आहे. कारण कोर्टाने कंटीन्युटी दिलेली आहे आणि आपणही कंटीन्युटी दिलेली आहे. माननीय मंत्रिमहोदय म्हणत आहेत म्हणून मी जास्त आग्रह धरत नाही. पण माननीय मंत्रिमहोदय म्हणतात त्याप्रमाणे बसून आजच त्याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाईल काय?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, होय."

*(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २८ मार्च २००८ : खंड १४८, क्रमांक १३, पृष्ठ ४३-४४)*

**७८.** प्रश्नोत्तराचा तास संपल्याबरोबर मा. सभापतीच्या बैठक दालनात मा.उच्च शिक्षणमंत्री यांनी मला सोबतच नेले. आमची अनौपचारिक बैठक सुरू झाली. विभागाचे उपसचिव श्री. अरविंद चौधरी व अमरावती विभागाचे सहसंचालक श्री. भोजराज चौधरी या बैठकीला उपस्थित होते. मा. मंत्रिमहोदय म्हणाले "सांगा!" "सेवासातत्याचे सर्व लाभ त्यांना द्या असा हायकोर्टाचा आदेश आहे. तसे ते दिले पाहिजेत असा १९८९ चा शासननिर्णय आहे. त्यांना वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणी आपण दिली. त्यांच्या अडविलेल्या वेतनवाढी आपण कां देत नाही? त्या देणे आवश्यक आहे." असे म्हणणे मी मांडले. मा.मंत्रिमहोदयांनी अधिकाऱ्यांकडे पाहिले. उभय अधिकाऱ्यांनी माझ्या मताशी सहमती व्यक्त केली. त्यावर मा. मंत्रिमहोदयांनी "मग हे यापूर्वीच व्हायला पाहिजे होते. आजच्या आज आदेश काढा व सायंकाळपर्यंत बी.टी.साहेबांना त्याची प्रत द्या." असे तिथल्या तिथे निदेश दिले. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी त्याच दिवशी मुंबईहून याबाबतचे आदेश **(सहपत्र : १०)** निर्गमित केले व त्याची प्रत सपत्र **(सहपत्र : ११)** मध्यान्नोत्तर प्रा.बी.टी.देशमुख यांच्या सुपूर्द केली. ती पत्रासह सोबत प्रसृत केलेली आहे.

**७९.** अमरावती विभागाच्या मा.सहसंचालकांनी सहसंचालक या नात्याने मंत्रालयातून आदेश काढल्याचे हे एकमेव उदाहरण असावे. तत्पूर्वीच्या २५-३० वर्षात असे दुसरे उदाहरण माझ्या पाहण्यात नाही. इतर विभागाच्या सहसंचालकांना सुद्धा मंत्रालयात बसून सहसंचालक म्हणून आदेश काढण्याची संधी सुद्धा दुर्मिळच म्हटली पाहिजे. हा फक्त ५ शिक्षकांचाच प्रश्न होता हे म्हणणे सुद्धा चूक आहे. एकट्या अमरावती विभागात कागदोपत्री दाखल झालेल्या अशा शिक्षकांची संख्या ही २० होती. हे परिच्छेद ५७ व सहपत्र ८ वरून लक्षात येईल. सन १९९० व १९९४ च्या शासननिर्णयाचा मतलबी अर्थ मंत्रालयातील अधिकाऱ्यांनीच लावल्यामुळे प्रत्यक्षात ही संख्या अमरावती विभागात व महाराष्ट्राच्या सर्वच भागात कितीतरी जास्त होती. पाच शिक्षकांनी न्यायालयातील कामकाजाची कागदपत्रे मला उपलब्ध करून दिल्यामुळे सभागृहात पाठपुराव्यासाठी मला त्यांचा चांगला उपयोग झाला हे जेवढे खरे तेवढेच महाराष्ट्रातील अनेक शिक्षकांना मा.उच्च न्यायालयात जाऊन न्याय मिळवावा लागला हेही खरे. याच ५ शिक्षकांच्या कितीतरी महिने अगोदर मुंबई विभागातील अनेक शिक्षकांनी मा.उच्च न्यायालयातून न्याय मिळविला होता. याची माहिती मी वर परिच्छेद १६ व ३० मध्ये दिलेली आहे.

**८०.** मा.उच्च न्यायालयाने एकदा निर्णय दिल्यानंतर भारतीय संविधानातील तरतुदीनुसार त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार हा फक्त मा.सर्वोच्च न्यायालयाला आहे. **इतर कोणीही तसा प्रयत्न करणे हा उच्च कोटीचा अपव्यवहार होय.** कायदा किंवा नियम कोणीही केलेला असो, त्याचा अंतिम अर्थ सांगण्याचा अंतिम अधिकार मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयालाच आहे. संविधानातील तरतुदीनुसार तो इतर कोणालाही नाही. "**सन १९९४ चा शासननिर्णय हा भावी प्रभावाने (Prospectively) लागू होतो, तो पूर्वलक्षी प्रभावाने (Retrospectively) लागू करता येणार नाही**" असा स्पष्ट अर्थ सांगणारा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिल्यावर मंत्रालयातील केंद्रे नावाच्या कक्ष अधिकाऱ्यांनी "**सन १९९४ च्या शासननिर्णयाप्रमाणे तुमचा प्रस्ताव नाही त्यामुळे त्याचा विचार करता येत नाही**" असे परिपत्रक काढणे हा अत्युच्च कोटीचा अपव्यवहार होय. हा अपव्यवहार निरंतर सुरू ठेवण्याची ही सुविधा या सर्व शिक्षकांनी मेहनतपूर्वक हाणून पाडली याबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन. २८ मार्च २००८ पूर्वी महाराष्ट्राच्या विविध भागातून अशा तक्रारी घेऊन शिक्षक मला भेटत असत. त्यांना मी असे सांगत असे की, "**सभागृहात याबाबतचा प्रयत्न चालू आहे. त्यात यश येईपर्यंत वाट पहा**" किंवा "**आमच्या संघटनेने मा.उच्च न्यायालयाचे उपलब्ध सर्व निर्णय त्यावेळच्या नुटा बुलेटीनमध्ये प्रसिद्ध केलेले आहेत. त्यांचा आधार घेऊन उच्च न्यायालयात जा.**" उपरोक्त खटाटोपानंतर हा प्रश्न समाधानकारक रितीने मार्गी लागला होता. त्यामुळेच दिनांक २८ मार्च २००८ नंतर एकही शिक्षक तत्सम तक्रार घेऊन मला भेटला नाही याबद्दल मला मनापासून आनंद वाटतो.

*****

## नुटा बुलेटीनची सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका
## विशेषांक तिसरा

# Kerala Assembly passes resolution against Draft UGC Regulations

Resolution urges the Centre to review proposed norms and introduce a fresh set of guidelines only after thorough consultations with State governments, academics and other stakeholders

Updated - January 21, 2025 02:22 pm IST - THIRUVANANTHAPURAM

*THE HINDU BUREAU*

The Kerala Assembly on Tuesday (January 21, 2025) unanimously adopted a resolution calling for the immediate withdrawal of the Draft University Grants Commission (UGC) Regulations of 2025.

The resolution urges the Centre to review the proposed norms and to introduce a fresh set of guidelines only after thorough consultations with State governments, academics and other stakeholders to ensure that the interests of all parties are adequately considered.

The move follows a call by Tamil Nadu Chief Minister M.K. Stalin, who urged other states — particularly those governed by coalitions other than the National Democratic Alliance (NDA) — to pass resolutions similar to the one recently adopted by the Tamil Nadu Assembly.

**The resolution, moved by Chief Minister Pinarayi Vijayan, flags the guidelines as inconsistent with India's federal structure and fails to adequately reflect the principles laid down in the Constitution.**

It asserts that the power to establish and supervise universities rests with the state governments, as per the Constitution's Seventh Schedule. Referring to the 42nd Constitutional Amendment of 1977, which moved education, including higher education, to the Concurrent List, the resolution also emphasises that the Central government's role should be limited to coordinating and setting standards for higher education.

The document criticises the Draft UGC (Minimum Qualifications for Appointment and Promotion of Teachers and Academic Staff in Universities and Colleges and Measures for the Maintenance of Standards in Higher Education) Regulations, 2025, for excluding state governments from key decisions, particularly the appointment of Vice-Chancellors and setting of qualifications and service conditions for faculty members.

Such guidelines, it argues, undermine the democratic functioning of universities and give undue influence to central authorities, thereby sidelining the role of states, which contribute around 80% of the funding for higher education institutions.

The resolution also highlights the objectionable provisions in the guidelines that propose appointing Vice-Chancellors from the private sector, even potentially from commercial backgrounds, instead of prioritising academic expertise within universities. This, it cautions, could lead to the commercialisation of higher education and erode its integrity, ultimately undermining academic freedom and diversity.

*Published - January 21, 2025 12:42 pm IST*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 09.02.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.02.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,..........................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................